# सुंदर पत्रे

साने गुरुजी

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब नारायण
दा. नं. १०५१४

१२३५०

भाग तिसरा

साधना प्रकाशन । ४३०–३१ शनिवार पेठ । पुणे ३०


किंमत २ रुपये

प्रकाशक । भाल कोरगावकर । साधना प्रकाशन । ४३०-३
शनिवार पुणे ३० । मुद्रक । प्रभाकर सिद्ध । साधना प्रेस
४३०-३१ शनिवार पुणे ३० । © साधना ट्रस्ट

आवृत्ती पाचवी । अकरा जून एकोणीसशे सत्तर

सुंदर पत्रांचा हा तिसरा व शेवटचा भाग. साने गुरुजींनी आयुष्याच्या अंती अंगीचे सारे कवित्व व मातृत्व जागृत करून मोठ्या लोभीपणाने, कृपण मनाने जतन करून ठेवलेले महाराष्ट्राचे संस्कृतिधन सुंदर पत्रांच्या द्रोणांत भरभरून वाटून टाकले. त्यांनी आणखी सुंदर पत्रे लिहावी अशी सुधेसह सर्वांचीच इच्छा होती; पण गुरुजींनी त्याऐवजी अखेरचीच पत्रे लिहून टाकली. 'ही पत्रे पुस्तकाकार करू का?' असे सुधेने विचारले असता गुरुजींनी उत्तर दिले : 'कर. ती तुझी आहेत. तुझा त्यांच्यावर हक्क.' पण अर्जुनाला निमित्त करून यदुपतीने गीता सांगितली तोच हा प्रकार. सुधेच्या निमित्ताने त्यांनी साऱ्या भावनाशील महाराष्ट्राला 'सर्वांगीण जीवनाची उपासना करा' असे सुचवले आहे. त्यांची इच्छा सफल होवो. आम्ही झऱ्यादऱ्यातील, पानाफुलांतील, पाखरा-पक्ष्यांतील सौंदर्य डोळसपणाने पाहावे, साध्याभोळ्या माणसांचे मोठेपण मनोमन ओळखावे आणि आमची दृष्टी सतेज व्हावी, हात हरकामी व्हावेत, मन रुंद व संवेदनाशील व्हावे हे त्यांचे मनोगत. ते आम्ही सदैव मनात ठेवावे, रुजवावे, म्हणजे हा पत्रोपहार कारणी लागल्यासारखे आहे.

प्रकाशक



चि. प्रिय सुधास,

सप्रेम आशीर्वाद.

तू परीक्षेत चांगल्या रीतीने उत्तीर्ण झालीस. तुला. शाबासकी. परीक्षांचे निकाल लागल्यामुळे जिकडे तिकडे पास झालेली मुले मोठ्या खुषीत आहेत. नापास झालेली दुःखी आहेत. वर्षभर केलेले श्रम फुकट गेले म्हणून वाईट वाटणे स्वाभाविक आहे. परंतु त्यांनी वर्षभर श्रम केले होते का? ते श्रम पायाशुद्ध होते का? नीट समजून रोज थोडासा नियमित अभ्यास केला तर पास होणे कठीण नसते. परीक्षा जवळ आली म्हणजे मुले जागी होतात आणि मग यश न मिळाले तर खट्टू होतात.

तुमच्याकडे मध्यंतरी विनू आला होता ना, तो व त्याची सारी भांवडे पास झाली. सुधा, प्रभा, मालती, जतीन वगैरे तुझ्या ओळखीची सारी मुले पास झाली. तुझी प्रभा पास झाली का? झालीच असेल. ती हुशार आहे असे तू म्हणत असस. तुझ्या इतर मैत्रिणी पास झाल्या का? आणि मामांचा दिनकर पास झाला का? दिनकर मला फार आवडायचा. तो नेहमी हसायचा.

त्याच्या वर्गाचे शिक्षक म्हणायचे, "क्षणभर याचे चित्त एकाग्र होत नाही. इकडे बघेल तिकडे बघेल." परंतु मला त्याच्या मुखावरचे हास्य मोही. ते मला मी कोठेही गेलो तरी आठवते.

सुधा, तुला गणितात आणि शास्त्रात शेकडा ७० हून अधिक मार्क मिळाले. छान. गणित व शास्त्र विषय तुझे चांगले आहेत. आजकालच्या हिंदुस्थानला याच विषयांची जरूरी आहे. साऱ्या जीवनातच गणिती दृष्टी, शास्त्रीय दृष्टी हवी आहे. मी गणिती दृष्टी म्हणजे काहीही फुकट न दवडण्याची वृत्ती म्हणतो. भगिनी निवेदिता एकदा म्हणाल्या, "हिंदुस्थान गरीब देश आहे. एक क्षणही फुकट दवडणे पाप आहे. एक पैही अनाठायी खर्च करणे गुन्हा आहे." हिंदी जनतेत ही वृत्ती यायला हवी आहे. प्रत्येक पै राष्ट्र-संवर्धनाच्या कामात गेली तर कामाचे डोंगर उठतील. परंतु गणिती वृत्ती याहून थोर आहे. मी केवळ हिशेबी दृष्टीनेच बघत नाही. गणित, अनंताच्या दारात नेऊन सोडते. गणितानेच विख्यात शास्त्रज्ञ आइन्स्टाइन विश्वाचे कोडे सोडवितात. उपनिषदांतील ऋषींनी गणिताच्या भाषेतच ब्रह्माचे स्वरूप मांडले. सुधा तुझ्या अण्णाला गणित कळत नाही. पुढचा जन्म येणारच असला तर तो गणितासाठी येवो. जगातील मोठमोठे तत्त्वज्ञानी गणिती होते. आणि आपले पूज्य विनोबा तेही थोर गणिती आहेत. भारताला अनंताच्या दृष्टीने नि हिशेबी दृष्टीने— दोन्ही दृष्टींनी— गणिती वृत्ती हवी आहे. त्याचप्रमाणे शास्त्रीय दृष्टी. शास्त्रीय दृष्टी म्हणजे बुद्धीला पटेल तेच घ्यावयाचे. तेच मानावयाचे. सारा बावळटपणा, बाष्कळपणा फेकून द्यावयाचा. आंधळ्या रूढींना, मृत विधि-विधानांना काडी लावायची. एक प्रसंग आठवतो. महात्माजींचा अस्पृश्यता निवारणाचा हिंदुस्थानभर दौरा चालू होता. हिंडता हिंडता ते पुण्याला आले. शनिवार वाड्यासमोर विराट् सभा भरली होती. त्या सभेत महात्माजी म्हणाले, "वेदात अस्पृश्यतेला स्थान नाही; आणि असेल तर तो वेद मी नम्रपणे दूर ठेवीन आणि माझी बुद्धी प्रमाण मानून मी जाईन." पू. विनोबाजी एकदा जयप्रकाशांजवळ म्हणाले, "देवाखालोखाल मी कशाला मानीत असेन तर बुद्धीला." शास्त्रीय दृष्टी म्हणजे बौद्धिक दृष्टी. युरोप बुद्धीचा डोळा उघडून वागू लागले आणि विज्ञानाची अनंत दालने खुली होऊ लागली. त्यांनी आपले जीवन सुखमय, समृद्ध, निरोगी असे केले आहे. अणुबाँबचे शोध

लागत असतील. परंतु तेवढ्याने शास्त्राला नावे ठेवण्याची जरूर नाही. आणि शास्त्रात मागसलेल्या भारताने तर नयेच ठेवू. भारताने विज्ञानात अमोल भर घालावी व मग जगाला शांतीचे पाठ द्यावेत.

[आज आपले सारे जीवन भकास आहे, उदास आहे, कलाहीन आहे. खेड्यापाड्यातून शास्त्रीय दृष्टी घेतलेले शेकडो तरुण जायला हवेत. परिस्थितीला अनुरूप असे उपाय सुचवून, प्रयोग करून सारे जीवन त्यांनी बदलून टाकायला हवे आहे. शनिमाहात्म्याचे रडके धर्म नष्ट होऊन कर्तृत्वाचा पुरुषार्थशाली धर्म यायला हवा आहे. रोग हटत आहे, स्वच्छता येत आहे. पाण्याची सोय होत आहे, पिके वाढत आहेत, बागा फुलत आहेत, जातिभेद जाऊन मानवता येत आहे, सहकारी ग्रामोद्योग वाढत आहेत, दुभते वाढत आहे, मोकळी, स्वच्छ, स्वस्त, घरे बांधली जात आहेत, ज्ञानविज्ञानकला यांचे संगोपन होत आहे,– अशी भारतीय खेडी व्हायला हवी आहेत. अंगात येणे, भुताटकी, मूठ मारणे, जादूटोणे, बळी देणे, साऱ्या प्रथा दूर होऊन शुद्ध बुद्धीचा धर्म सर्वत्र रूढ करायला हवा आहे. यालाच मी वेदधर्म– म्हणजे ज्ञानावर, अनुभवावर, विचारावर आधारलेला धर्म म्हणतो.]

मुंबईला नुकतीच 'रामराज्य' परिषद भरली. रामराज्याचा वेड्यांना अर्थ तरी माहीत आहे का ? यांना धर्मातील उदात्तता कळत नाही. अनुदार वृत्तीच्या लोकांना कुठला धर्म, कुठली मानवता ? स्त्रियांचा आत्मा मुक्त केला तर का समाजाचे काही बिघडणार आहे ? भारतात स्त्रियांची आजवर अवहेलना झाली. विवेकानंद स्त्रियांची दुर्दशा बघून रडले. जोवर स्त्रियांचा आत्मा मुक्त होत नाही, तोवर भारताला आशा नाही. स्त्रियाही आधी माणसे आहेत. मानवतेचे सर्व हक्क त्यांना मिळाले पाहिजेत. धर्माच्या नावाने येता जाता ओरडणारे लोकच आज धर्मभ्रष्ट झाले आहेत. उदात्ततेचा स्पर्शही त्यांच्या जीवनाला नाही. आणि गंमत ही की, काही प्रतिष्ठित स्त्रियाही धर्माचा पुळका येऊन आम्हा स्त्रियांना स्वातंत्र्य नको असे बडबडत आहेत. भारतातील कोट्यवधी स्त्रियांच्या दुर्दशेची यांना जाणीव आहे का ? परंतु शेकडो वर्षे गुलामीत राहणाऱ्यास गुलामीच प्रिय वाटू लागते. पुष्कळ वर्षांपूर्वी एकदा सेनापती एका गावी हरिजनवस्तीत गेले. तेथे त्यांचा तुरुंगातील एक मित्र होता.

तो हरिजन मित्र भेटला. सेनापती म्हणाले, "तुझ्या घरात काय असेल ते दे थोडे खायला. आंबील दे, भाकरीचा तुकडा दे." तो मित्र रडू लागला व म्हणाला, "पूर्व जन्मी पाप केले म्हणून अस्पृश्य जातीत जन्मलो. आता तुम्हांला माझ्या घरी जेवायला घालण्याचे पाप करीन तर पुढचा जन्म आणखी कसला येईल कुणाला माहीत?" खरोखर मानवाने मानवाची काय ही दशा केली! ज्या काही भारतीय भगिनीच हिंदू कायद्यांच्या सुधारणेबद्दल आकांडतांडव करीत आहेत त्यांची कीव येते.

सुधा, तू शीक आणि पुढे सेवेला वाहून घे. स्त्रियांची मान उंच कर. त्यांची अप्रतिष्ठा कमी कर. त्यांची बुद्धी जागी कर. त्यांची हिंमत जागी कर. त्यांच्यात स्वावलंबी व निर्भय वृत्ती निर्माण कर. निर्भय होणे म्हणजे मुक्त होणे.

परंतु बाळ, तू अजून लहान आहेस. मी हे लिहीत आहे ह्याचे कारण लहानपणीच तुझ्यासमोर हे विचार आले तर त्यातील थोडेफार टिकतील. लहान मुलांना महान विचार लौकर समजतात असा माझा तरी अनुभव आहे.

तुम्हांला आता दहा दिवस सुट्टी आहे. खूप खेळा, गंमतजंमत करा, मजा करा. वनविहाराला जा. समुद्रात डुंबा. या दहा दिवसांत पोटभर मोकळी हवा, आनंद जीवनात भरून घ्या, म्हणजे पुढचे दोन महिने तो पुरेल. मग पुन्हा सुट्टी. खरे म्हणजे आपल्या सुट्ट्या जनतेच्या गरजेप्रमाणे द्यायला हव्यात. साहेबाने उन्हाळ्यात सुट्टी सुरू केली. आपणाला का उन्हाळ्यात शाळेत बसवणार नाही? हंगामात सुट्टी द्यावी. पावसाच्या आरंभी एक महिना, मग आश्विन-कार्तिक महिन्यात आणि शिमग्याच्या सुमारास. पावसाच्या आरंभी पेरणीचे काम असते. दिवाळीच्या सुमारास पहिल्या पिकांचा हंगाम असतो. शिमग्याच्या सुमारास रब्बीच्या पिकांचा हंगाम. शेतकऱ्यांना या सर्व हंगामात मजूर भरपूर मिळत नाहीत. विद्यार्थ्यांनी जावे खेडोपाडी, काम करावे, मजुरी मिळवावी. स्वराज्यात सारे बदलायला हवे आहे. साहेबी थाट जाऊन, साहेबी सोयी जाऊन जनतेला अनुरूप सारे व्हायला

हवे आहे. स्वराज्याचा आत्मा अजून दिसत नाही असे जे म्हटले जाते, त्याचा हाच अर्थ.

आपल्या पायरे शेतातला कडवा चांगला झाला आहे. मधून मधून कोथिंबीर आहे. गुलाबाच्या चोंढ्यातील वाल मस्त आहे. परवा शेंगांचा लोटा भाजला होता. लोट्यात शेंगा भरायच्या. वर तिखट मीठ. नंतर तोंडावर पाला बसवून थोडे शेण थापून जाळात ते मडके टाकायचे. आत वाफेवर शेंगा शिजतात. मग त्या खायच्या. रानातील गंमत. त्या वेळेस राजाचे वैभव फिके वाटते. एका चोंढ्यातील वालावर मेकाडा पडला आहे. हा रोग का पडतो कोणाला ठाऊक! बांधावरच्या वालपापडीवरही हा रोग आहे.

दोन दिवसांपूर्वी गोविंदाने काही ओला वाल उपटून घरी आणला होता. आणि आम्ही अंगणात शेंगा काढीत बसलो होतो. गुरांना हा ओला टाळा फार आवडतो. शेंगा काढून मग आम्ही दाणे काढीत बसलो. गंमत म्हणून शब्दांच्या भेंड्या लावू लागलो. मी शेवटी ' ड ' येईल असे शब्द सांगत होतो. मुले रडकुंडीस आली. आपण बोर्डीस एकदा शब्दांच्या भेंड्या लावीत होतो व तुम्ही सारी एका बाजूला होऊन मला रडवलेत ते आठवते का?

परवा काकूने पपनस दिले होते. लहानपणी पपनस मला फार आवडे. मला किती तरी आठवणी आल्या! आणि एकदा शिमग्याच्या दिवसांतील गोष्ट तुला सांगू का? माझ्या लहानपणी आपल्या गावात शिमगा चांगलाच माजे. रात्री गावातून जाणाऱ्या बैलगाड्यांना अडवून आम्ही पोस्त मागायचे. त्यांनी दिले नाही तर मग मोठी मंडळी यायची. या पोस्ताच्या पैशातून मग नारळ घ्यायचे. खायचे. शिमग्यात चोऱ्या करायच्या. परंतु ती गंमत असे. अग आपली सरस्वती काकू. तिच्याकडच्या पपनशीवर किती तरी पपनसे! आम्ही मुलांनी ठरवले की, रात्री पपनसे काढायची. काही मुले वर चढली. काही खाली. पपनसे आम्ही खाली टाकीत होतो. परंतु एक पपनस पत्र्यावर पडले. सरस्वती काकू जागी झाली. "मेल्यांनो, चोरता का रे–" म्हणत ती बाहेर आली. खालची मुले पळाली. मी झाडावर होतो. परंतु पळणाऱ्या मुलांकडे सरस्वती काकू जात आहे असे पाहून मी शांतपणे दोन तीन पपनसे पिशवीत घालून हळूच खाली

आलो व दुसऱ्या बाजूने गेलो; आणि मारुतीच्या देवळात बसून मग आम्ही ती खाल्ली. आपल्या गावात ओकांकडे शिमग्याची पोपटी होत असे. थोडथोडी वर्गणी करीत. दशम्या आणि वांग्याची भाजी यांची मेजवानी असे. कधी भजी असत, कोणी भरीत करीत. शिमग्याचे ते दिवस गेले. आता त्याला नवीन सांस्कृतिक रूप येत आहे. अचकटविचकटपणा जात आहे. खेळ, शर्यती, कुस्त्या यांचे स्वरूप या सणाला येत आहे. शिमग्याच्या दिवसांत कोकणात तमाशे येऊ लागतात. आणि ते नाना प्रकारचे खेळये. 'डेरा' तुला आठवतो का ? डेऱ्याच्या तोंडावर चामडे बसवून त्याला पात्या लावलेल्या असत. या पात्यांवरून हात फिरवला की आवाज निघतो. आपला बाळ्या कांबळे डेऱ्यावर नाचायचा ! त्याच्याबरोबर एक राधा असायची. ते मोरांचे पिसारे पाठीवर बांधलेले. जणू कृष्ण ! गाणीही तो म्हणे. आणि पिसई गावाहून नकटा यायचा, काटखेळ करणारे यायचे. नवशी गावचा नकट्याचा खेळ चांगला की पिसई गावचा, अशी शर्यत लागे. नकटा म्हणजे रावण. त्याच्या तोंडावर रंगीत लाकडी मुखवटा असे. हातात कोयता असे. पाठीला बांधलेली घंटा आणि दुसरी दोन माणसे राम व सीता बनत. रामाच्या हातात धनुष्यबाण असे. राम आणि सीता हातात हात घालून नाचत. रावण तो कोयता त्यांच्या अंगावर फिरवीत नाचे. मुले हळूच पाठीमागून जाऊन रावणाची घंटा वाजवीत. रावण एखाद्याला पकडी व आपल्या लाकडी कोयतीने त्याला मारण्याचा आव आणी. गाणे चालले असताना मृदंग व झांजा वाजत. तो आवाज मी जन्मभर विसरणार नाही. धुधु धुमधुम्, धुधु धुमधुम् असा तो आवाज.

"उठा उठा पंतोजी आंघोली करा हो आंघोली करा
गुरूच्या महात्म्यान् लागलाय् झरा हो लागलाय झरा
रावण खातो गा पानाचा इडा हो पानाचा इडा"

वगैरे ती नकट्याच्या खेळातली गाणी कोण विसरेल? तू काटखेळ पाहिला आहेस का ? इंग्रजी पलटणीत स्कॉटिश हायलंडर्स असतात. त्यांच्या पलटणीत ते पुढे बँडवाले असतात ना, त्यांचा तो चुण्याचुण्यांचा झग्याचा पोषाख असतो.

दा. नं. १०११४



काटखेळातील लोकांचा कमरेखाली तसा पोषाख असतो. वर छातीवर पांढरा दुपट्टा फुलीच्या आकाराचा बांधलेला आणि हातात गोंडे असलेल्या टिपऱ्या. मग नाच होतो सुरू. तो ताल, ते नृत्य, ते वादन,— सारे अपूर्व असते. सेवा दलातील मुलांनी ते खेळ शिकून यावे असे मला फार वाटते.

शिमग्यातच संकासुराचे सोंगही येते. साध्या पेंढ्याच्या झिळमिळया, किंवा बांबूच्या पातळ झिलप्या घेऊन त्यांचा बनवलेला टोप, त्याच्या दाढी-मिशा,— असा तो संकासूर यावयाचा.

सुधामाई, पूर्वीचे खेळ जात चालले. नवीन करमणूक अजून आली नाही; म्हणून सारे निर्जीव वाटते. जुन्या कलांत नवीन अर्थ ओतून त्यांचे पुनरुज्जीवन करायला हवे. नवीन गाणी द्या, नवीन संकेत द्या, नवीन रंगरूप द्या. नवनिर्मितीचे हे काम अजून करायचे आहे. प्रचंड काम !

परवा वामनभटजींनी मला पोपया खायला बोलावले. पोपया मला फार आवडतो. मावशीलाही आवडतो. ज्ञानकोशकार केतकर होते ना ते पोपयाचे फार शोकी. कोकणात पोपये फार नाहीत. परंतु त्यांची नीट मशागत केली तर होतील. मावशीबरोबर पुष्कळ वर्षांपूर्वी मी द्वारकेत गेलो होतो. तेव्हा केवढाले पोपये स्टेशनवर पाहिले. एक पोपया आम्हांला संपवेना !

आम्ही लहानपणी कच्चे पोपयेही तिखट मीठ लावून खायचे. आजोबा रागे भरायचे. एकदा मी आजोळी गेलो होतो. आजोबा तिसरे प्रहरी बाहेर पडले. मावशी म्हणाली, " पाड पोपया. " मी पाडला. अक्काही होती. सोलून तिखटमीठ लावून खाऊ लागलो. तो आजोबा परत आले ! त्यांनी त्या फोडी भिरकावून दिल्या. पोपया उष्ण असतो. फार खाल्ला तर खरूज होते म्हणतात. परंतु हिवतापात मुद्दाम खायला द्यावा. वाढलेली पांथरी कमी होते म्हणतात. तुमच्या तेथे पोपये खूप ना ? मागच्या वर्षी तुमचे ते झाड पडले. किती पोपये त्यावर येत ! त्यांच्या ओझ्यानेच झाड मोडले. होय ना ?

विठोबारावांच्या घाणीवर काल गेलो होतो. आजूबाजूला सुंदर बाग आहे. खरोखर, फुलांसारखे मनाला रिझविणारे दुसरे काय आहे ? पाश्चिमात्यांनी

शेकडो प्रयोग करून फुलांची अनंत सृष्टी उभी केली आहे. शेकडो रंगांची फुले. आपण फक्त गुलबाक्षीच्या कंदात हळद, पिंजर भरून प्रयोग केले व शिटकावांची फुले निर्मिली. परंतु शेकडो फुलांवर असे प्रयोग करता येतील. प्राचीन काळी भारतात मोठमोठी उद्याने होती. मुसलमानी राजांना तर बागांची अनावर हौस. भारतीय जनतेला फुलाफळांचे वेड लागायला हवे आहे. तू मुंबईस गेलीस तर 'हँगिंग गार्डन' बघायला जा. तेथे मेंदी कापून पशुपक्ष्यांचे नाना आकार केलेले असतात. कोठे मेंदी कापून बैल केलेले, वानर केलेले! मी एकदा गेलो होतो तर दोन बैलांच्या मानेवर जू आहे व नांगर चालला आहे, असे मेंदी कापून दाखविले होते. शेकडो प्रकारची, शेकडो रंगांची फुले पाहून मन प्रसन्न होते! प्रत्येक गावात फुलबाग हवी. ज्या गावात भरपूर फुले नाहीत, आनंदी मुले नाहीत, त्या गावाला कुठली शोभा?

एखादे वेळेस मनात येते की, सारे सोडावे. ल्हानशी बाग करावी, फुले फुलवावीत. एखादी गाय असावी. तिचे बागडणारे वासरू असावे. बसावे नदीकाठी वडाखाली. वाजवावी बासरी! निष्पाप सरळ सुंदर जीवन! पण मनातील हे विचार मनातच राहतात, व संघर्षमय जीवन–टीका–प्रतिटीकांचे जीवन ओढून नेते. परंतु हे संघर्ष तरी कशासाठी? जीवनाची बाग फुलावी म्हणूनच ना? विषमता, दारिद्य, अन्याय, द्वेष–मत्सर जावे म्हणूनच ना? हे संघर्षही उच्च पातळीवरून चालवले म्हणजे झाले. जनतेला सुसंवादी तत्त्वज्ञान देणे, नव–उदार श्रद्धा देणे, अशी आपली निष्ठा असली म्हणजे पुरे. खरे की नाही?

तुम्ही येणार ना लग्नाला, इंदूच्या नि राजाच्या? अंतूभाऊंच्याही मालतीचे व चंदूचे लग्न पुण्यास आहे. ती दोन्ही लग्नेही २५ व २६ तारखेलाच. जायचे तरी कुठे कुठे! मनात सर्वांसाठी प्रार्थना करीन म्हणजे झाले. पुरे ना आता हे पत्र? अग, मी केव्हाचे लिहीत आहे. तुझ्या वाढदिवसाची तारीख का अठरा होती? तू येशील तेव्हा परीक्षेत पास होण्याबद्दल, तसेच वाढदिवसाबद्दल तुला जे काय हवे असेल ते देईन हो बाळ. प्रिय अरुणा, 'मुंबईला जायचे, भगभग गाडीने जायचे' असे म्हणून नाचत असेल. मुलांना बाहेर हिंडणे, दूर जाणे,

याहून दुसरे प्रिय काय आहे ? परंतु आईही जवळच हवी. तिच्या आधारावर बाकीच्या उडया.


मी आलो तर अरुणाला घेऊन आपण हँगिंग गार्डनवर जाऊ. तेथील फुलांची रंगीबेरंगी सृष्टी पाहून ती नाचत सुटेल. 'ओहो, ओहो– सुंदर' असे टाळया वाजवीत ती म्हणेल. तिला गोड पापा. अप्पा नि ताईस स. प्र.

तुझा

अण्णा

साधना, २५ फेब्रुवारी १९५०

* *



चि. प्रिय सुधास

सप्रेम आशीर्वाद.

मुंबईस तुम्ही थोडा वेळ का होईना भेटलात म्हणून आनंद झाला. अप्पा व तुम्ही सारी जणे हँगिंग गार्डनवर जाऊन तेथील सुंदर बाग बघून आलात. मला तुमच्याबरोबर यायला जमले नाही. अरुणा फुले पाहून आनंदली म्हणून अप्पा म्हणत होता. तिला ट्रामगाड्या, मोटरी, बसिस पाहून गंमत वाटत होती. लहान मुलांना सारे पाहावे असे वाटत असते. शंकर परवा आपल्या लहान मुलांना घेऊन रस्त्याने जात होता. वाटेत एक लहान कुत्रा होता. शंकरचा मुलगा म्हणाला, "थांबा, कुत्रा पाहू." आणि शेवटी म्हणाला, "याला घरी नेऊ!" त्याची समजूत घालता घालता नाकी नऊ आले!

तुम्ही दोन दिवस राहून लगेच गेलात. परंतु भेट झाली हे काय थोडे? ज्याला त्याला उद्योग आहेत. एकमेकांची पत्रे एकमेकांस येत–जात असली तरी प्रत्यक्ष भेटीचीही ओढ असते. प्रिय माणसांना बघावे, क्षणभर त्यांच्याजवळ बसावे असे वाटत असते. मनुष्य अन्नापेक्षा प्रेमाचा भुकेलेला आहे.

मी तुम्हांला भेटून लगेच इकडे निघून आलो. शिमग्याचे दिवस. विद्यार्थी व इतरही तरुण मंडळी गावात आट्यापाट्या वगैरे खेळण्यात दंग. रात्री चांदणे स्वच्छ असते. चांदण्यामध्ये खेळण्यात एक प्रकारची मौज असते. मी लहान असताना पिराच्या माळावर आम्ही आट्यापाट्या खेळायला जात असू. तेथे ते मोठे पायरीचे झाड होते. तुला ते आठवते का? एक मोठा म्हातारा सर्प त्या झाडाला रात्री प्रदक्षिणा घालतो अशी आख्यायिका होती. तो साप दिसावा म्हणून आम्ही पाहात असू. परंतु आम्हांला तो कधी दिसला नाही. त्याच्या अंगावर वीत वीत केस होते असे जुने लोक सांगत. या पिराच्या माळावर रात्री भुते दिसतात, त्यांचा पांढरा रंग असतो असेही म्हणत. परंतु आम्हांला भूत कधी दिसले नाही. आम्ही आट्यापाट्या खेळण्यात दंग होऊन जात असू. मला तितकेसे चांगले खेळता येत नसे. परंतु सर्वांबरोबर राहण्यात, रात्री हिंडण्याफिरण्यात मौज असते.

आता मोठा होम येत्या ३ तारखेला. निरनिराळ्या वाड्यांवर लहान लहान होम लागतील. मग गावातील सगळ्या वाड्यांवरचे लोक आपल्या महार-वाड्यात जमतील. तेथे सर्व गावाचा मोठा होम असतो. तेथे कोंबडे वगैरे पूर्वी मारीत असत. त्यातही मानापमानाचे प्रश्न असत. पशुपक्ष्यांना बळी देण्याची पद्धती फार वाईट. देवाच्या नावाने तरी गरीब प्राण्यांना नका मारू. तुम्हांला मांसमच्छर खायचे तर खा; परंतु देवाच्या नावाने हत्या कशाला! कोठे बकरे मारतात, कोठे कोंबडी, कोठे दसऱ्याला हेला मारतात. बंगालमध्ये पूजा-दिवसांत कालीमातेची पूजा असते. हजारो बोकरे मारली जातात. रक्ताचे पाट वाहतात. खरोखर हे सारे अघोरी प्रकार आहेत. परंतु अजून ते बंद होत नाहीत.

आपल्या गावात आता झोळाईची पालखी गावभर हिंडेल. प्रत्येकाच्या घरी ती जाते. पूजा करायची. नारळ द्यायचा. चांदीच्या मुखवट्याच्या मूर्ती आहेत. पालखीही सजवतात. झोळाई, सोमजाई या आपल्या गावच्या ग्रामदेवता. गावाच्या वेशीवर त्यांची देवळे आहेत. जणू गावाबाहेर राहून गावाचे या जगन्माता रक्षण करीत आहेत.

सुधा, अग पुन्हा बरीच थंडी पडू लागली आहे. यंदा आहे तरी काय? होळी जळाली, थंडी पळाली, असे आपण म्हणतो. परंतु अजून हवेत गारवा आहे. गार वारे वाहात आहेत. रात्री पांघरूण घ्यावे असे वाटते.

जे आंबे लौकर मोहरले होते त्यांच्यावर मोठमोठ्या कैऱ्या झाल्या आहेत. परवा मी कैऱ्या भाजून त्यांचे मेतकूट केले होते. तुझ्या आजोबांना ते फार आवडायचे. याला गूळ मात्र बराच लागतो. परवा आंब्याची डाळही एके ठिकाणी मिळाली. आम्ही लहानपणी आंबा किसून त्यात गूळ व थोडे तिखटमीठ घालून खात असू. आईलाही तो प्रकार आवडे. घरोघर आता आंब्याची कढी केली जाते. आंबा म्हणजे गोरगरिबांचे फळ.

सुट्टीत सेवा दलाच्या मुलांचा एके ठिकाणी या बाजूला दीड दिवसाचा मेळावा होता. लहान लहान शेकडो मुले आली होती. घरून दशमी भाकर घेऊन आली होती. कोणी कोरडे पिठले आणले होते, कोणी लसणीची चटणी, तर कोणी दोन कांदेच आणले होते. मेळाव्याला मी गेलो होतो. परंतु खरे सांगू का? मला सभोवती मुले जमवून त्यांना गोष्ट सांगणे आवडते. हल्ली काय असते? तो 'रावण' असतो. रावण म्हणजे काय ते ओळखलेस का? रावण म्हणजे लाउड स्पीकर! विनोबाजी त्याला 'रावण' म्हणतात. रावण शब्द का 'रव' म्हणजे आवाज यावरून बनला? हा रावण असला म्हणजे मुले दूर दूर रांगेत बसतात. मजा वाटत नाही. समरसता होत नाही. गोष्टीच्या वेळेस तरी सारी मुले सभोवती जवळजवळ बसावीत. मग मजा येते, गंमत वाटते. या वेळेस मी गोष्ट सांगितली नाही. मी जरा विमनस्कच होतो. परंतु चार शब्द तर सांगावे लागलेच. सुधा, मला सेवा दलाच्या मुलांना घेऊन जंगलात जावे असे वाटते. सेवा दलाचे वर्ग नको शहरात, नको खेड्यात. ते दाट जंगलात भरवावे. सृष्टीच्या सान्निध्यात, निसर्गात राहावे आठ-दहा दिवस. तेथे नदी मात्र हवी. नदीसारखा आनंद नाही. डुंबायला, पोहायला पाणी हवे. कपडे धुवायला, भांडी घासायला नदीवर जाता येते. रानातील झाडेमाडे, लतावेली, फुले यांची मुलांना ओळख करून देता येईल. आपल्याला कशाची माहिती नसते. चार झाडांची, चार फुलांची नावे माहीत नसतात. सुधा, मोठमोठ्या जंगलात प्रचंड वेली प्रचंड वृक्षांवर चढलेल्या असतात. कधी दोरांप्रमाणे त्यांचा उपयोग करून वर चढता

येते. जणू वृक्षांनी खाली सोडलेले मजबूत दोर. कधी दोन झाडांच्या मधून या वेली गेलेल्या असतात. त्यांच्यावर झोके घेता येतात. भारतीय संस्कृती तपोवनात जन्मली, सृष्टीच्या सान्निध्यात संवर्धिली गेली.

आणि तेथे पांखरांची ओळख होते. नाना रंगाचे नि आकारांचे पक्षी, त्यांचे ते निरनिराळे आवाज. आपल्या पालगडच्या किल्ल्याजवळच्या राईत मोर आहेत. लहानपणी त्यांचा आवाज ऐकला म्हणजे मी नाचत असे. मोरांचा तो उत्कट आवाज मला फार आवडतो. मोरोपंतांनी देवाचा धावा मांडला, त्याला त्यांनी 'केकावली' असे नाव दिले. 'आर्या केकावली' व 'पृथ्वी केकावली' अशा दोन केकावली मोरोपंतांनी लिहिल्या. पृथ्वी वृत्तातील त्यांची केकावली फार प्रसिद्ध आहे. विनोबाजी विद्यार्थी असताना बडोद्यास केकावलीतील श्लोक मोठ्याने म्हणत व सारी आळी दणाणीत. मला केकावली फार आवडे. मी ती सारी पाठ केली होती. 'सुसंगति सदा घडो' वगैरे केकावलीतील श्लोक पूर्वी मुलांना पाठ येत. मोराच्या आवाजाला 'केका' असा शब्द आहे. मोरोपंतांनी स्वतः मोर कल्पून या काव्याला केकावली असे नाव दिले.

पाखरांचे आवाज ऐकण्यात एक विशिष्ट आनंद असतो. दुपारची वेळ व्हावी. पक्षी वडासारख्या मोठ्या झाडावर दुपारी विसावा घ्यायला बसतात. गोड किलबिल चाललेली असते. अशा वेळेस झाडांच्या बुंध्याशी डोके ठेवून ती किलबिल ऐकत ऐकत झोपी जाण्यात एक मधुर सुख असते. मला पाखरे पाहण्याचा लहानपणी फार नाद होता. लहानपणी आपला आत्मा मोकळा असतो. आपल्या मनोबुद्धीला जणू त्या वेळेस पंख असतात. पुढे वाढत्या वयाबरोबर शेकडो चिंता येतात. आपले पंख जणू तुटतात. हृदयावर बोजा असतो. मग का पाखरे आवडेनाशी होतात?

आई मुलाला चिमण्या, कावळे दाखवीत जेववते. तुलसीरामायणात राम बर्फीचा तुकडा कावळ्याला दाखवतो व तो त्याला पुढे पुढे आणतो असे मनोरम वर्णन आहे. सेवादलाची मुले जर जंगलात आठ दहा दिवस राहतील तर पक्ष्यांची सुरेल सृष्टी त्यांच्या परिचयाची होईल. आणि कधी रात्री वाघ

दिसेल, तरस दिसेल, कोल्हा दिसेल. कधी जवळून सळसळ करीत साप जाईल. अनेक अनुभव येतील. जीवन अनुभवाने समृद्ध करणे याहून महत्त्वाचे दुसरे काय आहे?

अलीकडे सेवादलाचा विचार करताना माझ्या मनात अनेक गोष्टी येत असतात. ज्या गावात सेवादल आहे त्या गावात सुंदरशी फुलबाग असायलाच हवी. सेवादलाने लहानशी वा मोठी जागा मिळवावी. तेथे खेळ. तेथे गाणी. तेथे त्यांची बाग. तेथे फळभाज्या. खेड्यापाड्यांतून कोठेही सुंदरशी बाग नसते. सायंकाळी लोक जेथे घटकाभर जाऊन बसतील अशी एक तरी रमणीय जागा गावात नको का? सेवादलाने सौंदर्याचे उपासक व्हावे.

सौंदर्य दोन प्रकारचे आहे. आंतरिक व बाह्य. जीवनात सुंदरता कशाने येईल? सत्याने येईल, सेवेने, प्रेमाने येईल. आपण ज्या वेळेस खोटे बोलतो त्या वेळेस आपण सुंदरता गमावतो. मुखावरची प्रसन्नता जाते. हृदय वाकडे होताच तोंडही वाकडे होते. इमर्सन म्हणून अमेरिकन लेखक होऊन गेला. तो लिहितो, "तुमचे सारे अंतरंग तुमच्या मुखावर लिहिलेले असते." महात्माजी सौंदर्याच्या रूढ अर्थाने सुंदर नसतील, परंतु त्यांच्या तोंडावरचा आनंद, त्यांच्या तोंडावरील प्रसन्नता असीम होती. सत्याचे ते सोज्ज्वल प्रतिबिंब असे. आणि तुम्ही प्रेम करीत असाल तर तुमचे डोळे किती गोड दिसतात, तुमच्या मुखावर कशी कोवळीक असते! सत्य, शिव, सुंदर असे शब्द आपण वापरतो. ज्या मानाने जीवनात सत्य, शिव आणाल त्या मानाने सुंदरता येईल.

समाजात बाह्य घाण आहे आणि विषमतेची घाण आहे. बाहेरचा केर-कचरा वगैरे घाण दूर करून तेथे आपणास सुंदरता आणायची असते. समाजातील विषमतेची कुरूपताही दूर करीत सर्वांच्या संसारात सुंदरता आणायची असते. असे खरे कलावान फार दुर्मिळ. आज समाजात कुरूपता फार आहे. लाखो लोकांना रहायला घर नाही, सोन्यासारख्या मुलांचे संगोपन होत नाही. ही कुरूपताही दूर करायची आहे, सौंदर्याची उपासना, समाजात अन्तर्बाह्य सौंदर्य निर्माण करणे, हेच मानवजातीचे परम प्राप्तव्य होय. सेवादलाच्या सैनिकांनी जीवनात सुंदरता आणावी, बाहेरची घाण दूर करून

आपापल्या चाळीत सुंदरता आणावी, फुलबागा, फळबागा कराव्यात, निर्मितीचा आनंद लुटावा; आणि पुढे समाजातील अन्याय जावा, विषमता जावी, सर्वांच्या जीवनकळ्यांचा सुंदर विकास व्हावा म्हणूनही निर्मल सुंदर साधनांनी झगडावे, धडपडावे.

आज भारताची सत्त्वपरीक्षा आहे. भारत सर्वांना जवळ घेणार की तोही इतरांप्रमाणे संकुचित होणार? ज्यांना जायचे असेल त्यांनी जावे. परंतु जे राहू इच्छितात त्या सर्वांना आम्ही प्रेम देऊ. सर्वांना मानव म्हणून वागवू. चतकोरातला नितकोर तुलाही देईन, ये. असे आपण म्हणू या. भारतमाता प्राचीन कालापासून सत्त्वाला जागली. हरिश्चंद्र, दाशरथी राम, शिबी, श्रियाळ सारे सत्त्वाला जागले. भारत का ती थोर परंपरा घालवणार? आपण होऊन कोणासही त्याच्या इच्छेविरुद्ध दूर नका लोटू. उलट तो जाऊ लागला तर आपणास वाईट वाटावे. आपला त्याला विश्वास वाटला नाही म्हणून तो जात आहे असे मनात येऊन डोळ्यांत पाणी यावे. सुधा, माझ्या मनात असे विचार येतात. कसोटीच्या वेळेसच जपावे लागते. दहा हजार वर्षांचे भारताचे पुंजीभूत सत्त्व – ते गमावून उपयोगी नाही. ते गमावू तर जगण्यात काय अर्थ? मागे पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले होते, "प्राचीन काळापासून भारताने थोर ध्येयांची उपासना केली आहे. ती ध्येये नसतील तर सारा अंधारच होईल!"

तुला त्या एका बुद्ध साधूची गोष्ट माहीत आहे? एकदा एका गावी दुष्काळ आला. त्या गावात एक साधू राहात असे. लोक त्याला जेवायलं देत असत. साधूच्या मनात आले, "दुष्काळात आपला बोजा कशाला?" पहाटे उठून तो निमूटपणे निघाला. सकाळी गावकऱ्यांना कळले की साधू गेला. त्याच्या शोधार्थ मंळळी धावली. साधू भेटला. "महाराज, परत चला." लोक म्हणाले. साधू म्हणाला, "तुमचाच संसार नीट चालण्याची अडचण. माझा भार कशाला?" लोक म्हणाले, "आमच्या चतकोरातील नितकोर तुम्ही घ्या परंतु जाऊ नका. आमच्या गावचे सत्त्व जाईल. दुष्काळात साधूला दवडले असे म्हणतील. तो साधू पुन्हा परत आला. 'Soul of Burma' ब्रह्मदेशाचा आत्मा म्हणून एकाने ब्रह्मदेशावर हे पुस्तक लिहिले आहे. त्यातील ही गोष्ट आहे. 'Soul of Bharat' भारताचा आत्मा म्हणून एक

पुस्तक लिहावे असे १९३२ पासून ती गोष्ट वाचल्यापासून माझ्या मनात आहे. शेकडो लहानसान गोष्टींतून व्यक्तीचा वा राष्ट्राचा आत्मा प्रगट होत असतो. कित्येक वर्षांपूर्वी दीनबंधू अॅण्ड्र्यूज यांनी आफ्रिकेतील एक अनुभव लिहिला होता. दक्षिण आफ्रिकेतील त्या गरीब वस्तीत हिंदी श्रमजीवी राहात असत. कोणत्या तरी रोगाची साथ आली होती. दीनबंधू त्या वस्तीची पाहणी करण्यासाठी गेले होते. सर्वत्र दलदल होती. लहान लहान झोपड्यांतून सारे ओलसर नि दमट. चिखल होता. झोपड्यांतून चिखलावर फळ्या घालून कशी तरी मुले झोपवलेली होती. दीनबंधू एका झोपडीत गेले. एका कोपऱ्यात मुले कशी तरी झोपवलेली होती. जी थोडीशी कोरडी जागा होती, तेथे देवांची जागा होती. तेथे नीरांजन लावलेले होते, उदबत्ती होती. दीनबंधू म्हणाले, "त्या दरिद्री झोपडीत उदात्ततेचे दर्शन झाले. प्रभूची निर्मळ भक्ती दिसली."

असा हा आपला भारतीय वारसा आहे. शत्रू सतावीत आहेत. आपणासही पशू करण्याची त्यांची कोशीस आहे. आम्ही पशू झालो परंतु अजून ते कसे होत नाहीत असे त्या शत्रूंच्या मनांत जाचत आहे. आपण पशू न होता पशुपतीच राहिले पाहिजे. हलाहल पिऊन शिवशंकर झाले पाहिजे. महात्माजींचे ते बलिदान व्यर्थ न जावो. ते भारतास सांभाळो, सत्त्वच्युत होऊ न देवो.

ईश्वराच्या दृष्टीने सारी मानवजात, एवढेच नव्हे तर सारे विश्व एक आहे. आपण एकाच बोटीत सारे बसलेले आहोत. दुसरा कोणी भोक पाडू लागला तर का आपणही पाडायचे? तसे करू तर बोट लौकरच बुडेल. आपण मारक न होता तारक व्हावे.

सुधा, माझ्या मनात असे विचार येत असतात, ते कोणाला सांगू? सेवादलास मधून मधून सांगत असतो. परंतु माझ्याजवळ तरी ते राहोत.

ती. सौ. अक्का भेटली होती. ती खूपच ग अशक्त दिसली. खरे म्हणजे तिला हवी विश्रांती, परंतु विश्रांती कशी मिळायची? ती महिनाभर तुमच्याकडे येणार आहे. तेवढीच प्रकृती सुधारेल. त्यातल्या त्यात होईल ते करायचे.

तू बडोद्यास न जाता बोर्डीसच राहणार आहेस हे ऐकून बरे वाटले. ज्या शाळेत इतकी वर्षे शिकलीस तेथूनच शेवटची परीक्षा पास हो. पुन्हा तेथील हवापाणी, तो सुंदर समुद्र, त्या नारळी तुला अन्यत्र कोठे मिळणार? इंग्रजीचा थोडा अधिक अभ्यास कर. संस्कृत वाचीत जा. शे-दोनशे सुभाषिते पाठ कर. म्हणजे खूप उपयोग होईल. पास तर तू पहिल्याच वर्षी होशील यात शंका नाही. आनंदाने सारी असा.

ओले काजूचे गर, कोणी येणारा जाणारा भेटला तर पाठवीन. हे गर काढणे कौशल्याचे असते. काजूच्या फळाच्या पुढे ती बी असते. कच्ची असताना ती तोडायची. दगडावर जरा घासायची. मग काडीने आतील गर काढायचा. हातांना तेल लागते, ते एखादे वेळेस उभारतेही. हे ओले गर आमटीत, अळवाच्या भाजीत छान लागतात. पिकलेले काजूही आता मिळतात. मीठ लावून खायचे. एखादा काजू रसाळ असतो. एखाद्याची खवखव लागते.

परवा आजोळच्या परसवात गेलो होतो. मी एकटाच त्या विहिरीवर गेलो होतो. किती तरी आठवणी आल्या. तो काळांबा गंभीरपणे उभा होता. त्याच्यावर खूप आंबे आले आहेत. याचेच आंबे काढताना शेजारचे गोविंद-भटजी पडले होते. त्यांचा पाय त्यामुळे कायमचा अधू झाला होता. एकेक झाड परंतु ते माझ्याजवळ बोलत होते. ती झाडे तेथे होती. परंतु ती माणसे कोठे आहेत?

रघुवंशात एके ठिकाणी सुंदर वर्णन आहे. पुष्पक विमानात बसून राम, सीता, लक्ष्मण वगैरे सारी लंकेहून अयोध्येस जात असतात. रामराया सीतेला विमानातून सारे दाखवीत असतात. येथे मी तुझ्यासाठी रडलो, येथे हनुमान भेटला, येथे शबरी भेटली वगैरे राम सांगत होते; आणि एका आश्रमाकडे बोट करून म्हणाले, "या आश्रमात कोणी राहात नाही आता; परंतु आदरा-तिथ्य करणाऱ्या ऋषींची परंपरा या आश्रमांतील वृक्षांनी पुढे चालविली आहे. आश्रमात कोणी आले तर हे वृक्ष फुलं देतात, फळं देतात." मानव-धर्माचा आचार करण्यात सृष्टीही जणू सहभागी.

गोविंदभटजींची तुला माहिती नाही, परंतु ते अती समाधानी. आमच्या आईला ते प्रेमाने ' आवडी ' म्हणून हाक मारायचे. कधी कुठे भाजी मिळाली तर आणून द्यायचे. जुन्या लोकांतील एक प्रेमळ समाधानी वृत्ती आज दिसेनाशी झाली आहे.

तू नवीन पुस्तके घेतलीस का ? लौकर घे. त्यांना कव्हरे घाल. नाही तर अक्काच्या कुमूची पुस्तके तुला होतील. तिला पत्र पाठवून विचार.

आशा, पपी, अशोक वगैरेंस, तसेच शालू, मालू, अरुण, शोभा वगैरे सर्व मुलांस सप्रेम आशीर्वाद. गोदावरीच्या मुलांसही. अरुणाच्या ल्हान सवंगड्यांस गोड गोड चिमटे. ताई व अप्पा यांस स. प्र.


अण्णा

ता. क.

तुमच्या चित्रेकाकांचे चुलते देवाघरी गेल्याचे वाचले. पत्ते खेळताना जोराने पत्ता आपटला एवढेच निमित्त ! कसे हसतखेळत मरण ! आर्यन् ए. सोसायटीचे ते कित्येक वर्षे प्रमुख होते. त्यांची गीतेवर श्रद्धा. बोर्डीला १९३३ मध्ये गीताजयंतीला गीतेवर प्रवचन देण्यासाठी ते आले असताना त्यांची माझी प्रथम ओळख झाली. ते पुरोगामी विचारांचे होते. रूढींचे कट्टे शत्रू होते. ते खरे कर्मयोगी होते. एक थोर निर्भयसेवक गेला. त्यांच्या स्मृतीस प्रणाम !

साधना, ४ मार्च १९५०

★ ★ ★



चि. प्रिय सुधास,
सप्रेम आशीर्वाद.

तुमची सुट्टी संपली. परीक्षेची सुट्टी व शिमग्याची. आता मे महिन्यात सुट्टी. तोवर नाही. गुढीपाडव्याची व रामनवमीची मध्यंतरी मिळेल. नवीन जोमाने नि उत्साहाने तुम्ही अभ्यास करू लागाल. पुस्तकांना कव्हरे घालाल, वह्यांवर नावे घालाल. नव्याचे नऊ दिवस. त्या पुस्तकांची व वह्यांची पुढे तितकी काळजी कोण घेतो? मुलांची परीक्षा त्यांच्या पुस्तकांवरून, वह्यांवरून करावी. मुलगा गबाळ आहे की व्यवस्थित आहे हे त्यावरून दिसेल. पुस्तकांची नीट काळजी घ्यावी. परंतु स्वतःच्या पुस्तकांचीही आपण काळजी घेत नाही, मग दुसऱ्याच्या कोण घेणार? ग्रंथालयातून पुस्तक घरी आणतात, परंतु सार्वजनिक कर्तव्याची जाणीव ठेवून ती पुस्तके कोणी नीट वापरीत नाही. तुला तो जुना श्लोक माहीत आहे का?

जलाद्रक्षेत् स्थलाद्रक्षेत्, रक्षेत् शिथिलबंधनात् ।
मूर्खहस्ते न दातव्यम्, इत्थं वदति पुस्तकम् ॥

पुस्तक सांगते : "पाण्यापासून मला वाचवा, वाटेल तेथे ठेवू नका, मूर्खांच्या हातात देऊ नका;" परंतु पुस्तकाची ही प्रार्थना कोण ऐकतो?

मराठीतले थोर कादंबरीकार हरिभाऊ आपटे तुला माहीतच आहेत. उषःकाल, पण लक्षात कोण घेतो, वगैरे त्यांच्या कादंबऱ्या वाचल्या नसल्यास तर वाच. हरिभाऊंना पुस्तकांचे फार वेड. पुस्तकांना कव्हरे घालीत ते बसायचे. जणू मुलांमुलींनाच सजवीत आहेत असे वाटायचे. लोकमान्य टिळकही पुस्तकांना फार जपायचे. मंडालेच्या तुरुंगातून लिहिलेल्या पत्रांत ग्रंथालयातील पुस्तकांची काळजी घ्या, म्हणून सांगायचे. एकदा त्यांना कोणती तरी पुस्तके हवी होती. घरी सापडत ना. त्यांनी रागाने लिहिले. सुधामाई, व्यवस्थितपणा हा फार मोठा गुण आहे. माझ्या आईचे वडील फार व्यवस्थित होते. ते म्हणायचे, एखादी वस्तू लागली तर– तर ती अंधारातही नेमकी मिळायला हवी. लहानपणी मी कोयती नीट जागेवर ठेवली नाही म्हणून त्यांनी मला मार दिला होता. एकदा लेखणी करायला चाकू घेतला नि मी कुठे तरी ठेवला. ते रागे भरले. मी फार व्यवस्थित नसलो तरी बेताचा व्यवस्थित आहे. मुंबईस माझ्या मित्रांच्या खोलीत कधी गेलो तर आधी नीटनेटकेपणा मी थोडा आणतो; परंतु त्यांच्या न कळत करतो ते काम. नाही तर आपल्याला लाजवीत आहेत असे त्यांना वाटायचे.

आम्ही येरवड्याच्या तुरुंगात होतो. तेव्हा माझ्या एका मित्राच्या टेबलावर पसारा असे, तो मी नीट लावून ठेवायचा. त्या मित्राला ते आवडत नसे. तो एरव्ही नीटनेटका व्यवस्थित. परंतु टेबलावर अनेक वस्तू पसरलेल्या. तो मला म्हणायचा, "या पसाऱ्यात आमची व्यवस्था असते. वस्तू पसरलेल्या असल्या म्हणजे हवी ती पटकन सापडते!" मी त्याला म्हणे, "मुंबईला उद्या लहानशा खोलीत लग्न होऊन तुला संसार थाटायचा झाला तर का खोलीभर वस्तू पसरून ठेवशील? लहानशा खोलीत हुशार बायको सारं कसं व्यवस्थित ठेवते. तू का उद्या आपल्या बायकोला म्हणशील; सारी अडगळ खोलीभर मांडून ठेव म्हणून?" तो मित्र हसे. तुला आपले चंद्रोदय माहीत आहेत ना? त्यांच्या खोलीत जाऊन मी त्यांची खोली नीट लावून ठेवायचा. ते मग म्हणायचे : "तुम्ही येऊन गेला होता वाटतं खोलीत?" ते गावी निघाले म्हणजे

पुष्कळदा त्यांची वळकटी मी बांधून द्यायचा. ते म्हणायचे : "तुम्ही महाराष्ट्रीय लोक फार व्यवस्थित." मी म्हणायचा, "तुम्ही बंगाली लोक कवी! कवीला ना भान ना बंधन!" ते हसायचे.

सुधा, तुझ्या आईमध्ये अनेक गुण होते. परंतु तिचा व्यवस्थितपणा मला नेहमी आठवतो. तू व्यवस्थितपणाची उपासना कर. सारे काम स्वच्छ व नीटनीटके करावे. अव्यवस्थितपणा हा आपला राष्ट्रीय दुर्गुण आहे. तो घालवला पाहिजे. व्यवस्थितपणा म्हणजेच सुंदरता. कोणतेही काम वेळच्या वेळेस करणे, कोणतीही वस्तू नीट जागेवर ठेवणे, पैशांचा व्यवस्थित हिशेब ठेवणे, दिलेल्या शब्दाप्रमाणे वागणे, तिकिटे रांगेत नीट उभे राहून घेणे, क्यूत नीट उभे राहून बसमध्ये शिरणे, शेकडो गोष्टी व्यवस्थितपणात येतात. आम्ही दहा माणसे; जेवायला जमलो तरी किती घोळ घालतो. युद्धे वाईटच; परंतु युद्धे करायलाही अनेक गुणांची जरूर लागते. अग पहिल्या महायुद्धाच्या वेळेस जर्मनीने पूर्व सरहद्दीवरून लाखो सैन्य पटकन पश्चिम सरहद्दीवर आणले. लाखो लोकांची व्यवस्थित ने-आण करणे, त्यांचे खाणेपिणे, शेकडो गोष्टी; परंतु यंत्रासारख्या होत असतात. भारताने व्यवस्थितपणा अंगी बाणवून घेतला पाहिजे. नाना फडणिसांची व्यवस्थितपणाबद्दल फार ख्याती. तुळशीबागेत नाना कीर्तनाला जायचे. ते येताच एकदम सारे शान्त होत असे. इंग्रजांनी, नाना म्हणजे व्यवस्था, असे गौरवाने म्हटले आहे.

तू म्हणशील अण्णाने हे काय 'व्यवस्थापुराण' आज सुरू केले आहे! शिमग्याच्या गंमतीजंमती का तुला हव्या आहेत? पुण्याच्या एका मित्राचे पत्र आले. पुण्यात शिमगा वगैरे सारे बंद. मुंबईत मधून मधून होता म्हणे. उत्तर हिंदुस्थानचे भय्ये शिमगा खेळल्याशिवाय थोडेच राहणार? एकमेकांच्या अंगावर रंग उडवण्याची मजा. गोकुळात बलराम आणि कृष्ण रंग खेळायचे. होळीला बुक्का, गुलाल उधळायचे. ते प्रसिद्ध गाणे तुला माहीत आहे?

"जमुनातट राम खेले होरी जमुनातट"

यमुनेच्या तीरावर बलराम होळी खेळत होते. उत्तरेकडे धूलिवंदनाच्या दिवशीच रंग खेळतात. त्या दिवशीच अंगावर रंग उडवतात. सुधा, मुंबईला

बंगाली लोक आहेत ना ! काय मस्त खेळतात रंग ! त्यांच्या बायकाही त्यात भाग घेतात. लहानथोर नाना रंगांनी रंगून जातात. आज ना कोणी बडा, ना छोटा. आज अंगावर रंग उडवला म्हणून कोणी रागवायचे नाही. ती गंमत मानायची सर्वांनी. जणू समता अनुभवायची.

धूलिवंदन ! आज का भूमीचा महिमा ? अरे, ती धूळ तुच्छ नका मानू. लागू दे ती जरा अंगाला. ऋषी म्हणतो :

" मधुमत् पार्थिवं रजः । "

तो मातीचा कण तोही गोड समज. रवीन्द्रनाथ गीतांजलीतील एका गीतात म्हणतात, " मला दागिने घालून सुंदर वस्त्रे परिधानवून त्या धुळीतील खेळांपासून हे मला दूर ठेवतात. पृथ्वीच्या आरोग्यदायी स्पर्शापासून मला दूर ठेवतात. " अगदी पोषाखी नका बनू , असे का धूलिवंदनाचा सण सांगतो ? का जेथे सर्व वाइटाचे भस्म केले तेथील भूमी पवित्र झाली. ते भस्म वंदायचे. होळीचा अर्थ काय ? काय जाळायचे ? ती लाकडे, त्या गोवऱ्या म्हणजे काय ? खरे म्हणजे आपल्या मनात लपून बसलेल्या सर्व वाईट गोष्टी आज बाहेर काढून त्यांचे भस्म करायचे असते. देवा शंकराने कामदेवाला जाळले. त्याची ही खूण असे कोणी म्हणतात. मनातले जमलेले सारे बरबट आज बाहेर फेकायचे. निर्मळ व्हायचे. तो होम म्हणजे व्यक्तीच्या जीवनातील, सामुदायिक जीवनातील जे जे वाईट, त्याचे त्याचे भस्म करणे होय. तो जुना सण ठेवावा. हा नवीन अर्थ यात ओतावा. अचकटविचकट अभद्र बोलणी बंद करावी. अज्ञान, भेद, आलस्य, भीती, भांडणे, भोगवासना, स्वार्थ नाना दुर्गुणांचे प्रतीक म्हणून एक गवताचा, चिंध्यांचा पुतळा करावा. त्याचे भस्म करावे. गावाची सुधारणा करण्याचे नवीन संकल्प करावेत. गावातील जुनी भांडणे आज भस्म झाली. आता प्रेमाची रंगपंचमी रंगो. सारे एकत्र खपू, हसू , खेळू, शिकू निर्मू. मौज.

माझ्या लहानपणी आपल्या गावात जितके खेळये येत तितके आता येत नाहीत. समुद्रकाठच्या गावी कोळयांचा नाच असतो. एका माणसाच्या कमरेभोवती पुढेमागे कागदी रंगीत होडी असते. तो मध्ये उभा राहून त्याच्या भोवती इतर मंडळी हातात छोटी छोटी वल्ही घेऊन नाचतात. मजेदार

गाणी म्हणतात. वाद्ये वाजत असतात. काही ठिकाणी ढोल, लेझीम यांचे खेळ चालतात.

पुण्यामुंबईकडे शिमग्याच्या सणाला लहानमोठ्या मुलांना साखरेच्या माळा खाऊ म्हणून देतात. कोकणात ही प्रथा फारशी नाही. देशावर फार. पुढेही आठ दहा दिवस कोणी भेटले तर त्याला साखरमाळांची भेट द्यायची. साखरेत रंग मिसळून नाना आकारांची साखरी पदके करून त्यांची ही माळ करतात. माझ्या लहानपणी रामनवमीच्या यात्रेत आपल्या गावात ही साखरेची दुकाने येत. साखरेच्या नाना वस्तू. साखरेचे उंट, साखरेचे हत्ती. मग आम्ही त्याचा पाय खायचे, शेपूट खायचे ! मुलांना गंमत वाटते. आणि पुढेही काही दिवस जेवताना भाकरीचे निरनिराळे आकार करून मुले खातात ! आई मला एकदा रागे भरली होती. मी दातांनी तुकडे तोडून भाकरीचे हत्ती घोडे करीत बराच वेळ जेवत बसलो म्हणून !

तुम्ही साखरेच्या माळा घेतल्या का ? अरुणाच्या गळयात घातलीत का केशरी साखरमाळा ? पुढे गुढीपाडव्याच्या वेळेस गुढी उभारताना साखरेची माळही गुढीवर चढविण्याची देशावर पद्धत आहे. सध्या साखरेचे दुर्भिक्ष तरीही साखरेच्या माळा दिसत होत्या.

अग आपल्या मारुतीच्या देवळासमोरच्या होळीत वामनाने नारळ टाकला ! होळीत नारळ फुटतो ! फुटलेल्या नारळाच्या करवंट्या काढून मग त्यातील खोबरे प्रसाद म्हणून खावयाचे. नारळ ताड्कन फुटला ! आणि रघू गेला काढायला. काठीने करवंट्या ओढीत होता. तो एकदम त्याचा तोल गेला. होळीतच पडायचा, परंतु गणूकाकांनी त्याला एकदम ओढले म्हणून वाचला. होळीच्या वेळेस असे अपघात होतात. कधी ठिणग्या किटाळे उडून आगी लागतात. कोकणातील गवतारू घरे. एक ठिणगी पडली तरी भडका उडायचा. आजूबाजूला पेंढ्यांच्या उडव्या असतात. धोका असतो. कधी कधी पेटलेली किटाळे किती दूर जाऊन उडत ! आगीची जगू उडती पाखरे !

फुटलेला नारळ बघताच मला ती सुधन्व्याची गोष्ट आठवते. तुला आहे का माहीत ? धर्मराजाने अश्वमेध यज्ञ केला. अर्जुन अश्वमेधाचा घोडा घेऊन

दिग्विजयाला निघाला. हंसध्वज राजाच्या राज्यात तो आला. हंसध्वजाने घोडा धरला. युद्ध सुरू झाले. जे जे तरुण आहेत त्या सर्वांना उद्या सूर्योदया-बरोबर युद्धासाठी बाहेर पडावे अशी दवंडी देण्यात आली. हंसध्वजाचे दोन मुलगे. सुरथ नि सुधन्वा अशी त्यांची नावे. सुधन्वा युद्धासाठी जायला निघतो. परंतु त्याची प्रिय पत्नी म्हणते : “ आजचा दिवस थांबा, उद्या जा. ” शेवटी तो घरी राहतो. दुसऱ्या दिवशी तो जातो. राजाचे शंख आणि लिखित या नावाचे दोन पुरोहित असतात. ते राजाला म्हणतात, ‘ जो दवंडीप्रमाणे येणार नाही त्याला तापलेल्या तेलात टाकण्यात येईल, असे आपण घोषविले होते. तुझा मुलगा काल आला नाही. एक दिवस घरी राहिला. न्याय निःपक्षपाती हवा. तुझ्या मुलाला ही शिक्षा व्हायला हवी. ’ हंसध्वज राजाचे डोळे भरून आले. परंतु प्रजेने नावे ठेवू नयेत व सर्वांना समान न्याय असावा म्हणून आपल्या मुलाला तो ती शिक्षा देतो. कढईत तेल सळसळत असते. सुधन्वा त्यात टाकला जातो. तो देवाचा परम भक्त. त्याला ते तप्त तेल थंडगार वाटते. सरोवरात कमल हसावे त्याप्रमाणे त्याचे मुखकमल हसत असते. तेल नीट तापले नसावे असे शंख व लिखित यांना वाटते. ते चुल्यात मोठी लाकडे घालतात. तेल तापले की, नाही बघायला एक जण त्यात नारळ टाकतो. तो त्या नारळाचे ताड्कन दोन तुकडे होऊन एक शंखाच्या कपाळात व दुसरा लिखिताच्या कपाळात बसतो. तेल तर तापलेले आहे ! हा देवाचा परमभक्त आहे असे सर्वांच्या ध्यानात येते ! त्याला बाहेर काढतात. तो मग अर्जुना-जवळ लढतो. जैमिनीअश्वमेध म्हणून मराठीत ओवीबद्ध ग्रंथ आहे. त्यात मला वाटते ९६ अध्याय आहेत. अश्वमेधाच्या या युद्धाच्या कथा त्यात आहेत. चंद्रहास्य, बभ्रुवाहन, दुंदुभी, मयूरध्वज वगैरे अनेकांच्या रोमांचकारी कथा त्यात आहेत. लहानपणी हा जैमिनीअश्वमेध मला जणू पाठ होता. पाठच्या भावांना आंदुळताना मी त्या ओव्या म्हणायचा ! सुधा तुला या साऱ्या गोष्टी माहीत आहेत का ? गद्य गोष्टींच्या रूपाने त्या झाल्या असतील. तुमच्या मुलांच्या ग्रंथालयात असतील. दादांनी तुला आतील काही गोष्टी तोंडी सांगितल्याही असतील !

चौदा मार्चला तुझा वाढदिवस. मी चुकून १८ फेब्रुवारीलाच समजलो. वाढदिवसाची भेट म्हणून सुंदरशी झरणी तुला आम्ही पाठवली आहे. ती

मिळालीच असेल. वाढदिवशी आनंद करा. काही गोडधोड करा. आमची आठवण करून द्या.

येथे हल्ली कुंदाच्या फुलांना बहर आला आहे. येथे असतीस तर कुंदाच्या फुलांची वेणी करून केसांत घालतीस. कुंदाचे फूल साधे; परंतु किती स्वच्छ! पांढरे पांढरे ते फूल! वेली बहरल्या आहेत. मी तुला मागील पत्रात शेवरीच्या झाडांबद्दल लिहिले होते. नुसती लाल झाली आहेत. वर पान नाही एक. या लाल फुलांची केळ्याच्या आकाराची बोंडे होतात आणि पुढे बोंडे फुटून त्यातला तो नाजूक कापूस वाऱ्यावर सर्वत्र जातो. ल्हानपणी आम्ही हा कापूस गोळा करीत असू. ज्याच्या डोक्यात फार उष्णता असते त्याला शेवरीच्या कापसाची उशी देतात.

शिरीषाच्या झाडांवरही थोडी थोडी फुले दिसतात. त्यांना नवीन पालवी फुटत आहे. अनेक झाडांना कोवळी कोवळी नवी पालवी फुटत आहे. सृष्टि-माता नवीन वर्षाची नवी वस्त्रे सर्वांना देत आहे. ही कोवळी पाने लवलवीत किती सुकुमार दिसतात! करंजांच्या झाडांवर नुसत्या वाळलेल्या करंज्याच आहेत. तुमच्या बोर्डी–घोलवड स्टेशन रस्त्याच्या दोन्ही बाजूंना करंजांची झाडे आहेत. त्यांच्यावरील करंज्या फुकट जातात. ल्हानपणी आम्ही या करंज्या फोडून आंतील बिया काढीत असू. वडील तेल्याकडून त्यांचे तेल काढून आणीत. कडू–करंजेल तेल दिव्यांनाही वापरीत. हे तेल औषधी आहे. खरजेवर, गुरांच्या किवणावर लावतात. मी ल्हानपणी या तेलाच्या दिव्यावर अभ्यास केला आणि पुण्याला मामांकडे गेलो तर रॉकेलच्या दिव्याने डोळे दिपायचे!

वसंतऋतू येत आहे. झाडे नववस्त्रे धारण करीत आहेत. फुलाफळांना बहर येत आहे. आम्ही ४१ साली धुळे तुरुंगात होतो. पिंपळाचा दीड दोन पुरुष उंच माडा तेथे होता. त्याच्यावर एक पान नव्हते; परंतु हळूहळू कोवळी पाने आली नि सुंदर दिसू लागले झाड! पिंपळाचे टोकदार पान नेहमी हालत असते. जणू घाणीला दूर रहा, दूर रहा म्हणत असते.


आता करवंदे पिकू लागतील. रानात चुरचुर असा फोडणीचा आवाज येईल. तो एक प्रकारच्या पाखरांचा आवाज असतो. आम्ही मुले म्हणत असू, करवंदांना फोडणी देण्यात येत आहे, तिचा हा आवाज!

तुम्ही यंदा तरी उन्हाळयाच्या सुट्टीत कोकणात या. फणस, आंबे, काजू, करवंदे, अळू, कोकंब, जांभळे, सारे रसाळ मेवे आस्वादायला या. आता उन्हाळा होऊ लागला. मी दुपारच्या वेळेस करंदीकरांच्या विहिरीत या गार जागी जाऊन बसतो. किती गार वाटते नाही तेथे? आपले काका, दत्तोपंत, पांडूतात्या वगैरे फार पूर्वी तेथे दुपारी पत्ते खेळायचे. मला त्या आठवणी येतात. नाना आठवणी हीच माझी संपत्ती. चि. प्रिय अरुणाला स. आ. अप्पा, सौ. ताई यांस स. प्र. व आनंदास व इतरांसही स. आ.

अण्णा

साधना, ११ मार्च १९५०

* * *



चि. प्रिय सुधास,
सप्रेम आशीर्वाद.

तू माझ्या पत्राची वाट पाहात असशील. कधी कधी पत्र लिहिणे नाही जमत. कधी इतर काम निघते, कधी मन अप्रसन्न होते. प्रसन्न मनाने मुलांना लिहावे. टॉलस्टॉय हा फार मोठा लेखक. त्याने कोठे तरी लिहिले आहे की, संतापलेल्या आईच्या अंगावरचे दूधही विषारी होते. तिचा संताप त्या दुधात उतरतो. मुलाला पाजताना मातेचे मन प्रसन्न हवे; परंतु प्रत्येक लहान वा मोठी गोष्ट करताना मन प्रसन्न असावे असे मला वाटते. प्रसन्नता म्हणजे परमेश्वराचा आशीर्वाद. लहान मुलांजवळ तरी आम्ही प्रसन्नपणे वागायला हवे. त्यांच्या वाढत्या जीवनाभोवती नको निराशेचे वातावरण, नकोत द्वेषमत्सर. मागे दहा वर्षांपूर्वी स्पेनमध्ये एकीकडे भांडवलवाले व एकीकडे श्रमणारी जनता यांचे युद्ध चालले होते. पंडित जवाहरलाल त्या वेळेस तेथील श्रमणाऱ्या जनतेच्या सरकारचे पाहुणे म्हणून एक दोन दिवस गेले होते. विमानांचे हल्ले होत होते. घरे पेटत होती, उद्ध्वस्त होत होती. परंतु लहान मुलांच्या राहण्याची सोय भूमिगत निवासात करण्यात आली होती. तेथे त्यांचे जेवण

खाण, तेथे त्यांचे खेळ. तेथे ती गात, हसत, शिकत. नवीन पिढीसमोर मानवाच्या दुष्टतेचे प्रदर्शन नको. किती सुंदर ही दृष्टी, नाही का ?

शिमगा संपला. होळी गेली. रंगपंचमी गेली. रंगपंचमी महाराष्ट्राच्या इतिहासात दोन गोष्टींनी अजरामर झाली आहे. शहाजी व जिजाई बालस्वभावानुसार एकमेकांवर गुलाल फेकतात. त्या वेळेस लखूजी जाधव व मालोजी यांची झालेली बोलणी वगैरे सारा इतिहास महाराष्ट्राला माहीत आहे. आणि सवाई माधवराव पेशव्यांच्या वेळेसही पुणे शहरात एकदा रंगपंचमी थाटाने गाजली. शाहिरांनी तो प्रसंग वर्णिला आहे. पेशवाईतील मोठमोठी कर्तबगार माणसे रंग खेळत आहेत.

फाल्गुनाच्या कृष्णपक्षात तुकाराम व एकनाथ दोन संतांच्या पुण्यतिथ्या. तुकारामांना देवाघरी जाऊन तीनशे वर्षे झाली. देहूला यंदा हजारो वारकरी जमले होते. खेड्यापाड्यांतून ही मंडळी आली. वर्तमानपत्रांतील इतर गोष्टी त्यांच्या कानावर नसतील गेल्या. परंतु तुकारामांना जाऊन तीनशे वर्षे झाली, या वर्षी महोत्सव आहे ही गोष्ट सर्वांना कळली.

गेल्या तीनशे वर्षांत केवढाल्या घडामोडी झाल्या ! तुकाराम जन्मले त्याच वेळेस इंग्लंडमधील धर्मच्छळाला कंटाळलेले लोक अमेरिकेत वसाहती करायला जात होते. इंग्लंडच्या साम्राज्याचा पाया घातला जात होता. इंग्रज हिंदुस्थानात आले होते. पोर्तुगीज जगभर जात होते. हिंदुस्थानात मराठ्यांची सत्ता उदयाला आली. मोगली सत्ता शिगेला पोचली. पुढे ती गडगडू लागली. मराठे बळावले. अठराव्या शतकात सारे हिंदुस्थान ते आपलेसे करणार असे वाटले. परंतु पानिपतच्या आधीच पलाशीची लढाई होते. अर्काटची लढाई होते. मद्रास व कलकत्ता येथे इंग्रजी सत्ता रोवते. पानपतानंतरही मराठे सावरतात. परंतु इंग्रजांपुढे टिकाव लागत नाही. आपण अलग अलग राहिलो. हैदर, टिपू गेले, मराठे गेले. शीखांचाही मोड होतो. पुढे ५७ झाले– तरी ते अपेशी होते.

युरोपात शोध लागतात. औद्योगिक क्रांती होते. तिच्याबरोबर राजकीय व सामाजिक क्रांती होते. नवीन कल्पना जन्माला येतात. जगाचे स्वरूप बदल

४३७ ... नारा...
... न. १०९९४

लागते. वाफेचा शोध लागून आगबोटी सर्वत्र जाऊ येऊ लागतात, आगगाड्या येतात. तारायंत्रे येतात. पुढे बिनतारी यंत्रेही आली. वीज व वाफ यांनी क्रान्ती केली. नवीन साम्राज्ये जन्मली. आशिया, आफ्रिका गुलाम झाली. इंग्रजांच्या साम्राज्याचे अनुकरण फ्रान्स, जर्मनी वगैरे राष्ट्रे करू लागली. आफ्रिकेची युरोपियन राष्ट्रात वाटणी झाली. आशियाची तीच स्थिती. परंतु जपानने डोके वर केले. त्याने इतक्या अल्पावधीत सामर्थ्य मिळविले की, जगाने तोंडात बोटे घातली. जपानमुळे आशियाई राष्ट्रात अभिमान जागृत झाला. परंतु जपान आशियात साम्राज्य स्थापू लागला. तो पाश्चिमात्यांचे अनुकरण करू लागला.

साम्राज्यशाह्या आपसात झगडणार हे दिसतच होते. पहिले महायुद्ध १९१४ ते १८ झाले. जर्मनीचा मोड झाला. राष्ट्रसंघ स्थापिला गेला. तिकडे रशियात १९१७ मध्ये क्रान्ती झाली. चीनमध्ये सन्यत्सेनने रिपब्लिक स्थापिले. हिंदुस्थानात असहकार, सत्याग्रह यांचा जन्म झाला. इजिप्तमध्ये झगलूलपाशा झगडत होता. केमालने तुर्कस्थान स्वतंत्र केले, खिलाफतीला मूठमाती दिली. राष्ट्रसंघ स्थापन झाला. परंतु स्पर्धा चालूच होत्या. इटलीत मुसोलिनी व जर्मनीत हिटलर यांच्या चळवळी वाढल्या. चीनचे लचके जपान तोडीत होता. इटलीने ॲबिसीनिया घेतला. स्पेनमध्ये लोकशाही मार्गाने स्थापन झालेल्या श्रमजीवी सत्तेविरुद्ध फ्रँकोला हिटलर व मुसोलिनी यांनी मदत केली. हिटलर एकेक प्रदेश घेत चालला आणि अखेर दुसरे महायुद्ध पेटले. जर्मनी नि जपान जग जिंकणार असे वाटले; परंतु जर्मनीने इंग्लंडवर सर्व सैन्यानिशी हल्ला केला नाही व जपानने हिंदुस्थानवर केला नाही. रशिया निकराने लढला. इंग्लंडने शर्थ केली. जर्मनी अणुबाँबचा शोध लावू पाहात होता. परंतु तो लागण्याच्या आत जर्मनी कोसळला. जपानही पडले. कारण इकडे अमेरिकेला अणुबाँब सापडला. जपानी शहरावर तो टाकण्यात आला. लाखो लोक क्षणात मेले. महायुद्ध संपले.

आपल्या देशात आपण 'चलेजाव' युद्ध केले. नेताजींनी 'आझाद सेना' निर्मिली. परंतु शेवटी फाळणी होऊनच स्वातंत्र्य मिळाले. शान्तता होईल असे वाटले; परंतु आजही पुन्हा तेच प्रश्न समोर आहेत. तेच हिंदू-मुसलमानांचे

प्रश्न. तुकाराममहाराज म्हणतील :- " बाह्य स्वरूप बदलले; परंतु मनुष्य आहे तसाच आहे. तेच हेवेदावे, द्वेषमत्सर. माझ्या वेळेस हिंदू-मुसलमान येथे लढत होते, आजही तेच प्रकार. माझ्या वेळेस तलवारीने लढत, आज जग अणु-बाँबने लढत आहे. लढाया आहेतच. मी तुमच्या लखलखाटाने दिपून जाणार नाही. सारा अंधारच आहे. तिसऱ्या युद्धाच्या जगात तयाऱ्या चालल्या आहेत. कधी सुधारणार हा मानव ? "

तुकारामाच्या वेळेस साऱ्या पृथ्वीचा शोध लागला नव्हता, यांत्रिक शोध लागले नव्हते, ध्रुवावर स्वाऱ्या नव्हत्या. गेल्या तीनशे वर्षांत हे सारे झाले. परंतु मानवी मन अजून संकुचितच आहे. एखादा राममोहन एखादा विवेकानंद, एखादे रवीन्द्रनाथ, एखादे गांधीजी, एखादा रोमा रोलाँ, एखादा आइन्स्टाइन मानवाला मानव म्हणून ओळखताना दिसतो. हीच काय ती आशा.

सुधामाई, मानवी विकास हळूहळूच होतो. इतिहास शिकवितो की, मुंगीच्या पावलाने प्रगती होत असते. आपणाला वाटले होते की, स्वातंत्र्य मिळाल्यावर सर्व प्रश्न सुटतील; परंतु आज अधिकच अंधार सभोवती आहे. आशेने, उत्साहाने धडपडत पुढे जायचे येवढेच आपले काम.

तुकारामांची पुण्यतिथी सर्वत्र उत्साहाने साजरी झाली. एकनाथांचेही स्मरण ठेवू. पैठणला म्हणे अजून तो हौद आहे, ज्यात भगवान गोपालकृष्ण कावडी आणून ओती. दंतकथा सांगतात की, किती कावडी ओतल्या तरी हौद भरत नाही; परंतु गुपचूप प्रभू येतो व कावड ओततो तेव्हाच हौद भरतो. दंतकथेतील भावार्थ घ्यायचा. मनापासून आपण जे करतो त्यात अपार शक्ती असते. द्रौपदीने दिलेल्या भाजीच्या एका पानाने कृष्णाला ढेकर आली, शबरीच्या बोरांनी रामराय सुखावले. तुला शंकराचार्यांची एक गोष्ट माहीत आहे ? ते लहानपणी भिक्षा मागत एका झोपडीजवळ आले. झोपडीत एक दरिद्री म्हातारी होती. या लहान बाळाला द्यायला काही नाही म्हणून म्हातारीला वाईट वाटले. तिच्याजवळ एक आवळा होता तो आवळाच प्रेमाने तिने शंकराचार्यांच्या झोळीत टाकला ! तो काय आश्चर्य. आकाशातून

सोन्याच्या आवळयांची वृष्टी पडली ! त्या म्हातारीने प्रेमाने दिलेल्या त्या एका आमलकात विश्वातील सारे वैभव खेचून आणायची शक्ती होती. आजही त्रावणकोरात "सोन्याचे घर" म्हणून त्या म्हातारीचे घर दाखविण्यात येत असते.

रवीन्द्रनाथांनीसुद्धा अशीच एक सुंदर कविता लिहिली आहे: "तू, राजराजेश्वर, सोन्याच्या रथातून आलास आणि माझ्यासारख्या भिकाऱ्यापुढे हात पसरलास. माझ्या झोळीतला एक दाणा मी तुझ्या हातावर ठेवला. मी घरी गेलो. पाहतो तो झोळीतील दाण्यातील एक दाणा सोन्याचा झाला होता. मग वाटले, सारेच धान्य त्याला दिले असते तर !" जे जगाला द्याल ते फुकट नाही जाणार; आणि हृदय ओतून जे द्याल त्याची तर किंमतच नाही.

सुधा, मला या गोष्टी फार आवडतात. साध्या गोष्टी; परंतु केवढी शिकवण असते त्यांच्यात. तुरुंगात मी अशा छोट्या छोट्या गोष्टी रात्री मित्रांना सांगायचा. आम्ही अंथरुणावर पडलो म्हणजे ते मला म्हणायचे, "तुमचे किस्से करा सुरू !"

नवीन वर्ष सुरू झाले. उत्तर हिंदुस्थानात बहुतेक सर्वत्र विक्रम संवत आहे. कार्तिकात त्यांचा वर्षारंभ. आपल्याकडेच चैत्र महिन्यापासून वर्षारंभ होतो. शालिवाहन राजाचा अंमल ज्या ज्या प्रदेशावर होता, तेथे तेथे चैत्रापासूनच वर्षारंभ आहे असे वाटते.

'चैत्र-वैशाख वसंतऋतू-' असे आपण परवचा शिकवताना मुलांना शिकवतो. सर्व ऋतूंचा वसंत जणू राजा. जुन्या काळच्या मराठी पुस्तकात-

ऋतूंमध्ये हा पहिला वसंत । वाटे जनांना बहुधा पसंत ॥

असा एक श्लोक होता. साऱ्या सृष्टीत नवजीवन येत आहे, बहर आहे. सृष्टी जणू रंगपंचमी खेळत आहे. लाल लाल फुले सर्वत्र दिसतात. शेवरी, पळस, कांचन, सर्वत्र लाललाल फुले. अग, मुंबईस एक प्रकारचा पारिंगा रस्त्याच्या बाजूला लावलेला आढळतो, त्यावरही लाल तुरे दिसतात. कोकणात पारिंग्यावर लाल फुले मी कधीही पाहिली नव्हती. हा का विलायती पारिंगा ? कांचनाचेही

किती प्रकार ! कांचनाची फुले वास्तविक नावानुरूप पिवळी हवीत. कांचन म्हणजे सोने. परंतु या ऋतूत फुलणाऱ्या कांचनाला लाल फुले असतात. जाडसर पाकळ्या. आपल्या बाबूकाकांच्या परसवात लाल कांचनाचे झाड होते. खोंड्यात राहणाऱ्या गोविंद भटजींच्या घरी पांढऱ्या कांचनाचे झाड होते. काही कांचनाची झाडे पावसात फुलतात.

रानात जाऊ तर नाना प्रकारची फुले लतावेलींवर आढळतील. त्यांची नावे गावे कोण जाणे ? कुसरीचे वेल पांढऱ्या फुलांनी बहरलेले दिसतील. अग परवा एका गावी मी जात होतो. दुतर्फा जंगल होते. जंगलात मधून लाललाल काही दिसे. मला वाटे ही कसली फुले. परंतु ती फुले नव्हती, ती लालसर कोवळी पाने होती. पायरीच्या झाडांची ती पाने. किती सुंदर दिसत दुरून !

सुधामाई, चैत्र सुरू झाला तरी पहाटे अजून जरा गारवा वाटतो. धुकेही पडते. काल सकाळी आकाशात आभाळही जमून आले होते. एखादे वेळेस वादळ झाले तर आंब्याचे नुकसान व्हायचे. अजूनही काही काही ठिकाणी आंबे मोहरत आहेत. यांचे आंबे आषाढी एकादशीला होतील,– आणि वाऱ्या-वादळातून पाऊसपाण्यातून राहिले तर.

नारायणाच्या देवळात रामनवमीचा उत्सव सुरू झाला. माझ्या लहानपणी हा उत्सव फारच छान होत असे. नारायणाच्या देवळासमोर तवकडीचा मोठा मांडव घालीत. चौघडा असे. परशुरामचा चौघडा प्रसिद्ध. तो बोलावीत. किडमिडेबुवा कीर्तनाला येत. म्हातारे झाले तरी तेच येत. त्यांचे सारे दात पडले होते. त्यामुळे बोबडे बोलत.

“ लामा लामा हले हले लामा ”

असे ते म्हणायचे. आम्ही मुले त्यांची थट्टा करीत असू. रामनवमीचा उत्सव आला म्हणजे गावात नवजीवन येई, जणू राम येई. रोज रात्री ९ दिवस तास– दीड तास पालखी नाचवीत. त्याला छबिना म्हणत. ताशा वाजत असे. त्याच्या ठेक्यावर पालखी नाचवीत. महादेवनाना, भिकुभटजी वगैरे फारच छान नाचवीत. तरुण मुले प्रथमच खांद्यावर पालखी घेत व दीक्षा घेत नाचवण्याची. खरा सोहळा रामनवमीस असे. मंडपात खंडुमामा कारंजाची

सोय करीत. थुईथुई कारंजे उडे. भोवती घनदाट मंडप भरलेला. कीर्तन सुरू असे. दुपारची वेळ. भरदुपारी रामराणा जन्माला यायचा. उकडत असायचे. आपल्या गावात त्या वेळेस कीर्तनमंडपात वारा घेण्यासाठी मधून मधून प्रतिष्ठित लोकांना विंझणे वाटण्यात येत. "टळटळीत दुपारी जन्मला रामराणा." ल्हानशा रंगीत पाळण्यात रामाची मूर्ती ठेवीत. हरदासबोवा झोका देत. रामजन्माची टाळी होताच बंदुकांचे बार उडत. चौघडा सुरू होई. ताशा वाजू लागे. देवदर्शनाला झुंबड उडे. नारायणाचे देऊळ असे म्हणत, परंतु मूर्ती राम, लक्ष्मण, सीता यांच्या होत्या. फार सुंदर सजवीत मूर्ती. मूर्तीच्या पाठीमागे मोराच्या पिसांचे पंखे असत. मी लहानपणी ते ध्यान पाहात राहात असे.

इकडे मंडपात टिपऱ्यांचे खेळ सुरू होत. गोफ विणला जाई. मला टिपऱ्यांचा खेळ फार आवडतो. हिंदुस्थानभर हा खेळ आहे. हा आपला राष्ट्रीय खेळ आहे. भारताला अनुरूप. सात रंगांच्या दोऱ्यांना एकत्र गुंफायचे. विविधतेत एकता. भारतात नाना प्रान्त, नाना भाषा, नाना धर्म, नाना जाती. सर्वांमिळून एक विशाल संस्कृती निर्मावयाची. देवासमोर गोफ विणून हे ध्येय पुरे करू अशी जणू ग्वाही द्यावयाची.

मला ते ल्हानपणचे दिवस आठवतात. देवळाभोवती शेकडो दुकाने बसत. मेवामिठाईची, खेळण्याची, भांड्याकुंड्यांची. रामनवमीला रात्री बैलगाडीवरून चिंध्यांच्या केलेल्या प्रचंड हत्तीची मिरवणूक निघे. हत्तीवर कोणी तरी मुलगा बसलेला असे. रामाची लहान मूर्ती गावभर हिंडवण्यात येई. घराघरातून आरती येई, नारळ येई. आजकाल तो आनंद, तो उत्साह नाही. चौघडा नाही, छबिना नाही, हत्ती नाही, यात्रा नाही. पुन्हा तो आनंद कधी येईल? सारी तरुण मुले मुंबईला गेलेली. गावात आहे तरी कोण? म्हातारी माणसे व लहान मुले यांच्याशिवाय कोण आहे? पुन्हा खेडी कशी गजबजतील? तेथेच छोटे उद्योग नेऊ तर हे होईल. शेतीच्या धंद्याभोवती दुसरे हात-धंदे उभारू तर तरुण तेथेच राहतील, उत्पादन वाढेल, उत्साह वाढेल. पुन्हा संस्कृतीला कळा चढेल.

रामनवमीला घरोघर पन्हे करतील, कोकंबाचे किंवा कैऱ्यांचे. माझ्या लहानपणी विटुभटजींकडे कोकंबाची फळे आणून त्यांचे पन्हे करीत. किती रुचकर लागते ते!

तुम्ही समुद्रात पोहायला जाता का? आता उन्हाळा आहे. पाण्यात डुंबायची मजा. अरुणालाही लाटांशी खेळू दे पाण्यात; नारायणाचे भाऊ व श्रीरंग काय म्हणतात? रुळले का छात्रालयीन जीवनाला? छात्रालयात राहण्याने आवडीनावडी कमी होतात, सामाजिक भावना येते. वृत्तीचे कंगोरे कमी होतात. आमची आजी सांगायची कोणाची तरी गोष्ट की, त्या मुलाला रोज चमचाभर तरी श्रीखंड लागायचेच. अशा नाना सवयी लाडाने घरी लागतात. श्रीरंगचा भाऊ जरा हळवा आहे. नारायणाचे भाऊही दूर राहिलेले नाहीत. परंतु आता ते हसूखेळू लागले असतील. त्यांना माझे सप्रेम आशीर्वाद. आनंदासही सांग. चि. अरुणा आता म्हणे हाताने दूध पिते. प्रत्येक घोट घेताना "हा शेवटचा" असे म्हणते. होय ना? तिला दूध आवडू लागले, चांगले झाले.

मांजरी व्यायली आहे घरात. परवा उंदीर मारून आणून तिने पिलांसमोर ठेवला. पिलांवर तिचे किती प्रेम! पिले दूध पिताना तिला सतावतात. जरा गुरगुरते, परंतु पिले पुन्हा येतात. कधी मांजरी आपल्या पिलांना मारते असेही ऐकले आहे. काल बसलो होतो,– पिलू आले खुर्चीजवळ. मी खुर्ची जरा वाकवून बसलो होतो. पुन्हा खुर्ची नीट करून बसलो तर पिलाचे शेपूट सापडले. ते तेथे खेळत होते. पिलू ओरडू लागले तशी मांजरी एकदम आली धावून. परंतु पिलू सुखरूप पाहून त्याला चाटू लागली. तिची माया पाहून मला उचंबळून आले.

गावातील विहिरीचे पाणी आटू लागले. इतका पाऊस पडतो तरी पाण्याचे हाल. आपल्या गावात तळे नाही. कोठे तरी तळे करायला हवे, म्हणजे त्याचे झरे विहिरींना फुटतील असे वाटते.

आपल्या विहिरीला पाणी भरपूर आहे. जोशांच्या विहिरीला आहे. गावातील दोन-तीन विहिरींना पाणी आहे. तेथे सारा गाव जमतो. या

पाण्यापायी किती वेळ जातो. प्रत्येक वाडीत भरपूर पाण्याची एकेक तरी विहीर हवी. परंतु वस्तीही काही काही चमत्कारिक वसलेली. सारी पुनर्रचना करायला हवी, पुनर्वसती करायला हवी. परंतु लोकांचीही त्यासाठी तयारी हवी. खरे ना? पुरे आता पत्र. सर्वांना प्रणाम व आशीर्वाद.


अण्णा

ता. क.

तुझी जन्मतारीख मार्च १४ व आइन्स्टाइन यांचीही तीच जन्मतिथी. आता लक्षात आले तुझे गणित व सायन्स बरे का ते. नव्या वर्षाची पुस्तके घेतलीस का?

साधना, २५ मार्च १९५०

* * *



चि. प्रिय सुधास,

सप्रेम आशीर्वाद.

तुझे या वेळचे पत्र फारच छान होते. आणि तू लिहिलेस की, कोकणात पारिंग्याच्या झाडाला लाल फुले येतात. तुम्ही कशी पाहिली नाहीत? खरेच सुधा, आता मला आठवले. आपल्या अंगणाच्याच कडेला पारिंगा होता. त्याची फुले आता मला आठवतात. मुंबईच्या रस्त्यांच्या बाजूने लाल फुलांनी नटणारे पारिंगे काही विलायती पारिंगे नव्हत. पारिंग्याच्या झाडाच्या मला दोनच आठवणी. एक म्हणजे त्याच्या पानावर आपण फेण्या घालतो, आणि दुसरी म्हणजे त्याचे लाकूड हलके असल्यामुळे त्याचा ओंडका कमरेला बांधून पोहायला शिकतात. या ओंडक्याला आपण पिढले म्हणतो. आणि दसऱ्याच्या वेळेस पारिंग्याच्या पानांचेच बोळे घालून आपण फिटुकनळीतून उडवतो. मला या गोष्टी आठवत होत्या. फक्त ती लाल फुले कशी काय मी विसरलो हरी जाणे.

मी एका मित्राच्या मुलाच्या मुंजीसाठी गेलो होतो. सुखवस्तू आहे हा मित्र. मनाने, विचारानेही उदार. त्याच्या अंगणात सुंदर मांडव घालण्यात

आला होता. छत होते. खांब कापडाने मढवलेले. महात्माजी, पंडितजी वगैरे थोरामोठ्यांच्या तसबिरी होत्या. अग, या मित्राच्या घरापुरती वीज आहे. त्यामुळे त्यांनी मंडपात, मंडपाच्या दारावर, जवळच्या आवळीच्या झाडावर विजेचे दिवे सर्वत्र नेले होते. रात्रीच्या वेळेस झाडांवरचे रंगीबेरंगी दिवे किती सुंदर दिसत ! थोरामोठ्यांच्या घरचे कार्य म्हणजे साऱ्या गावाला आनंद. त्या मंडपात सर्व जातीजमातींचे लोक आनंदाने एकत्र जमले होते. सर्वांचे आगत स्वागत. गडीमाणसांनाही मंडपात बसवून प्रेमाने त्यांना पानसुपारी, अत्तरगुलाब–सारे देण्यात येत होते. ती आस्था पाहून मला आनंद वाटला.

परंतु माझ्या मनात दुसरे अनेक विचार आले. मुंजीचा हा समारंभ आता निराळ्या पद्धतीने व्हायला हवा. मुंज, उपनयन याचा अर्थ काय ? उप-नयन म्हणजे गुरूजवळ नेणे. आपण मुलाचे नाव शाळेत घालतो त्याच वेळेस खऱ्या अर्थाने त्याचे उपनयन होते. मला कधी कधी वाटते की, गावात निदान तालुक्याच्या ठिकाणी तरी एक ज्ञानमंदिर असावे. तेथे भारतातील व जगातील सर्व क्षेत्रांतील ज्ञानी पुरुषांच्या तसबिरी असाव्यात. तेथे बटूला न्यावे. त्याला सांगावे, "बाळ, या ज्ञानाचा तू वारसदार. या ज्ञानाची उपासना कर. या ज्ञानात भर घालून ऋषि-ऋण फेड. तू आज ज्ञानासाठी कंबर बांधलीस आणि हातांत दंड घेतलास. ज्ञानप्राप्तीच्या आड जे मोह येतील, जी संकटे येतील त्यांना दूर पिटाळ. आजपासून तू व्रती, महान ध्येयासाठी धडपडणारा ब्रह्मचारी बटू."

सुधामाई, उपनयनाचे समारंभ पाहिले म्हणजे माझ्या मनात शत विचार येतात. उपनयनाच्या निमित्ताने वरील पद्धतीचा संस्कार-समारंभ करून विद्यादान करणाऱ्या संस्थांस यथाशक्ती देणगी द्यावी. आज महाराष्ट्र विद्यापीठ उभे आहे. त्याला पैसा नाही. महाराष्ट्रात प्रतिवर्षी एक हजार मुंजी जर होत असतील व या मुंजींच्या निमित्ताने इतर खर्च कमी करून जर प्रत्येक मुंजीपाठीमागे शंभर रुपये महाराष्ट्र विद्यापीठास देतील तर १ लक्ष रुपये दरसाल मिळत जातील. परंतु हे कोणाच्या लक्षात येते ? विवेकानंदांच्या शिष्या भगिनी निवेदिता नेहमी म्हणत, "हिंदुस्थानला अनाठायी दिडकी खर्चायचा अधिकार नाही, क्षण फुकट दवडायचा अधिकार नाही." किती यथार्थ हे शब्द !

भारतात आज ज्ञानोपासना नाही. आपले सारेच जीवन उथळ झाले आहे. कोणतेही क्षेत्र घेऊन त्यात जीवनेच्या जीवने देणारे लोक आज हवे आहेत. तुला तो जुना श्लोकार्ध माहीत आहे?

सुखार्थिनः कुतो विद्या, कुतो विद्यार्थिनः सुखम् ।

ज्याला सुखासक्ती असेल त्याला विद्या कोठली, व विद्येच्या उपासकाला सुखोपभोग कोठले?

मला प्राचीन काळचे आश्रम आठवतात. जेथे शिकण्यासाठी मुले जात तेथे एक प्रकारची समता असे. मुलगा राजाचा असो वा रंकाचा. सर्वांना एक शिस्त. कृष्ण आणि बलरामही सुदाम्याबरोबर लाकडे आणायला जातात. राजाचा मुलगाही नीट वागला नाही तर त्याला हाकलून देत. 'विक्रमोर्वशीयम्' म्हणून एक संस्कृत नाटक आहे. गुरुगृही राजाचा मुलगा शिकत असतो. तो एका पक्ष्याला बाणाने मारतो. आश्रम-नियमांचे उल्लंघन करतो. ऋषि म्हणतो, "परत पाठवा याला. आश्रमविरुद्धमाचरितेमनेन." शाकुंतल नाटकात कण्वऋषींच्या आश्रमात शिरताना दुष्यंत म्हणतो, "विनीतवेषेण प्रवेष्टव्यानि आश्रमपदानि नाम" आश्रमात विनयाने पाऊल ठेवले पाहिजे. कण्व कुलपती होते. दहा हजार विद्यार्थी ज्याच्याजवळ शिकायला असत त्याला कुलपती म्हणत. आणि मुले शिकायला आली की गायी चारायचे आधी काम देत. इकडे तिकडे जाणाऱ्या गायींना सांभाळणे कठीण. ओढाळ गायीच्या गळ्यात लोढणेही बांधावे लागते. मग गुरू म्हणे, "ज्याप्रमाणं या गायींना सांभाळणे कठीण त्याप्रमाणे आपली इंद्रिये सांभाळणे कठीण. गायींच्या गळ्यांत लोढणे अडकवावे लागते त्याप्रमाणे तुम्हांलाही नियम, व्रते यांचे बंधन इंद्रियांना घालावे लागेल." आणि गुरुला दक्षिणा १२ वर्षे शिकल्यानंतर जाताना द्यायची. गरिबाजवळ काहीच नसेल तर त्याने नुसते एक फूल दिले तरी पुरे. कृतज्ञतेची ती खूण आहे. आज श्रीमंताचा मुलगा तेवढीच फी देतो, गरिबाचा तेवढीच देतो! हा केवढा अन्याय? गरिबाजवळून दोन आणे घ्या, श्रीमंत मुलाजवळून २५ रुपये घ्या. परंतु हे कोणाच्या मनातही येत नाही.

परंतु मी हे काय सांगत बसलो? तुमच्याकडे रामनवमीचा उत्सव झाला का? पन्हे वगैरे केलेत? रामनवमी झाली. आता मारुतिजयंती येईल. चैत्री पुनवेला मारुतीचा जन्म. कोकणातील आपल्या गावी आपणच मारुतिजन्माचा उत्सव करीत असू. तुझे आजोबा त्या दिवशी पहाटे जाऊन मारुतीची पूजा करायचे. आई प्रसादासाठी नारळीपाकाच्या वड्या करून द्यायची. पुण्यात पंधरा पंधरा दिवस मारुतीसमोर कथा होतात. आणि तेथे मारुती तरी किती! रामदासस्वामींनी महाराष्ट्रभर मारुतीची उपासना रूढ केली म्हणतात. असे एकही गाव नसेल जेथे मारुतीचे ल्हानसे मंदिर नाही. आधी रामाचा जन्म, नंतर मारुतीचा. आधी ध्येय, व मग त्या ध्येयासाठी धडपडणारा जीव. सुधा, हनुमंताचा केवढा महान आदर्श! त्याचे जीवन म्हणजे सर्वांगीण विकासाचे भव्य उदाहरण! शरीराने बलवान आणि बुद्धीनेही समर्थ. पुन्हा हे सारे कायिक व बौद्धिक बळ त्याने रामसेवेसाठी दिले. आपले जीवन थोर ध्येयासाठी देणे म्हणजे मारुतीची उपासना. हनुमान जन्मला तोच लाल सूर्यबिंबाला मिठी मारायला उड्डाण करिता झाला. मारुतीचे उपासक समर्थ रामदासस्वामी लिहितात:—

"उत्कट भव्य ते घ्यावे। मिळमिळीत अवघेचि टाकावे॥"

जीवनात मिळमिळीतपणा नको. परीक्षेत होईन काठावर पास, अशी आज मुलांची वृत्ती. शंभरातील नव्वद मार्क मिळवीन अशी महत्त्वाकांक्षा नाही. कोणतेही कर्म असो, त्यात परमोच्च गाठीन अशी धडपड हवी. मिळमिळीत जीवनात राम नाही. आणि ज्यात राम नाही, ते मारुती हृदयाशी धरणार नाही. मारुतीच्या किती कथा! सीतामाई त्याला मोत्यांचा हार देते. तर तो एकेक मोती चावून बघतो. सीता म्हणते, "हे रे काय?" तो उत्तरला, "त्यात राम आहे का बघत आहे." ती म्हणाली, "तुझ्या हृदयात आहे?" त्याने हृदयकपाट उघडून आतील राममूर्ती दाखविली. ध्येयाचा ध्यास हवा, माणसाला. कबीर म्हणतो,

"अंदर राम बाहर राम। जहाँ देखो वहाँ राम ही राम॥"

आतबाहेर राम; जेथे बघेन तेथे रामच राम. सुधामाई, मारुतीला त्याची आई अंजनी भेटली. ती म्हणाली, "अरे, तुझी स्तुती जो तो करतो, परंतु

मी नाही करणार तुझी स्तुती. शेवटी रावणाचा संहार करायला रामरायांना यावे लागले. ‘रामाला श्रमवलेस. तूच का नाही रामाचे सारे काम करून टाकलेस?’” अशी अंजनी माता. मुलापासून अधिकच अपेक्षा करणारी. थोर माता जिजाई नाही का शिवछत्रपतींना म्हणाली, “अजून कोंडाणा घेतला नाहीस. तो घे; मग मला आनंद होईल.” आईबापांनी मुलाला पराक्रमी करावे. आम्ही त्याला मनीऑर्डर पाठवीतच असतो, व तो चैन करीतच असतो. वास्तविक सोळा वर्षांचा मुलगा झाला की मित्र झाला. त्याला आता सांगावे : “स्वतःच्या पायावर उभा राहा. कष्ट कर, काम कर, आणि शीक.” अमेरिकेचे एक अध्यक्ष हूव्हरसाहेब होते. त्यांचा मुलगा गवंड्याच्या हाताखाली काम करताना मेला! आपल्याकडे जीवनात अशी प्रखरता यायला हवी. सारे रडगाणे झडझडून फेकायला हवे.

खरे– विसरलो. महावीर जयंतीसुद्धा येत्या ३१ तारखेला आहे. जैन धर्म स्थापणारा महापुरुष महावीर आणि बुद्ध जवळ जवळ समकालीनच. दोघे राजघराण्यात जन्मले. दोघांनी राज्ये झुगारली, संसार झुगारले, आणि जगाला खऱ्या सुखाचा मार्ग दाखविण्यासाठी त्यांनी स्वतःची जीवने दिली. भव्य जीवने! दोघांनी अहिंसेचा महान संदेश दिला. जैन धर्म म्हणजे मनावर विजय मिळविण्याचा धर्म. जिन म्हणजे ज्याने सारे जिंकले आहे तो. ज्याने मनावर विजय मिळविला तोच खरा महावीर! जैन धर्मात अनेक तीर्थंकर होऊन गेले. तीर्थंकर म्हणजे तारून नेणारे. तीर्थ म्हणजे तारून नेणारी वस्तू. या जगातील जंजाळातून सुख-शान्ती मिळवायला एकच मार्ग. तो म्हणजे कोणाला दुखः देऊ नका. सर्वांना सांभाळा. पुढे जैन तत्त्वज्ञानात ‘स्याद्वाद’ निघाला. हेही बरोबर, तेही बरोबर. त्या त्या दृष्टीने सारे बरोबरच असते. सत्याचा आग्रह नसावा. मी म्हणतो तेच खरे असा हट्ट नसावा. मला जोवर माझे खरे वाटत आहे, तोवर माझी श्रद्धा घेऊन मी जावे, परंतु मी ती कोणावर लादू नये. आपल्या देशात वैचारिक स्वातंत्र्याचा महान महिमा होता. खिश्चन धर्माने सत्तीने धर्म लादला, मुसलमानांनीही; परंतु भारताने कोणावर वैचारिक सक्ती केली नाही. हा मोठेपणा आपण गमावता कामा नये.

"बुद्धेः फलमनाग्रहः ॥"

आग्रही नसणे हेच बुद्धीचे फळ. सत्याची एक बाजू तुला दिसली, दुसरी दुसऱ्याला दिसली असेल. जगात अशी सहानुभूतीची दृष्टी येईल तर जग निराळे होईल. जैन धर्माने ही दृष्टी दिली. जैन न्यायशास्त्रही फार खोल आहे. माझे एक मित्र तुरुंगात म्हणाले, "जैनांच्या न्यायशास्त्रात सारे डायलेक्टिक (विरोधविकासाचे तत्त्वज्ञान) आहे." तू ऐकला आहेस हा शब्द? विरोध-विकास म्हणजे विरोधातून विकास. जगाची प्रगती विरोधातून होत आली आहे. आपण काही घेतो, काही सोडतो. जुन्या–नव्याचे संघर्ष होतात. त्यांतून नवीन समन्वय जन्माला येतो. पुढची पायरी बांधली जाते.

जैन धर्माची हिंदुस्थानभर मंदिरे आहेत. कोट्यवधी रुपयांची संपत्ती या मंदिरांतून पडून आहे. संपत्ती पडून राहणे म्हणजे मोठी हिंसा. आजूबाजूचा सारा समाज सुखी करणे म्हणजे अहिंसा. मी एकदा कोठे तरी म्हटले होते की आणखी देवळे नका बांधू. गावात आरोग्य यावे म्हणून गटारे बांधा. त्याने अधिक सेवा होईल. मानवाची उपेक्षा करून देव मिळत नसतो. जो जैन धर्म अहिंसा शिकवतो त्या धर्मातील मंदिरांचे रक्षण करायला बंदुकवाले पाहरेकरी ठेवावे लागतात. कारण तेथील संपत्ती चोरीला जायची! देवळाला मोठमोठी कुलपे! अरे कोट्यवधी दरिद्री जनता इकडे दुःखात आहे. त्यांना राहायला घर नाही. ती कुलपे उघडा नि ती संपत्ती जनतेची हायहाय दूर करायला द्या. ते अधिक 'अहिंसामय कर्म' होईल. परंतु धर्माचा आत्मा कोणालाच नको. ओठांवर मोठाली तत्त्वे. म्हणून 'धर्म ही अफू आहे' असे कोणी म्हटले तर त्यात वावगे काय? धर्म अफू नसून अमृत असेल तर जनतेची मरणकळा दूर करायला तो तो धर्म पुढे येईल. धर्म सर्वांच्या संसाराची नीट धारणा व्हावी म्हणून धडपडेल, नुसते यांत्रिक धर्म काय चाटायचे?

महावीर शान्तीचे, सहनशीलतेचे सागर होते. त्यांच्या कानांत कोणी खुंटी मारली तरी ते रागावले नाहीत. ते स्वतःला निर्ग्रन्थ म्हणत. निर्ग्रन्थ म्हणजे ज्याने साऱ्या गाठी सोडविल्या, ज्याच्या जीवनात आसक्ती नाही, आपपर नाही, ज्याचे आतडे कोठे गुंतलेले नाही. ज्याला सारे समान.

जैन धर्म कर्माला, यत्नाला प्राधान्य देतो. जैन धर्मात ईश्वर म्हणून कोणी नाही. स्वतःच्या प्रयत्नाने तुम्ही तुमचा उद्धार करून घ्यावा. तीर्थंकर म्हणजे मानवच; स्वतःच्या प्रयत्नाने ज्यांनी पुरुषार्थ संपादला अशी थोर माणसे. मनुष्य स्वतःच्या प्रयत्नाने किती उंच जाऊ शकतो ते तीर्थंकर दाखवतात.

सुधामाई, भारतात विविध क्षेत्रांत थोर थोर माणसे होऊन गेली. साऱ्या जगात झाली. पूर्वी झाली. आज आहेत. पुढेही होतील. त्या त्या काळाला अनुरूप संदेश देणारे पुरुष त्या त्या काळातील खळबळीतून जन्मत असतात. लाटेवर जसा फेस त्याप्रमाणे त्या त्या काळातील वैचारिक लाटेवरचा स्वच्छ फेस म्हणजे महापुरुष होत.

तुमचा अभ्यास सुरू झाला का ? आणखी एक महिन्याने उन्हाळयाची सुटी होईल. तुम्ही कोकणात जाणार का ? चैत्र महिना सुरू झाला. आता घरोघर हळदीकुंकवाचे समारंभ होऊ लागतील. डोल्हाऱ्यात गौर बसवावयाची. माझ्या लहानपणी घरात रंगीत डोल्हारा होता; आणि गौरीच्या भोवती आरास करावयाची, पडदे सोडावयाचे. फुलांच्या माळा, घरातील कलात्मक वस्तू मांडावयाच्या. बायकांची ही स्नेहसम्मेलने. आंब्याची डाळ, पन्हे, कलिंगडाच्या फोडी. हरभऱ्यांनी किंवा भुईमुगाच्या दाण्यांनी ओटी भरावयाची. नारळाची खिरापत. पूर्वी बायका गाणी म्हणत. आता फोनो लावतात. हा एक प्रकारचा वसंतोत्सव असतो.

परंतु गावातील सर्व भगिनी येतात का ? श्रमजीवी येतात का ? सर्वांना समान पातळीवर कधी आणता ? त्यांच्या अंगावर नीट वस्त्र आहे, केस विंचरलेले आहेत, तेल लावलेले आहे, मुलाबाळांच्या अंगावर कपडे आहेत,— असे सर्व भगिनींचे केव्हा होईल ? ही हळदीकुंकवे पाहिली म्हणजे हा विचार मनात येतो.

पांढरे चाफे आता मनस्वी फुलत आहेत. बकुळीही फुलू लागल्या आहेत. सृष्टी हळदीकुंकू करीत आहे, आणि कोकिळा कुऊ लागली आहे. कोकिळेचा आवाज मला वेड लावतो. तू पाहिली आहेस काळी कोकिळा ? ती जरा लाजरी व बुजरी. झाडाच्या पानांत लपून बसते व तो उत्कट

आवाज करते ते का तिचे प्रेमगीत असते? ती का प्रियकराला हाक मारीत असते? कोठे आहेस तू– ये, असे का म्हणते?


वसंत ऋतूचे वैभव बघायला रानावनात जावे, हिंडावे, फिरावे असे वाटते. परंतु वेळ कोणाला? तो वर्डस्वर्थ कवी म्हणे, “The world is too much with us–” हा संसार आपल्या शिरावर बसलेला असतो. या रोजच्या कटकटी छातीवर बसलेल्या असतात. सृष्टीचे दर्शन घ्यायला कसा कधी जाणार? सुधा, तू जात जा सृष्टीत. फुले, पाखरे बघ. जीवन समृद्ध कर, आनंदी कर. अरुणालाही दाखवीत जा फुले, पक्षी. तीही कूऊ कूऊ करील व नाचेल.

सुधा, तुझी म्हणे झरणी बिघडली! परंतु दुरुस्त करता येईल. मुंबईस लिलूकडे पाठव. नारायणची परीक्षा संपली. गेला महिना त्याने खूप अभ्यास केला. त्याचे पेपर चांगले गेले आहेत. तो पुढे गोव्याकडे कदाचित जाईल. पुरे हो हे पत्र. अरुणास पापा. अप्पा, ताईस स. प्र. इतर नंदा, पपी वगैरे सर्वांस चिमटे.

अण्णा

साधना, १ एप्रिल १९५०

* * *



चि. प्रिय सुधास,

सप्रेम आशीर्वाद.

तुम्ही पाठवलेला खाऊ पोचला. एका क्षणात आम्ही सारे त्याच्यावर तुटून पडलो. फन्ना उडविला. गोड काम लांबणीवर कशाला टाकायचे ? मी इंग्रजी चौथीत होतो. आमच्या इंग्रजी पुस्तकांत मुलांच्या सहलीचा एक धडा होता. मुले आधी रानावनात हिंडतात. करवंदे खातात, आंबे पाडतात. शेवटी दमून भागून शिदोऱ्या सोडतात. लेखक म्हणतो, " त्यांनी जेवण लांबविले नाही. They made a short work of it. " त्यांनी क्षणात केला चट्टामट्टा. आम्ही वयाने वाढलो तरी वृत्तीने मुलांप्रमाणेच आहोत. हीच वृत्ती राहो. सुधामाई, आमच्या खोलीतील मित्र अग, कधी कधी इतके हमरीतुमरीवर येतात की– मारामारी करतात. दोन दिवस मग खोलीत सारे चुपचाप असते. जेवताना कोणी बोलत नाही. जो तो स्वतःशीच लाजत खाजत जरा हसतो. अखेर कोणी तरी मौन मोडायचे धारिष्ट करतो व पुन्हा खेळीमेळी सुरू होते. एक प्रकारची मजा असते, नाही ?

सुधाताई, पालगडचे पत्र आले होते. यंदा रामनवमी यथातथाच झाली. मारुतिजन्मातही राम नाही. तो पूर्वीचा उत्साह कोठे गेला? आमच्या ल्हानपणी जो आनंद गावात असे तो आज का नाही? ही प्रगती की पुच्छगती?

कथा, कीर्तन, नाटक, मेळा, गोफ, यात्रा म्हणजे गावात केवढे चैतन्य असे. त्यात कालानुरूप भर घालायचे दूरच राहिले, परंतु पूर्वीचेही काही राहिले नाही. मी लहान होतो तेव्हा दादाही नाटकात काम करीत. आपले बाळताल्या झाले होते शंकर, व तुझे वडील म्हणजे आमचे दादा झाले होते गणपती! आणि अमृतलाल शेठजींचा मोहन मारवाडी तो झाला होता वानर! केवढी त्याची शेपटी, आणि तोंडाला काळे लावलेले! खूप मोठ्याने हुप् हुप् करीत तो उड्या मारी. परंतु 'नरवीर तानाजी मालुसरे' हे नाटक अजून माझ्या डोळ्यांसमोर आहे. भिकूताल्या जोशी यांनी तानाजीचे काम किती अप्रतिम केले! आणि काळा विष्णु– यांनी सूर्याजीचे काम केले. तू म्हणशील काळा विष्णु म्हणजे काय? अग आपल्या गावात विष्णु नावाचे व जोशी आडनावाचे फार लोक. ओळखायचे कसे? मग एकाला 'गोरा विष्णु', एकाला 'काळा विष्णु' व तिसऱ्या विष्णूला 'बाबाजी विष्णु' म्हणत. कारण त्या तिसऱ्या विष्णूच्या वडिलांचे नाव बाबाजी असे होते. अग आपल्या गावात बाळूही पुष्कळ होते. बाळू पावणस्कर, सबनीस बाळू, वरवडेकर बाळू! निरनिराळी नावे आणायची तरी कोठून?

तू परवाचे ग्रहण पाहिलेस का? खग्रास ग्रहण होते. मी अंगणात खाटेवर पडून बघत होतो. शेवटी ग्रहण सुटू लागले, त्या वेळेस कसे तांबूस तांबूस चंद्रबिंब दिसू लागले. लहानपणी आजोबा मला उठवायचे. आम्ही ग्रहण लागण्याआधी स्नान करायचे. थंड पाण्याने स्नान. मग मी गणपती अथर्वशीर्षाचा ग्रहण सुटेपर्यंत जप करीत बसायचा. खरे म्हणजे अशा वेळेस दुर्बिणीतून गंमत पाहायची. परंतु कोठून आणायची दुर्बिण? तुमच्या शाळेत आहे का ग?

उन्हाळा एकदम होऊ लागला. सारी फळे आता पिकू लागली. उष्णतेने भराभरा पिकतील. परवा काकूंकडे उकडगरे केले होते. फणस जून झाला

की त्याचे गरे काढून ते उकडून तिखट–मीठ, फोडणी देऊन खायचे. छान लागतात. मलबारच्या बाजूला फणस फार! तिकडे फणस ठेचून त्याचा लगदा करून मग त्याचे पापड करतात. तिकडे बाजारात ते विकायला येतात. जतीनच्या घरात फणसाचे पापड मी खाल्ले होते.

पाटीलवाडच्या आपल्या फणसावर आता येत नाहीत फार फणस. परंतु एके काळी या एका झाडावर शे-दोनशे फणस लागत. फणसाच्या झाडाला बुंध्यापासून फळे लागतात. हंड्याझुंबराप्रमाणे फणस लोंबत असतात. लहान लहान मुलांच्या खेळांतही

‘ भटो भटो!’
‘ ओऽ. ’
‘ कोठे गेला होता ? ’
‘ कोकणात. ’
‘ काय आणलेत ? ’
‘ फणस. ’

असे फणसाचे खेळ आहेत. हाताला तेल किंवा तूप लावून चारखंडांतून गरे काढावे लागतात. नाहीतर चिकामुळे पात्या चिकटतात बोटांना. “ तेल लावू, तूप लावू, गरे काढू ” असे आहे ना वरच्या संवादात ?

आता आंबे कुठे कुठे पिकू लागले आहेत. परंतु खरा पाड वैशाखातच. अक्षय्यतृतीया झाली की आंब्यांना पक्का पाड लागतो. यंदा आंबे खूप आहेत, परंतु परसवात हिंडताना जुनी झाडे आढळत नाहीत, नवीन फारशी झाली नाहीत. ती साखर लिटी मला आठवते. लहानसा आंबा, परंतु साखरेप्रमाणे गोड. आम्ही शाळेतून धावतच घरी येत असू व आधी झाडाखाली जाऊन पडलेले आंबे बघत असू. मी आधी येऊन खनिवट्यावर चढत असे. खनिवटा म्हणजे उन्हाळयात गुरे बांधायची जागा. चारी बाजूंनी कूड व वर मांडव. अग एकदा मी धावत आलो व चढलो मांडवावर. लिटीखाली हा खनिवटा. आंबे पडलेले असायचे मांडवावरच्या पेंढ्यावर. परंतु एके ठिकाणी मोठा भोसका होता. मी एकदम त्यातून खाली पडलो. दोन म्हशींच्यामध्ये पडलो.

त्या मारकुट्या नव्हत्या म्हणून निभावले. नाही तर शिंगानी तुझ्या अण्णाला फाडून टाकत्या व अण्णाही पत्र लिहायला न उरता.

तुझा अण्णा लहानपणी भांडकुदळ होता. कोणाशी पटायचे नाही, जमायचे नाही. दादा, अंबू, बाबू वगैरे सारी मुले एका बाजूला. मी एकटा एका बाजूला. माझी आंबे जमवून ठेवण्याची कोठी असे. चारी बाजू दगडांनी रचलेल्या. त्याच्यावर फळी. आत आंबे. शेकडो झाडे परसवात. वारा सुटला की, आंबे पडायचे. आमची धावाधाव. किती मुले असत! सोनाराकडची, करंदीकरांकडची, जोशांकडची—किती तरी मुले! आंबे पडावेत म्हणून झाडाला गळती लावून ठेवायचे. काठ्याने कर्दीचे पान आंब्याच्या झाडाला टोचून ठेवायचे, व 'आंब्या आंब्या पडीच्चो' म्हणायचे. अग आपली म्हातारी सरस्वतीकाकू— ती किती धावायची? त्यांच्या एका आंब्याच्या झाडाच्या फांद्या आल्या होत्या आपल्या अंगणात. पुटकन आंबा पडे. सरस्वतीकाकू तिकडून धावायची. आम्ही आधी धावत नसू, परंतु ती जवळ आली म्हणजे एकदम धावून आम्ही आंबा उचलीत असू. ती म्हणायची, "मेल्यांनो, एकही मिळू देत नाही का रे?" ती गंमत असे. घरात आंब्यांच्या आढ्या पडलेल्या असल्या तरी झाडाखाली अनेक मुलांमुलींच्या स्पर्धेत आंबे गोळा करून आणण्यात कर्तृत्व असे.

रामफळांचे हेच दिवस, पपनसांचे हेच दिवस. आपल्या खनिवट्याजवळ रामफळ होती; तिचे केवढे फळ असे: तांबूस हिरवट रंग! कसे रसरशीत दिसायचे फळ. सुधामाई, तू लवाचे फळ खाल्ले आहेस? फोडले म्हणजे कसे गुलाबी भगवे दिसते. आंबट गोड लागते. मी गेल्या ३५ वर्षांत लवाचे फळ खाल्ले नाही. दापोलीचा माझा मित्र यशवंत करंदीकर त्याच्या गव्हेगावच्या बागेत आम्ही लव खाल्ले होते. तो यशवंतही आज देवाघरी आहे. त्याच्या किती आठवणी येतात! तो हळू बोलायचा, हळू हसायचा. त्याच्या घरी कडक शिस्त असे. यशवंतची चित्रकला फार उत्कृष्ट होती. लहानपणची मैत्री मनुष्य कधी विसरत नाही; खरे ना?

चैत्र निम्मा झाला. खरा उन्हाळा सुरू झाला. उन्हाळा म्हणजे लहरी. क्षणात वारा पडतो तर क्षणात वादळ सुटते. धुळीचे लोट गगनात जातात.

वातचक्र सुरू होते. नाचत नाचत रिंगणे घेत धुळीचे कण, पानपातेरा, कागदाचे कपटे— सर्व काही आकाशात उंच जाऊ लागते. परंतु पुन्हा वारा थांबतो व हा उंच गेलेला कचरा खाली येतो. संस्कृतमध्ये मी एक सुभाषित वाचले होते की, "गुणहीन मनुष्य उच्च पदावर गेला तरी खालीच यावयाचा, जसे वातचक्रात धुळीचे कण उंच जातात परंतु पुन्हा खाली येतात."

आंब्याच्या झाडाखाली असलेली मुले वारा सुटताच आंबा कोठे पडतो, ते पाहायला किती दक्ष असतात. आपला केळांबा होता ना, त्याचे डेख हलके. वारा येताच ५-५० आंबे टपटप पडायचे. आमची धावपळ मग काय विचारतेस? हा वेचू की तो वेचू असे व्हायचे.

हा चैत्र महिना. आप्पाचा चैत्रातच जन्म. त्या वेळेस अधिक चैत्र होता. म्हणून आप्पाचे नाव पुरुषोत्तम. अधिक महिन्याला पुरुषोत्तम महिना म्हणतात. आप्पाला मला वाटते ल्हानपणी पाळण्यात घातले होते की नव्हते त्या सुमारास त्याची आजी वारली. आई आजोळी बाळंतपणास गेलेली. गावातच सासर, गावातच माहेर. सासुबाईंना शेवटचा नमस्कार करण्यासाठी आई पहाटे उठून जाऊन आली. त्या आमच्या आजीचे नाव सावित्री आजी. लहानपणी आम्हांला खाऊ द्यायची. आंब्याची, फणसाची साठे, भुईमुगाच्या शेंगा, पेपरमिंटाच्या वड्या, नारळीपाकाच्या वड्या— सारे तिच्या पेटाऱ्यात असायचे. 'आजी, खाऊ दे' आम्ही शाळेत जाताना म्हणत असू. मग आम्हांला चार शेंगा किंवा साठाचा तुकडा मिळायचा. आजीचा दादावर लोभ, तर आजोबांचा माझ्यावर. आजीने दादाला ताईत केला, आजोबांनी मला दुलई शिवली. लहानपणी कोणी नवीन आपणासाठी काही केले की किती आनंद होतो! मूठभर मास चढते अंगावर. आपल्यासाठी सर्वांनी काही तरी आणावे, खाऊ आणावा, खेळणे आणावे असे ल्हान मुलांना वाटत असते. ते तुमचे खिसे पाहतात, तुमच्या हातांतील पिशवी, बॅग, पेटी आधी उघडून बघतात. खेळणे दिसले की लगेच "मला बाहुली, मला चेंडू" करून नाचू लागतात. मुलांना रिक्तहस्ते भेटायला जाणे म्हणजे अरसिकपणाचे लक्षण होय.

परंतु सुधा, काय घेऊन जावे हे तुझ्या आण्णाला कळत नाही. आपण जे नेऊ त्याला हसणार तर नाही, असे मनात येऊन मग मी शेवटी काहीच

नेत नाही! परंतु सारखे मनाला चुकल्याचुकल्यासारखे मात्र वाटते. अग, परवा रस्त्याने एक मजूर जात होता. डोक्यावर बोजा होता. परंतु हातात कलिंगडाची फोड होती. गरीब असो वा श्रीमंत असो, काही ना काही घरी मुलांसाठी नेतोच नेतो.

तुमच्या बोर्डीला कलिंगडे आहेत का? तेथे चिकू आहेत, नारळ आहेत, केळी आहेत—परंतु कलिंगडे नसतील. कुलाबा जिल्ह्यात कलिंगडे फार. विशेषतः अलिबाग तालुक्यात. पुष्कळ वर्षांपूर्वीची गोष्ट. अक्काचा मधू आजारी होता म्हणून मी गेलो होतो. भिकोबा डॉक्टरांचे औषध. उन्हाळ्याचे दिवस. मी भिकोबांकडे औषध आणायला गेलो की म्हणायचे, "मामा, आधी कलिंगड खाऊ चला." ते माझ्यासाठी थांबायचे. ते रोज एक तरी कलिंगड खायचे. ते टायफॉइडमध्येही कलमी आंबा खायला द्यायचे. टमाटोचा रस द्या म्हणायचे. ते धाडसी होते. "नुसतं मोसंबं मोसंबं काय करता? गोड फळ कोणतंही द्या" म्हणायचे. हल्ली तर टायफॉइडमध्ये भातही दिला तरी चालेल म्हणतात. आरंभापासून देत असाल तर हो. परंतु डॉक्टरांची नाना मते. बर्नार्ड शॉसारखे विश्वविख्यात पंडित टोचाटोचीच्या अगदी विरुद्ध. टायफॉइडचे टोचून घेतलेलेही हजारो मरतात असे त्यांनी आकडे देऊन सिद्ध केले. देवीचे टोचतात, परंतु त्या टोचण्याचा काही उपयोग नाही, असा प्रचार करणाऱ्या संस्था इंग्लंड–अमेरिकेत निघाल्या आहेत. एका बाईने इंग्लंडमध्ये मुलाला देवी टोचणे नाकारले. पार्लमेंटमध्ये प्रश्नोत्तरे झाली. एक सभासद म्हणाला, "टोचून घ्यायला विरोध करणाऱ्यांना गुन्हेगार मानलं पाहिजे." परंतु मंत्रिमंडळातील एक मंत्री उत्तर देताना म्हणाले, "या देवी टोचण्याचा उपयोग नाही म्हणून इतका पुरावा मांडण्यात आला आहे की, विरोध करणाऱ्यांना गुन्हेगार मानावं असं बिल करण्याचं धाडस मला करवत नाही." बर्नार्ड शॉ लिहितात: "एखादी आई टोचाटोची करायला येणाऱ्याला गोळी घालील, मग त्यांचे डोळे उघडतील." डॉक्टरी शास्त्रातही रूढी तयार होतात. जरी या उपचारात अर्थ नाही हे कळलं तरी परंपरा चालत आली आहे म्हणून चालू ठेवतात झालं! आमचे मामा पुण्याच्या सॅनिटरी कमिशनरच्या कचेरीत होते. ते म्हणत, जगातून परस्परविरोधी इतका मजकूर

या रोगांच्याबाबत व त्यांच्या उपचारांबाबत आमच्याकडे येत असतो की, सारे फोल आहे असे वाटू लागते. महात्माजींचा निसर्गोपचार बरा असे वाटते. परंतु अलीकडे जरा पडसे झाले तरी डोस पिणारे लोक झाले आहेत! जरा निसर्गाला आपले काम करायला वाव ठेवाल की नाही?

परवा मला अकस्मात पीतांबरभाईंचा नातू भेटला. किसनभाईंचा मुलगा. किती आनंद झाला. आपल्या गावचा कोणी भेटला की क्षणात सारा इतिहास डोळ्यांपुढे उभा राहतो. पीतांबरभाई आमच्या लहानपणी पंच होते. ते गावातील एक प्रसिद्ध वैद्य होते. मी १०–१२ वर्षांचा असताना त्यांनी एकदा मला औषध दिले होते. त्यांच्या कानात मोठी भिकबाळी असे. बोटांत सल्लेजोडी व वळे असे. अंगावर एक उपरणे, डोक्यावर पागोटे असे. ते यायचे. गावात त्यांना मान होता. जुनी माणसे करारी असत, परंतु प्रेमळही असत. प्रेमाशिवाय जीवन शून्य होय.

परवा एका शाळेत मी गेलो होतो. मुलांमुलींचे फारच सुंदर कार्यक्रम तेथे झाले. नृत्य, अभिनय– सारे छान होते. मुरलीधराच्या मंदिरात एक हरिजन बालक जाऊ इच्छितो. पुजारी येऊ देत नाही. बालक बाहेर धावा करतो. मुरलीधर– हातात मुरली असलेला– भक्ताला भेटायला येतो. देव गाभाऱ्यातून बाहेर येत आहे असे पाहून पुजारी घाबरून पळतो. बन्सीधर कृष्णकन्हैया त्या बालकाला भेटतो. देव व भक्त नाचतात फार सुंदर होता तो प्रसंग! माझ्या डोळ्यांत अश्रू आले. कृष्णाचे स्वरूप कोठेही पाहा. हृदय उचंबळतेच. मोराच्या पिसांचा मुकूट, गळयात वनमाला, हातात बासरी, नेसू पीतांबर. एका लहान मुलाने कृष्णाचे रूप घेतले होते. किती गोजिरी दिसत होती ती श्यामसुंदर मूर्ती!

एक शेवटचा संवाद तर अप्रतिम होता. एकेक मुलगी येते व भारताच्या एकेक प्रान्तातून आल्याचे सांगते. तामील प्रान्तातून आलेली म्हणते, "इडली डोसा खाऊन आले." बंगालमधून आलेली म्हणते, "रसगुल्ला खाऊन आले." मारवाडमध्ये गेलेली म्हणते, "घी-शक्कर खाऊन आले." जणू ते भारत संमेलन होते. निरनिराळ्या प्रान्तांचे पोषाख मुलींनी केले होते. मारवाडी बाईचा पोषाख करणारणीने तोंडावर धुंगट घेतला होता. परंतु 'घी–शक्कर

खाली पोटभर' म्हणताना तिने घुंगट क्षणभर बाजूस केला— व हशा नि टाळ्यांचा कडकडाट झाला!

शाळांतून असे नाट्यप्रवेश वरचेवर व्हावेत. त्यामुळे भावना वाढतात. कलासंवर्धन होते. शिक्षकांनीही त्यात सामील व्हावे. महान शिक्षणशास्त्रज्ञ गिजूभाई मुलांबरोबर नाटकात काम करायचे. रवीन्द्रनाथही करीत. मुलांमध्ये मिळून मिसळून पुन्हा एक प्रकारे अलिप्त राहण्याची कला खऱ्या शिक्षकाजवळ असायला हवी.

तुमच्या शाळेतील निवडणुका झाल्या का? यंदा मुख्य मंत्री कोण? तुम्ही मुलींनी निवडणुकीत भाग घेतला की नाही? मुले आम्हांला कधीच निवडून देणार नाहीत असे तुम्हांला वाटते. तुमची संख्या पडते कमी. तरी उभे राहावे, प्रचार करावा. गंमत असते.


तेथे अक्का, कुमू आहेत. रात्री खेळत असाल. रमी खेळता की ट्रिस्ट की ओपन झब्बू? अरुणा सारे पत्ते घेऊन बसत असेल मुली. का देते खेळायला? तुमचा सर्वांचा वेळ जात असेल. कुमी मॅट्रिकचा अभ्यास करून फार वाळली होती. तेथील हवापाणी, नारळ, चिकू खाऊन जरा लठ्ठ होऊन येऊ दे. अक्काला बरे वाटते ना? ताई, अप्पा सारी ठीक? नंदाराज काय म्हणतात? त्याची सहल कुठे गेली होती की नाही? त्याचे गाल फार वर आले तर नाक दिसेनासे होईल हो. त्याला म्हणावे नाक थोडे ओढून उंच कर व गालावर थापट्या मारून ते जरा खाली बसव. म्हणजे प्रमाणात सारे दिसेल! अरुणाला अण्णाचे धम्मक लाडूच दे दोन. मोठ्यांस नमस्ते व लहानांस आशीर्वाद.

अण्णा

ता. क. चित्रेकाकांची दाढ कशी आहे? काही दुखो, खुपो, त्यांचा अखंड कर्मयोग चालूच असेल. त्यांना सप्रेम प्रणाम.

साधना, ८ एप्रिल १९५०

★ ★ ★



चि. प्रिय सुधास,
सप्रेम आशीर्वाद.

तुझे पत्र मिळाले. तुमचे हळदीकुंकू थाटाने पार पडले वाचून आनंद झाला. मी आलो असतो तर थंडगार पन्हे प्यायलो असतो, आंब्याची डाळ खाल्ली असती. परंतु मी नसलो तरी तुम्ही सर्व होतात. अक्का होती व कुमू होती. तुम्ही केसांत वेण्या घातल्या असतील. कुमूला मात्र फूल नको. ती फूल दुरून बघते, हात नाही लावीत. मी एकदा मागे अलिबागला गेलो होतो. कुमीला म्हटले, 'ऊठ जरा.' ती उठेना. मग मी फुले घेऊन जवळ गेलो तशी ती उठली. 'नको रे अण्णा फुले आणू जवळ' असे गयावया करून म्हणाली. मला हसू आले.

तुम्ही हळदीकुंकवाच्या वेळेला तो शेतकरी नाच केलात का? तू भारतमाता ना होणार होतीस? अप्पा बासरी वाजवणार होता. ते काहीच लिहिले नाहीस. हळदीकुंकू नुसतेच खिरापतीचे नये करू. नाट्यप्रवेश, नाच वगैरेंनी कलात्मक आनंद निर्मावा. तुला नाच आवडतो. दादा नेहमी म्हणायचे,

सुधा एकटी गाणे म्हणत असली तरी नाचत असेल. तू जणू वाऱ्याची झुळूक, समुद्राची लाट, वेलीचे डोलणे, होय ना? आनंदाची हीच वृत्ती जीवनभर राहो. सृष्टीच्या विराट नाचात आपणही सामील व्हावे.

तुमच्या तेथील रस्त्याच्या दुतर्फा करंजांची झाडे आहेत. पोपटी पालवी फुटून आता पांढरट निळसर फुलांचे गुच्छ त्यांच्यावर दिसतील. करंजाच्या झाडाखाली या बारीक फुलांची पखरण असते. समुद्रकिनाऱ्यावर ते बारीक चुरमुरे असतात, तशी ही फुले. या फुलांचा कडवट वास येतो, नाही? परंतु झाडे किती सुंदर दिसतात. आणि शिरीषालाही बहर येत आहे. रास्तुरे फुलले आहेत. आणि लालरंगी व पीतरंगी कृष्णचूडाची झाडे. जणू पिंजर व हळद उधळीत आहेत असे वाटते. शेतांच्या बडांगींवर शेकडो प्रकारची फुले फुललेली दिसतात. मौज.

परवा मी इंदूरच्या आईकडे गेलो होतो. अग, इंदूचे वडील एकाएकी आजारी पडले. जात होते कामाला. रस्त्यातच घेरी आली, नाडी बंद झाली. जवळच डॉक्टर होते. मित्रांनी तेथे नेले. दोन सुया टोचल्या. शुद्ध आली. जीवन हे असे आहे. कधी काय होईल याचा नेम नाही. इंदूचे यजमान चौकशीला आले होते. येताना इंदूच्या भावंडांना त्यांनी द्राक्षे आणिली होती. इंदूचे वडील मला म्हणाले, "अण्णा, कोणी येऊन दुखणं कमी होतं असं नाही. परंतु मनाला समाधान वाटतं की येऊन गेली चार माणसं. आपल्याबद्दल सहानुभूती आहे चार माणसांना." किती खरे आहेत ते शब्द!

इंदूचा लहान भाऊ वामन मोठा खोडकर. त्याच्यावर इंदूच्या नानांचे प्रेम. मला म्हणाले, "लबाड हात वर करतो व म्हणतो– मी झालो उंच, तुमच्याएवढा मोठा. द्या आता पुष्कळ खाऊ." ते त्याला म्हणतात, "वामन, पाटी घे. ग काढ." तर लगेच म्हणतो, "तुम्ही जा कामाला. तुम्ही ग काढायला सांगता!"

मुलांची मौज असते. अग, शंकराचा धाकटा मुलगा आहे ना तो आगगाडी दिसताच "ऑफिस गाडी ऑफिस गाडी" असे म्हणतो. गाडी म्हणजे वडिलांना ऑफिसात नेणारी एवढीच त्याची कल्पना.

हे उन्हाळयाचे दिवस. आपण आता गार पाणी पितो. मग खोकला होतो. शंकराला बराच खोकला झाला आहे. मला गार पाणी कधी बाधत नाही. कारण १२ महिनेच मी माठातले पाणी पितो. उन्हाळयाच्या दिवसांत कोणी पाण्यात वाळयाची जुडी टाकतात. पाण्याला एक प्रकारचा सुवास येतो. या दिवसांत लग्नमुंजीच्या वेळेस प्यायला पाणी असते त्यात वाळा टाकतात. तुझी आजी म्हणजे माझी आई होती ना, ती आपल्या बासनात वाळयाच्या काड्या ठेवायची. कपड्यांना मग कसर लागत नाही म्हणतात.

सुधामाई, अप्पा कोकणात जाणार आहे ना? एकटाच जाणार की तुम्ही जाणार? गुळांबा, काळांबा, केळांबा, टोकांबा, रातांबा, ढेरांबा, सारे ओथंबले असतील. जा खायला आंबे. घरचे आंबे खाण्यात मजा असते. ती ती आंब्यांची झाडे शत इतिहास सांगत असतात. आपला एक खोपटांबा होता. त्याच्याखाली लाकडाची खोपटी असायची. खोपटांब्याच्या ढोलीत साप होता म्हणतात. परंतु एकदा तो मरून पडलेला आढळला. त्याला का मुंगसांनी मारले होते? अशा अनेक आठवणी त्या त्या झाडांच्या आहेत. आणि अननसाचेही हेच दिवस. गिम्होणची आते होती तेव्हा आम्ही खूप अननस खात असू. अननसाचे फळ दिसते किती छान! सौम्य असा तो पिवळसर लालसर रंग. त्यात मधून हिरवी छटा. आणि फळ असते किती रुचकर!

तुम्ही जा कोकणात. महिनाभर आनंद लुटून या. सृष्टीच्या मोकळया सान्निध्यात राहून या. जुन्या नव्या माणसांना भेटून या.

चंद्रोदयांना कोकणात येता का म्हणून मी मागे विचारले होते. परंतु ते बंगालमध्ये गेले आहेत. आपल्या चंद्रोदयांचे मुळचे गाव आता पूर्व बंगाल-मध्ये आहे. कोमिल्ला शहराजवळ कांदिरपार म्हणून गाव आहे, ते त्यांचे जन्मग्राम. त्यांचे किती तरी आप्त तिकडे आहेत. काय असेल दशा? चांदपुरा येथे त्यांचे मित्र होते. परंतु सारे सुरक्षित आले. चंद्रोदय लिहितात, "चांद-पूरला सारे ठीक होते. तेथे दंगल नव्हती. परंतु पुढचे कोणी सांगावे? म्हणून मित्र निघून आले. यू. पी. मधून गेलेले अन्सार दंगली कत्तली माजवतात. मूळचे बंगाली मुसलमान या गोष्टीला विटले आहेत."

सुधामाई, आपण इकडे हळदीकुंकवे करीत आहोत. रसपाने करीत आहोत. बंगालमध्ये हायहाय आहे. स्वातंत्र्याच्या युद्धात बंगालने किती हुतात्मे दिले! धार्मिक चळवळीत केवढाली माणसे दिली! शैक्षणिक चळवळीत आशुतोषांसारखे अलौकिक पुरुष झाले! शास्त्रज्ञांत जगदीशचंद्र, प्रफुल्लचंद्र झाले! साहित्यात रवीन्द्र, बंकिमचंद्र, शरदच्चंद्र झाले! देशबंधू, अरविंद, नेताजी अमर नावे! बंगालने अर्वाचीन भारताच्या इतिहासात सर्व क्षेत्रात मोलाची भर घातली आणि त्यागही अपार केला. बंगाल अजूनही आगीतून जात आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळचा तो भीषण दुष्काळ! आणि ती प्रचंड वादळे! आणि स्वातंत्र्याआधीच्या त्या कत्तली आणि नंतरच्या माणसांच्या अदलाबदली. वाटले की आता सारे शान्त होईल. तो कम्युनिस्टांनी सारख्या दंगली चालू ठेवल्या. त्यात पुन्हा परवाची पूर्व बंगालमधील करुणगंभीर भेसूर कहाणी! बंगालच्या वेदनेला सीमा नाही. रवीन्द्रनाथ म्हणायचे :

" सोनार बांगला
आमी तोमाय भालोबासी "

हे सोन्याच्या वंग देशा, आमचे तुझ्यावर किती प्रेम! तो हा सोन्यासारखा देश पुनःपुन्हा ' भारतभाग्यविधाता ' भट्टीत घालीत आहे. उरलेसुरले खळमळ जणू दग्ध होत आहे.

आज बंगालचे हृदयमंथन, जीवनमंथन सुरू आहे. शेवटी अमृत मिळो हीच प्रार्थना. आपण ३३ कोटी लोक आहोत. लहान मुले सोडून दिली तर ५–१० कोट लोक आपण आणा– अर्धा आणा पाठवू तर २०–२५ लाख रुपये मदत उभी राहील; परंतु प्रत्येकाला कर्तव्याचे भान हवे.

सुधामाई, मी एक दिवस जेवलो नाही. मित्र म्हणाले, " का नाही जेवत? " म्हटले, " बरं नाही. " मी एका दिवसाच्या उपवासाने स्वतःला बंगाली बंधूभगिनींशी मनाने जोडीत होतो. सुधामाई, तुझा तात्या त्या दुष्काळात बंगालमध्ये सेवा करायला गेला होता. भारतसेवा समाजाच्या साहाय्यकेंद्रात काम करीत होता. रोग फैलावू नये म्हणून तो इंजेक्शने द्यायला जायचा. परंतु

वसंताने– तुझ्या तात्याने– मला लिहिले, “ मी इंजेक्शन द्यायला जातो. कॉलरा, देवी, टायफॉइड वगैरे साथी पसरू नयेत म्हणून. परंतु ते गरीब लोक म्हणायचे, ‘ इन्जेक्शनं कशाला ? काही खायला द्या, काही ल्यायला द्या.’ ” सरकारतर्फे मोठा फंड निघाला आहे. प्रत्येकाने अलग अलग फंड करण्यात काय अर्थ ? हे भगीरथ काम. सर्वांनी सरकारकडे रक्कम पाठवावी. सुधामाई, तुम्ही मुलींनी हिंडून मदत गोळा करावी व सौ. सुचेता कृपलानी, दिल्ली, या पत्त्यावर पाठवावी.

आपण किती देतो हा प्रश्न नाही. आपली मनोबुद्धी प्रमाण. उद्या निवडणुकीत दाखविण्यासाठी ही मदत नसो. ही निरपेक्ष मदत असो. लहानपणी ‘ कथासारामृत ’ नावाची एक पोथी मी वाचली होती. तिच्यातील एक गोष्ट मला कधी कधी आठवते. एका गावात रोज कीर्तन असे. एक मनुष्य रोज जाई. परंतु कीर्तनास बसला असता त्याच्या मनात घरी चोर तर नाही येणार, उद्या भाव काय असेल वगैरे विचार यायचे. दुसरा एक मनुष्य होता. तो जाऊ शकत नसे कथेला. परंतु त्याच्या मनात सारखे ‘ आता कीर्तन रंगात आलं असेल, आता भजन चाललं असेल, देवाची मूर्ती किती सुंदर दिसत असेल ’ वगैरे यायचे. पुढे दोघे कर्मधर्मसंयोगाने एकदम मेले. एकाला विष्णूचे विमान न्यायला आले, एकाला यमाचे आले. तेव्हा कीर्तनाला रोज जाणारा म्हणाला, ‘ देवाघरी न्याय नाही. मी रोज कीर्तनास जात असे; परंतु मला यमाचे दूत नेणार; आणि तो मनुष्य कधी कीर्तनास गेला नाही, परंतु त्याला वैकुंठास नेणार ! ’ विष्णूचे दूत म्हणाले, ‘ तू कीर्तनास जात असस परंतु लक्ष घराकडे, बाजारभावाकडे. हा घरी असे, परंतु लक्ष असे कीर्तनाकडे, देवाकडे. ’ शेवटी बाह्य क्रियेला महत्त्व नाही. तुमच्या अंतःकरणातील वृत्तीला महत्त्व आहे. मनातील जिव्हाळ्यामुळे कार्यांत प्राण येतो.

सुधामाई, परवाची एक गोष्ट. अग, आम्ही पाचसात मित्र एके ठिकाणी राहतो. दिवसा सारे कामाला जातो. रात्री सारी पाखरे घरी येतात. मी बाहेर निजतो. मला आधीच झोप कमी, व घरात तर कधीच येत नाही. त्यातून हा उन्हाळा. मी नवारीची खाट बाहेर टाकून झोपतो. ती खाट बाहेर उभी होती. वरती राहणाऱ्या माणसाला सिगारेटचे जळके थोटूक खाली टाकण्याची सवय. ती सिगारेट खाटेवर पडली. सारी खाट पेटली.

नवार जळली. बाहेर दोरीवर वाळत घातलेले आमच्या गणेशाचे सदरे जळले. आग घरातच शिरायची, परंतु कोणी मुले ओरडली. तेव्हा त्या खाटेवर पाणी ओतण्यात आले. मी दोन दिवस घरातच झोपतो. नवार आणून पुन्हा खाट विणीन तेव्हा. मी एकदा रात्री खाटेवर अंथरूण घालून पडलो असता या गृहस्थाने असेच एक थोटूक टाकले. मी पटकन उठून दूर फेकले. तेही पेटते होते. विझवून खाली टाकावे एवढाही यांना विचार नाही. आगगाड्यांतून तर पाट्या लावलेल्या असतात की, विडी-सिगरेट विझवून थोटूक टाका. आपले लोक कमालीचे बेफिकीर. अग, आमच्या वरच्या मजल्यावर राहणारे काही लोक आमच्या दारात भाजीचा कचरा टाकतात. सिगारेटच्या पेट्या, कागद गुंडाळून कचरा, जखमांचा कापूस– सारे फेकतात. घरात एक बादली ठेवून तिच्यात का घाण ठेवता येणार नाही? परंतु दुसऱ्याचा विचार कोण करतो? काही काचेची वस्तू फुटली तर खळकन खाली फेकतात. जिकडे तिकडे काचा होतात. पान खाऊन खाली थुंकतात. वाळत घातलेले कपडे रंगतात. परवा नारायण कोठे तरी उभा होता. वरून कोणी थुंकला! काय करायचे या लोकांना! अशी कशी ही मेलेली मने? दुसऱ्याविषयी ज्यांच्या मनाला विचार शिवत नाही ते का शिकलेले, ते का मानव? म्हणून मी नेहमी म्हणत असतो की, स्वराज्याचा अर्थही आम्हांला अजून कळला नाही. आपल्या करणीपासून दुसऱ्याला त्रास नाही ना होणार, दुसऱ्याचे नाहक नुकसान नाही ना होणार, हा विचार जोवर मनाला शिवत नाही तोवर ते मन असंस्कृत आहे, रानटी आहे असेच समजावे; नाही का?

मी बाहेर निजलो म्हणजे आकाशाकडे बघत असतो. रात्रीच्या वेळेस आता ढग येतात. एप्रिल महिना निम्मा होत आला. मे महिना लौकर येईल, आणि जूनमध्ये पाऊस. हे आता आगोटीचे दिवस सुरू झालेच म्हणायचे. लोक आपली घरे चाळू लागले असतील. लहानपणी मी मे महिन्याच्या सुटीत घरी जायचा. आपले पहिले घर कौलारू होते. घर चाळायला गडी यायचे. आणि मग सारे घर झाडायचे काम असे. कचरा पडे. फुटकी कौले पडत. खापऱ्यांचा ढीग पडे. पुढे पावसाळ्यात अंगणात चिखल होऊ नये म्हणून या खापऱ्या तेथे टाकतात. मी आईला झाडायला मदत करायचा. वर्षभराचा कानाकोपऱ्यातला केर निघायचा. वरची कौले निघाल्यामुळे काही

वेळ कडक ऊन साऱ्या घरात यायचे. जंतू जणू मरायचे. आई, बाई, साऱ्याजणी डोक्यावर पदर घेऊन झाडू लागायच्या. केसात घाण उडू नये म्हणून जपत. नंतर आम्ही स्नान करीत असू. मला आठवते आहे, एकदा अशी घर-झाडणी झाली होती. रात्री मी वडिलांबरोबर फरेभरे खेळायला ओटीत बसलो होतो तो विंचू आला. केवढा विंचू! या उन्हाळ्याच्या दिवसात गार जागेकडे येतात. बडोद्यास, पुण्यास ढेकूण फार, तसे विंचूही फार. भाऊंना विंचू फार चढायचा. अग, एकदा त्यांना रस्त्यातून रात्री जाताना विंचू चावला. तसेच घरी आले. आम्ही नाना उपाय केले. भोपळ्याचे डेंग उगाळून लावले. दुधांडी पैसा उगाळून लावला. जो कोणी उपाय सांगे तो करीत होतो. पहाटे भाऊ आईला म्हणाले, " विंचू होता की जनावर होते, साप बीप होता? मी आता वाचत नाही. तू सांभाळ मुलांना. " मी नि अक्का कोठून औषध घेऊन घरी आलो तो आई रडत होती. बरोबर २४ तासांनी विंचू उतरला. कोकणात म्हण आहे :

" विंचू म्हणतो मी शिपाई
सर्वां नाचवीन ठायी ठायी "


त्या रात्री अक्का नि मी खरोखरच औषधासाठी ठायी ठायी हिंडत होतो. हे उन्हाळ्याचे घर शाकारणीचे, घरे चाळण्याचे दिवस आले म्हणजे या साऱ्या गोष्टी आठवतात. कधी कधी आजोबासुद्धा कौले चाळायला बसत. कोकणात कोणतेही काम करायला कोणाला कमीपणा वाटत नाही.

तुमची शाळा सकाळची की दुपारची? आता समुद्रात डुंबायला जात असाल. उन्हाळ्यात समुद्रात डुंबायची मजा. तासन्तास समुद्रात रहावे असे वाटते. जात जा समुद्रात डुंबायला. आणि नारळाचे पाणी प्या घरी आल्या-वर. पत्र पाठव. तुझी झरणी दुरुस्त करून पाठवली. पोचली ना? चि. प्रिय अरुणास गोड पापा. अप्पा, ताई, अक्कास स. प्र. कुमू व आनंदा यांना स. आ. इतरांसही.

अण्णा

साधना, १५ एप्रिल १९५०

* * *



चि. प्रिय सुधास,
सप्रेम आशीर्वाद.

आपला चैत्र महिना संपून वैशाख सुरू झाला. अग, जतीनकडे परवा गेलो. तो त्यांचा त्या दिवशी नवीन वर्षाचा आरंभ होता. आपला वर्षारंभ चैत्रात, तामीळ बंधूंचा वैशाखात. परंतु आंध्र प्रान्तात मात्र महाराष्ट्राप्रमाणे चैत्रात वर्षारंभ असतो. जतीनला विचारले, काय रे, आज तुम्ही काय करता? तो म्हणाला, ‘ सकाळी उठायचं. ज्यानं त्यानं आरशात बघायचं. वडील मंडळी लहान मुलांना आज खाऊस म्हणा, कशाला म्हणा काही पैसे देतात. आज घरात फळफळावळ आणतात. ” आपण ज्याप्रमाणे गुढी उभारतो तसे त्यांचे नाही. आपण शालिवाहन राज्याच्या विजयाची खूण म्हणून गुढी उभारतो.

भारतात किती विविधता आहे. परवा एका व्यापाऱ्याच्या पावती-बुकावर किती विविध तारखा पाहिल्या. तेथे विक्रम संवतप्रमाणे तिथी होती, शालिवाहन शकाप्रमाणे होती, हिजरी सन होता, पारशी सनही होता. मिसरी सन होता, खिश्चन सन होता. पुन्हा बंगाली तारीख निराळीच. या विविधतेमुळे कधी कधी गोंधळ वाटतो तर कधी कधी मौज वाटते.

परवा रत्नागिरीचा एक मित्र आला होता. बराच वेळ आम्ही बोलत असलो. जगातील सारे विषय जणू आमच्या संभाषणात आले. मध्येच प्रेमासंबंधी काही चर्चा झाली. मी लैला आणि मजनूं यांचे उदाहरण सांगितले. लैलाचे बोट कापले तर मजनूंच्या बोटातूनही रक्त निघाले. माझा मित्र म्हणाला, " त्या जुन्या कथा जाऊ देत; परंतु रत्नागिरीत गेलात तर तुम्हांला एक करुणसुंदर कथा ऐकायला मिळेल." मी म्हटले, " मला तरी सांगा." ते म्हणाले, " मागे थिबा राजा रत्नागिरीस स्थानबद्ध होता. आज ब्रह्मदेश स्वतंत्र झाला आहे. परंतु थिबा राजा रत्नागिरीसच त्याचा देश गुलाम असताना मरण पावला. राजा मेल्यावर त्याची सारी मंडळी परत ब्रह्मदेशात जायला निघाली; परंतु एक मुलगी जाईना. तिचं एका माणसावर प्रेम जडलं होतं. कोण होता तो? तो एक टांगेवाला होता. ब्रह्मदेशातील माणसं तिथं थोडीच होती? हा टांगेवाला त्यांना फिरायला वगैरे नेत असावा. ती मुलगी समुद्रावर बसे. सागर उचंबळत असे, नाचत असे. तो टांगेवाला गाणं गाई. तिच्या हृदयातही प्रेमसंगीत सुरू होई. तो तिच्याकडे पाही. ती त्याच्याकडे. तिनं आपलं हृदय त्याला दिलं. तिच्या जीवनातील एक उणीव भरून निघाली. त्या टांगेवाल्याच्या जीवनाचा प्रवाह धो धो करीत आला व तिच्या जीवनाचा खळगा भरून पुढे निघाला. तिला मिळे ते ती त्याला देई. परंतु ती त्याच्याबरोबर लग्न कशी करणार? टांगेवाल्याने दुसऱ्या एका स्त्रीशी लग्न केले. त्याचा संसार चालू झाला; परंतु ही मुलगी मनात त्याची पूजा करी. जेव्हा सारी मंडळी ब्रह्मदेशात जायला निघाली तेव्हा ही मुलगी जाईना.

" तू इथं एकटी काय करशील? चल ब्रह्मदेशात. तिकडचं इथं काय आहे? तिकडे ती बांबूची वनं, सागाची जंगलं, तिकडचे हत्ती, तिकडचे पागोडे,– इथं काय आहे! चल बेटा —" ती मंडळी म्हणत.

" मी इथंच राहीन. इथंच माझा स्वर्ग, इथंच माझा मोक्ष. जिथं प्रेम आहे तिथं माझा पागोडा. मी तिकडे येऊन काय करू? मी आता इथलीच झाले आहे. हा समुद्र, ही लाल माती, ही नारळीची झाडं, हे आम्रवृक्ष– यातच मी वाढले; आणि मी एकाला इथं माझं जीवन दिलं,– त्याला सोडून कशी येऊ?"

" तो टांगेवाला, भुक्कड पै किंमतीचा. त्याच्याबरोबर राहणार तू? तू राजघराण्यातील. आणि त्यानं लग्नही केलं आहे. कशी राहणार तू?"

" तुम्हांला तो पै किंमतीचा, मला तो पृथ्वीमोलाचा आहे. माझ्या डोळ्यांनी त्यांच्याकडे बघा. मी इथं राहीन, दुरून त्याला पाहीन. मला दुसरं काय हवं?"

" तू जगशील कशी?"

" शेण्या वेचीन, काम करीन."

ती मुलगी ब्रह्मदेशात गेली नाही. येथेच राहिली. सरकार तिला काही वर्षासन देई. परंतु ती ते सारे त्या प्रियकराच्या हवाली करी. तो तिला हिडीस-फिडीस करी. परंतु ती तरीही प्रेमाचे गीत गाई. एका ल्हान झोपडीत ती राही. रस्त्यात पडलेले शेण गोळा करून आणी. त्याच्या शेण्या करी व विकी. तिच्या जीवनाला कशाने अर्थ प्राप्त झाला होता, कशाने उदात्तता आली होती? प्रेमाने. प्रेम म्हणजे किमया आहे. प्रेमाने चमत्कार होतात."

गोष्ट सांगून तो मित्र थांबला. मी गंभीर झालो होतो. निरपेक्ष झाल्याशिवाय खरे प्रेम करता येत नाही. त्या मुलीला कशाची इच्छा नव्हती. आपल्याला प्रेम करायला कोणी तरी मिळाले या कल्पनेनेच ती मस्त होती.

" हे काजूचे गर तसेच राहिले." मित्र म्हणाला.

" प्रेमाची ही उदात्तता ऐकल्यावर का आता काजूचे गर खायचे?" मी म्हटले.

" परंतु तेही एका मित्रानं पाठवले आहेत." तो म्हणाला.

ते काजूचे ओले गर होते. कोकणात आपण ते आमटीत घालतो. मुंबईत किती महाग मिळतात! काजूचे ते ओले गर मी खूप खाल्ले. ते उष्ण असतात. दुसऱ्या दिवशी मला आवंढा गिळता येईना. घसा आतून सुजला. दोन दिवसांनी बरे वाटले.

आज अक्षय्य तृतीया. परशुराम जयंतीचा दिवस. चिपळूणजवळ परशुरामला उत्सव असतो तीन दिवस. परशुराम मोठे सुंदर गाव. उंचावर वसले आहे. सारे रस्ते पाखाडीचे, दगडांनी बांधलेले. तीन दिवस जो तो आपल्या घरासमोर कंदील लावतो. यात्रेला येणाऱ्यांना रस्त्यात उजेड होतो. तीन दिवस

कोणाकडेही उतरायला जा, कोणी नाही म्हणत नाही. इंग्रजी पाचवीत असताना मी, तुझे वडील व आणखी काही मित्र परशुरामला पायी गेलो होतो. एका गृहस्थाकडे उतरलो. ते म्हणाले, “स्नान करा. दोन घास खाऊन घ्या. देवळातलं मुक्तद्वार जेवण फार उशीरा होतं.” ते गृहस्थ म्हणाले, “मागं आमच्या गावात कोणा यात्रेकरूला कोणी एकानं घरात जागा दिली नाही. त्याच्या घराला आग लागली. तेव्हापासून आमच्या गावात यात्रेच्या वेळेस कोणी नाही म्हणत नाही.” हे परशुरामाचे मंदिर बाजीरावाचे गुरू ब्रह्मेन्द्रस्वामी यांनी बांधले. ब्रह्मेन्द्रस्वामींची समाधी सातारा जिल्ह्यात धावडशी येथे आहे. तेथेही भार्गवरामाचे सुंदर मंदिर आहे. पाण्याचे मोटमोठे हौद आहेत. आजूबाजूला फुले आहेत.

अक्षय्यतृतीयेस उदकुंभ दान देण्यात येतो. पंखा देण्यात येतो. या उन्हाळ्यात थंडगार पाणी व वारा घ्यायला पंखा यासारखी देणगी कोणती? मागे त्रिचनापल्लीकडे गेलो होतो. तिकडे खेड्यापाड्यांतून लहान मुलेही हातात ताडाचा पंखा घेऊन वारा घेताना दिसत. १९३४ मध्ये धुळे तुरुंगात आम्ही होतो. उन्हाळ्याचे दिवस. चक्की दळण्याचे काम. घामाघूम होत असू. अशात वाऱ्याची झुळूक आली म्हणजे मी म्हणे, “आईनं वारा घातला.” आपल्या पंख्याचा वारा किती जणांना पुरणार? परंतु देवाघरचा वारा नवजीवन देतो.

कोकणात आता कामाची धूम आहे. भाताचे रोप लावण्यासाठी तेथे तर्वे भाजून तयार करून ठेवण्यात येत आहेत. गवतारू घरे शाकारताना जुना केंबळ खाली पडतो. हा केंबळ, त्याचप्रमाणे गावातील सारा पानपातेरा शेतात नेऊन जाळतात. शेताच्या बांधावर जो कवळठा असतो, ऐनाची वगैरे जी झाडे असतात, त्यांचा तोडून ठेवलेला टाळ शेतात पसरण्यात येतो. खाली शेण पसरतात. ते वाळलेले असते. आणि वर थोडथोडी माती पसरतात. पहाटेच्या वेळेस जरा दव पडते. त्या वेळेस या तर्व्यांना आग लावतात. माती ओलसर असते. म्हणून किटाळे उडत नाहीत व जमीन हळूहळू नीट भाजते. जमीन भुसभुशीत होते. विषारी तणांचे बी मरते व पुढे भात पेरले म्हणजे त्यात इतर गवत उगवत नाही.

असे हे भाजवणीचे दिवस. या तरव्यांना कोणी "दाढ" असेही म्हणतात. तुझी एक लांबची आजी होती. पार्वतीकाकू तिचे नाव. ती देशावरची. एकदा आपल्या यजमानाबरोबर कोकणात आली. कोणी तरी म्हणाले, "दाढीला आग लागली." हिला वाटले, कोणाच्या तोंडालाच आग लागली! ती घागर कळशी घेऊन बंगल्यात धावली. कोणी विचारले, "पार्वतीकाकू, कुठं नेतेस पाणी?" "कोणाच्या लागली दाढीस आग?" तिने विचारले. अशी ती भोळी. आई ही गंमत सांगे. तसेच एकदा वैश्वदेवासाठी एक थाबडा आण म्हणून आजोबांनी तिला सांगितले. थाबडा म्हणजे काय तिला कळेना. शेवटी आजोबा संतापले व म्हणाले, "अग, ते बघ थीबडे, डोळे आहेत की नाहीत?" "म्हणजे शेणी होय?" ती म्हणाली. "हो, तुझी शेणी आण. इथं म्हणतात थाबडा." भाषा माहीत नसली म्हणजे अशा गंमती होतात. शिवाय एकच मराठी भाषा असली तरी निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे शब्द असतात. आपण इकडे नळावर "अहो बाई, जरा दूर व्हा" म्हणतो, परंतु वऱ्हाडात 'बाई' म्हणाल तर स्त्री चवताळून अंगावर येईल. तेथे त्या शब्दाला जरा निराळा अर्थ आला आहे.

सुधामाई, माझ्या एका स्नेह्याच्या पत्नीला अकस्मात मरण आले. मृत्यू ही एक कठोर घटना आहे. कवींनी काव्ये लिहिली, तत्त्वज्ञान्यांनी तत्त्वज्ञान सांगितले, तरी हृदयाची वेदना शमत नाही. आणि लहान मुलांना मृत्यूची कल्पनाच नसते. माझे मित्र तार येताच इंदूरला गेले. पुन्हा परत यायला निघाले. लहान मुलीला म्हणाले, "येतेस ना मुंबईस?" ती म्हणाली, "तुम्ही जा. मी आईबरोबर येईन. दवाखान्यातून आई घरी येईल, आम्ही दोघं येऊ." त्या मुलीची समजूत कशी घालायची? तू वर्डस्वर्थ कवीची "आम्ही सात आहोत" ही कविता वाचली आहेस? ती मुलगी मेलेल्या भावालाही मोजते. ती म्हणते, "तो भाऊ आहेच. तो तिथं निजला आहे. तिथं हिरवं गवत वाढतं. मी आईबरोबर तिथं जाऊन बसते. तो आमचा सातवा भाऊ. आम्ही सातजणं आहोत." शेवटी कवी म्हणतो, "ते साधं मूल. What should it know of death? मरणाचं त्याला काय माहीत असणार?"

जीवनात दिवस आणि रात्र, संयोग आणि वियोग, सुख आणि दुःख यांची खिचडी आहे. जगात केवळ सुख नाही. केवळ दुःख नाही. सारे

संमिश्र आहे. तू मादाम चँग कै शेकचे नाव ऐकले असशील? त्यांनी मागे पंडीतजींना कसला तरी मुरंबा पाठविला होता. महाळुंगाचा होता की कसला होता कोणास ठाऊक! परंतु तो मुरंबा गोड असला तरी जरा कडवट होता. मादाम चँग कै शेकने पत्रात लिहिले, "तुम्हांला हा मुरंबा पाठवीत आहे. चव गोड असली तरी जरा कडू वाटेल. जीवन असंच आहे, नाही का?"

सुधामाई, हा उन्हाळाच बघ. एकीकडे कडक ऊन, मनस्वी उन्हाळा. नद्यानाले सुकून गेलेले. विहिरीत ठणठणाट. गुरांना चारा नाही. परंतु याच वेळेस झाडांना पालवी फुटते. आंबे, फणस, काजू, करवंदे, कोकंब, जांभळे, अळू,– नाना प्रकारची फळे होतात. कोकिळा कुऊ करू लागते. उन्हाळ्याचा त्रास म्हणावा तर हे रसाळ आनंदही आहेत. असे हे जीवन आहे. आपण चांगल्याकडे बघावे व आशेने आपले उद्योग करीत राहावे.

मी तुला मागे मांजरी व्यायली आहे म्हणून लिहिले होते. तिची पिले कुठे गेली कुणास ठाऊक! सुंदर होती पिले. कोणी का पाळायला नेली? का बोक्याने मारली? ती मांजरी काही दिवस म्याव म्याव करी. परंतु आता बहुधा विसरली दुःख. परवा खोलीत आली तो आमच्या गणेशाने केवढ्याने थप्पड मारली. मला वाईट वाटले. डिच्चू म्हणाला, "अरे, असं मारू नये. मरेल ती. मग जावं लागेल पायी काशीला." मी म्हटले, "हातात विस्तव घेऊन जायचं असतं." कोणी म्हणाले, "तो काड्याची पेटी हातात घेऊन जाईल." आम्ही तुरुंगात होतो. तेथेही एक मांजरी व्यायली होती. तिची ल्हान ल्हान गोजिरवाणी पिले. एक मित्र या पिलांना वर उडवायचे व झेलायचे. परंतु एकदा चुकून ते पिलू डोक्यावर खाली पडले आणि लगेच मेले! त्या आमच्या मित्रास अति दुःख झाले. किती प्रेम करायचे पिलावर. परंतु इलाज काय? कोणी कोणी कौतुकाने लहान मुलांना असेच वर उडवतात. मला अशा गोष्टींची नेहमी भीती वाटते. अर्थात, या योगायोगाच्या गोष्टी असतात.

तुमची आता दीडमाही (तिमाही नावाला म्हणायची) परीक्षा असेल. नंतर महिनाभर सुटी. होय ना? अप्पाचा वाढदिवस केलात. पुरणपोळी केलीत. अप्पाचे आवडते पक्वान्न, होय ना? अप्पा ल्हान असताना बडोद्यास

मावशीकडे शिकायला गेला. एकदा मावशीला म्हणाला, "पुरणपोळी कर." मावशीने पूर्वी कधी केली नव्हती. किती डाळीचे पुरण घालावे काही अंदाज तिला नव्हता. आणि शेवटी पुरण किती तरी झाले. पोळया संपता संपत ना भाजून. आणि मग चार दिवस त्या पुरल्या. पुरणपोळी शिळी चांगली अशी म्हणच आहे. परवा असे तर तुमचे नाही ना झाले?


तुमच्या तेथे उन्हाळा जाणवत नसेल. तरीही एखादे वेळेस तेथे त्रास होतो असे म्हणतात. सायंकाळीही आंघोळ करीत जा. तेथे रेडा लावतातच रहाटाला. बसा पन्हळीखाली. त्या लहान हौदात अरुणाला डुंबू दे. परंतु एखादे वेळेस बाधते हो पाणी. अरुणा जरा उंच झाली आहे असे कोणी तरी सांगत होते. उन्हाळयाच्या सुट्टीतील तुमचे काय बेत? माणसाचे मन म्हणजे अद्‌भुत चीज आहे. रोज नवे बेत करता येतात. परंतु निश्चित काहीच झाले नाही तर सारे मनोरथ हवेतच राहायचे.

मी बरा आहे. रात्री आंघोळ करतो. त्यामुळे बाहेर निजता न आले तरी थोडीफार झोप येते. तुम्ही सारी बरी आहात ना? कुमी खूश आहे की नाही? सर्वांस स. प्रणाम. लहानांस स. आ. अरुणास मोठा आशीर्वाद.

अण्णा

साधना, २५ फेब्रुवारी १९५०

★ ★



चि. प्रिय सुधास,

सप्रेम आशीर्वाद.

तुझे सुंदर पत्र पोचले. तुम्ही दोन दिवस शाळेत शिबिरजीवन कंठलेत. वाचून आनंद झाला. एकत्र राहात होतात, खेळत होतात. गुरुजनही सारे बरोबर. शेवटच्या दिवशी रात्री घरचे आणलेले फराळाचेच खाल्लेत. मोकळया मैदानावर आकाशाखाली सारे विद्यार्थी व सारे गुरुजन खेळीमेळीने एकत्र फराळ करीत आहेत, गोष्टी सांगत आहेत, विनोद करीत आहेत. किती गोड अनुभव. आणि "मी गेली बारा वर्षे निरनिराळया शाळांतून शिकवण्याचं काम केलं, परंतु शाळेचे मुख्याध्यापक, आजीव सभासद व इतर शिक्षक एकत्र प्रेमानं बरोबरीच्या नात्यानं बसले आहेत असं कधी पाहिलं नाही." असे तुमच्या शाळेत नवीन आलेल्या एका शिक्षकबंधूने त्या वेळेस काढलेले उद्‌गार जे तू दिले आहेस, ते वाचून मनात शत विचार आले. शिक्षण-संस्था चालविणारे तरी समतेने वागणारे, सहानुभूतीने वागणारे नकोत का? चालकांना शिक्षकांशी समरूपता वाटायला हवी. परंतु भारतात मोठे मन

दुर्मिळ झाले आहे. देशात अन्नधान्याचा दुष्काळ, वस्त्रांचा दुष्काळ, त्याचप्रमाणे उदार वृत्तीचा, मानवतेचाही दुष्काळच आहे.

तुमच्या तेथे शिक्षकांसाठी नवी छोटी टुमदार घरे बांधली जात आहेत. मुलांनी पाया खणला. तुझ्या हस्ते पायाच्या दगडाची पूजा करण्यात आली. तू दिलेले ते सारे भावपूर्ण वर्णन वाचून मी आनंदलो. ज्या वेळेस मनुष्य आपण होऊन काम करतो, त्या वेळेस ते काम म्हणजे आनंद असतो. आणि खरोखर श्रमजीवनात अपार गोडी आहे. राहून राहून एक विचार माझ्या मनात हल्ली येत असतो. भारतातील मुले स्वावलंबी झाली पाहिजेत. श्रमावे, कष्टावे, यात परमानंद ती व्हावीत. अमेरिकेच्या एका अध्यक्षाचा मुलगा गवंड्याच्या हाताखाली काम करताना पडून मेला. केवढे स्फूर्तिदायक उदाहरण! अनेक विद्यार्थ्यांना नोकरी हवी असते. नोकरी कोठे मिळणार! रस्त्यातून दोन तास वृत्तपत्रे विकू, छोटी पुस्तके आगगाड्यांतून खपवू. रस्त्यात चांगली पुस्तके व इतर वस्तू वगैरे मांडून बसू, खपवू, असे कोणाच्या मनात येत नाही. विद्यार्थ्यांना या कामात आनंद हवा. परंतु त्यांना कोठे तरी कचेरीत बैठे काम हवे असते. कष्टाने श्रम करून मिळविलेले दोन आणे मोलाचे आहेत. हिंदीतील 'सुदर्शन' नावाच्या एका लेखकाने एक सुंदर गोष्ट लिहिली होती. मुलगा सोळा वर्षांचा होतो. बाप म्हणतो, "तू स्वतः काही मिळवून आण." मुलगा आईजवळ जातो व तिच्याकडून चार आणे घेतो. ते चार आणे वडिलांना दाखवून तो म्हणतो, "बघा माझे चार आणे." वडील म्हणतात, "गटारात फेक ते." पुढे वडिलांना कळते की, आईच मुलाला पैसे देते. ते त्या गोष्टीला आळा घालतात. आता कुठून आणायचे पैसे? शेवटी मुलगा मजूर बनतो. उन्हातून हिंडतो. दोन आणे आणतो. घरी येऊन वडिलांना म्हणतो, "हे मी मिळवलेले दोन आणे." ते नेहमीप्रमाणे म्हणाले, "गटारात फेक." तो संतापाने म्हणाला, "काय म्हणून फेकू? हे माझ्या निढळाच्या घामाचे आहेत. हे पैसे साधे नाहीत." बापाने मुलाला हृदयाशी धरले. मुलाने जे पैसे स्वतःच्या कष्टाने मिळविले त्याचे त्याला मोल वाटले. वस्तूची किंमत तिच्यासाठी आपण जे कष्ट करतो त्यामुळे असते.

सुधा, तू कष्ट करणारी हो. झाडांना पाणी घाल. उन्हाळ्यात झाडांना पाणी लागेल. नाही तर ती सुकतील. आपण वाढवलेल्या झाडामाडांना फुले फळे लागलेली पाहून आपणास कृतार्थता वाटते, खरे ना ?

आता दिवस किती मोठे वाटतात. सात वाजले तरी संधिप्रकाश दिसत असतो. दिवस आणखी मोठे होत जातील, व जूनमध्ये सर्वांत मोठा दिवस येईल. परंतु सुधामाई, विषुववृत्ताजवळच्या प्रदेशात दिवस व रात्र नेहमीच समान. लहान दिवस, मोठा दिवस, लहान रात्र, मोठी रात्र– असा प्रकार तेथे नाही. या प्रदेशात संधिप्रकाश नसतो. एकदम सूर्योदय, एकदम सूर्यास्त. सूर्योदयाआधी किंवा सूर्योदयानंतर तेथे संध्यासमय नाही. तू जर सिंगापूरला गेलीस तर तेथे तुला सूर्य अस्तास गेल्यावर एकदम अंधार आलेला दिसेल. आणि म्हणूनच तेथे रोज सायंकाळी चांगला पाऊस पडतो. कारण आकाशातील वाफ एकदम थंड होते व जोराचा पाऊस येतो. सकाळीही तेथे पाऊस पडतो, परंतु तितका जोराचा नसतो. तिकडे नेहमीच हिरवेगार. सिलोनमध्येही पाऊस नेहमी पडतो; म्हणून तर पाचूसारखे बेट असे त्याला म्हणतात.

भूगोल हा मोठा रसाळ व काव्यमय विषय आहे. मी विद्यार्थी होतो तेव्हा भूगोलाचे काव्य आम्हांला कोणी विशेष शिकवीत नसे. परंतु तुम्ही आता त्यातील गोडी चाखत असाल.

मेक्सिकोकडून कढत पाण्याचे प्रचंड प्रवाह अटलांटिक महासागरातून येतात. ते किती वेगाने येतात; आणि त्या प्रवाहाबरोबर बोटी निघाल्या तर लवकर पोचतात. तुला माहीत आहे का की, पॅसिफिक महासागरातही असे प्रवाह आहेत. पॅसिफिक व अटलांटिक दोन्ही महासागरांत समांतर असे हे जलप्रवाह निघतात. प्राचीन काळी अमेरिकेचे व आशियाचे दळणवळण असावे. धर्मराजाच्या राजसूय यज्ञाच्या वेळेस मयासुराने मयसभा बांधून दिली; हा मयासूर का मेक्सिकोतील होता ? मेक्सिकोतच मयांची संस्कृती. पॅसिफिकमधील या वेगवान प्रवाहाबरोबर का ते मय गलबतातून येत ? मयासूर पाताळातून आला होता. या दंतकथांतून का भूगोल शोधायचा ?

परंतु माझ्यापेक्षा तुलाच या गोष्टी अधिक माहीत असतील. हे कढत प्रवाह मेक्सिकोकडून अटलांटिकमध्ये येणारे. त्यामुळे वारे कसे उठतात, त्यांना गर्जणारे वारे, दौडणारे घोडे, वगैरे विशेषणे कशी दिली जातात; युरोपातील देशांना या कढत प्रवाहांमुळे पुढे गरम हवा कशी मिळते व ‘ वसंत ’ कसा फुलतो, हे प्रवाह म्हणजे ‘ युरोपची घोंगडी ’ असे का म्हणतात, उत्तरेकडून येणारे हिमप्रवाह व हे उष्ण प्रवाह एकत्र मिळून समशीतोष्ण पाणी. या टापूतच माशांची पैदास व्हायला योग्य वातावरण कसे मिळते आणि जगातील मच्छीमारीचा प्रचंड धंदा या न्यू फाउंडलंड भागातच का, हे सारे तू जाणून घेतले असशील. मी आलो म्हणजे हा गंमतीदार भूगोल तू मला समजावून दे. मला नाही या गोष्टी माहीत.

मला भूगोल येत नसला तरी काव्य थोडेफार माहीत आहे. तुला आहे का ठाऊक, वर्डस्वर्थ या थोर इंग्रज कवीला मरून आता शंभर वर्षे होतील ? तू या थोर कवीच्या काही कविता वाचल्या असशील. इंग्रजी काव्यात त्याने क्रांती केली. त्याच्यापूर्वी इंग्रजी काव्यात कृत्रिमता आली होती. आणि रोजच्या जीवनातील अनेक प्रसंगांतही किती काव्यमयता असते हे पूर्वीच्या कवींना दिसले नाही. परंतु हा वर्डस्वर्थ आला. सृष्टीचा तो महान उद्गाता ! सृष्टीचा थोर उपासक ! इंग्लंडमधील निसर्गाचे त्याने अनेक गीतांतून सुंदर वर्णन केले आहे. त्याच्या काही काही छोट्या कविता नितान्त सुंदर आहेत. ल्यूसी ग्रे, वुइ आर सेव्हन, रेनबो, ककू, सॉलिटरी रीपर, ॲलिस फेल, पेट लँब, डॅफोडिल्स,– किती तरी छोट्या छोट्या कविता ! परंतु सहज-सुंदर आहेत. वर्डस्वर्थची प्रतिभा सर्वत्र सारखीच आहे असे नाही. ‘ ओड टु इम्मॉर्टॅलिटी ’ हे त्याचे गीत जणू ‘ उपनिषद ’ आहे. तेथे शब्दांना जणू पंख फुटल्याप्रमाणे वाटते. भावना व शब्द यांचा रमणीय संगम तेथे आहे. आणि विचारांची उदात्तताही आहे. “ काव्यदेवतेनं त्याच्या हातातील लेखणी घेऊन त्याच्यासाठी लिहिलं ” असे एकाने वर्डस्वर्थबद्दल लिहिताना म्हटले आहे; ते अशी भव्य गीते वाचताना सार्थ वाटते. तो उपेक्षित जनतेचा कवी होता. फ्रान्स देशात क्रांती होऊन बॅस्टिलचा तुरुंग फोडण्यात आला, त्या वेळेस वर्डस्वर्थ नाचला व म्हणाला, “ केवढी थोर घटना घडली. अशा वेळेस जिवंत असणे म्हणजे केवढी कृतार्थता ! ” वर्डस्वर्थला क्षुद्रतेची चीड होती. तो

नीतिधर्माचा उपासक होता. इंग्लंडमधील लाचलुचपती, गरिबांविषयीची वाढती बेफिकिरी, असंयमी वृत्ती हे पाहून तो म्हणतो, "मिल्टन, तू दूर राहणारा तारा! ये, पुन्हा ये, इंग्लंडला तुझी जरूर आहे."

वर्डस्वर्थने पुष्कळ दिवस लग्न केले नाही. त्याची बहीण त्याची काळजी घेई. पुढे त्याने लग्न केले, तरीही बहिणीचे प्रेम कमी झाले नाही. ही बहीणभावंडे इंग्रजी वाङ्मयात अमर आहेत. वर्डस्वर्थ त्याच्या काव्यासाठी, व बहीण–भावावरील प्रेमासाठी. तिचे जीवन म्हणजे भ्रातृप्रेमाचे मूर्तिमंत महाकाव्य!

मराठीतील केशवसुत, टिळक वगैरे कवींवर वर्डस्वर्थचा खूप परिणाम झालेला आहे. वर्डस्वर्थच्या काही कवितांचा त्यांनी मराठीत अनुवादही केलेला आहे.

सुधामाई, मी वर्डस्वर्थबद्दल लिहीत आहे. आणि परवा वामन पंडितांची पुण्यतिथी होती, त्यांचीही आठवण येत आहे. इ. स. १६३६ मधील त्यांचा जन्म. "सुश्लोक वामनाचा" या शब्दांनी आरंभ होणारी आर्या तुला माहीतच असेल. मराठीत वामन नावाचे कवी अनेक झाले म्हणतात. परंतु अनेक आख्याने लिहिणारा, गोड शब्दरचना करणारा, अनुरूप वृत्ते वापरणारा वामन इतरांपासून उमटून पडतो. या वामनाने गीतेवर यथार्थदीपिका म्हणून वीस हजार ओव्यांचा ग्रंथ लिहिला. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीला "भावार्थ-दीपिका" असे नम्रतेने म्हटले. वामनांना तो 'भावार्थ' जणू रुचला नाही आणि त्यांनी गीतेचा 'यथार्थ' दाखविला. परंतु महाराष्ट्राने भावार्थदीपिकाच हृदयाशी धरिली. वामनांनी गीतेचे समश्लोकी भाषांतर केले आहे. भाषांतर वामनांनीच करावे. भर्तृहरीची तिन्ही शतके त्यांनी मराठी काव्यात अनुवादिली. परंतु ही त्यांची काव्यरूप अनुवादशक्ती गीतेच्या समश्लोकीत कळसास पोचली आहे. विनोबाजींची गीताई व वामनांची समश्लोकी यांची मागे मी तुलना करीत बसे. विनोबाजींची अधिक प्रासादिक व गंभीर वाटते. परंतु दोनचार ठिकाणी वामन सरस वाटला.

कवितेत अधिक अक्षरांची यमके आणण्याची प्रथा वामनांनी पाडली. त्यांना 'यमक्या वामन' असे म्हणतात. यमक हा मराठी काव्याचा प्राण

आहे. काही भाषांचे जणू काही विशेष असतात. ते का असतात सांगता येत नाही. संस्कृतमधील निर्यमक रचना कानास गोड वाटते; परंतु मराठी नाही वाटत. विनोबांची निर्यमक गीताई वाचताना गोड वाटते. हा अपवादच म्हटला पाहिजे.

वामनांच्या कवितेत ठायी ठायी शब्दचमत्कार आहेत, प्रास-अनुप्रास खच्चून भरलेले आहेत. यामुळे अर्थांची हानी होते. परंतु हे दोष वगळले तर वामनाची रचना किती रमणीय वाटते. हुबेहूब चित्र त्यांनीच उभे करावे. श्रीकृष्णाचे पुढील वर्णन वाचा :—

अंग वक्र अधरी धरि पावा। गोपवेष हरि तोचि जपावा।
वामबाहुवरि गालहि डावा। तो ठसा स्वहृदयात पडावा॥

मुरलीधराचे— वाकडी मान, डाव्या बाहूवर मान, हातात बासरी— हे शब्दचित्र किती गोड आहे! आणि कृष्णाची वेणू ऐकून दूध पिणारी वासरे दूध प्यायचे विसरतात, तोंडातील दूध बाहेर पडते :—

मातृस्तनीचा रस आननात। तो होय वेणुध्वनि काननात।
गळे गिळेना पय वासरांते। आश्चर्य वाटे गगनी सुरांते॥

असे हे सहृदय वर्णन आहे. आपल्या गर्जनेने कृष्णाच्या मुरलीचा आवाज ऐकायला जाणार नाही म्हणून मेघ हळूहळू गर्जू लागला :—

हळुहळू घन गर्जतसे नभी। मुरलिहून चढेल म्हणून भी॥

किती सहृदय भाव! सुधाताई, तू वामनांची भरतभाव, वामनाख्यान, प्रल्हादाख्यान, भीष्मप्रतिज्ञा, कालियामर्दन, वेणु-सुधा, लोपामुद्रा-सीतासंवाद, इत्यादी आख्याने तरी वाच. कालियाने कृष्णाला वेढे दिले आहेत. कृष्ण आपले अंग फुगवतो. कालियाचा देह का तटातट तुटणार?

क्षणभरी जरि देह न सूटता। तटतटा स्थळिचे स्थळि तूटता।

असे हृद्य वर्णन आहे. आणि सीता रामाबरोबर वनात जायला निघते :

जानकी जनकराजकुमारी । पाय कोमल जिचे सुकुमारी ।
चालली जशि वना अनवाणी । बोलली कटकटा जनवाणी ॥

असे भावसुंदर, शब्दसुंदर श्लोक वामनांनीच लिहावे. आणि राशाचे वर्णन ऐक :

दूर्वांदलश्यामल दीप्ति देही । शोभे सवे लक्ष्मण जो विदेही ॥

रामरक्षेतील " रामं दूर्वांदलश्यामं " हा श्लोक का वामनांना आठवला ? पावसाळयातील दूर्वांचा रंग कसा निळसर– काळसर हिरवट असतो, तशी रामाची कांती होती.

आणि गुह कोळी येथे निजले होते म्हणून सांगतो. भरत त्या पवित्र धुळीत लोळतो. त्याच्या अंगावर रोमांच उभे राहतात :—

तनुवरी गुढियाच उभारती । कविमुखे किति वर्णिल भारती ॥

कवीच्या मुखाने वाग्देवता त्या सहृदय प्रसंगाचे किती वर्णन करणार ?

आणि वामनाख्यानातील बटु वामनाचे पुढील वर्णन ऐक :—

करि कमंडलु दंड मृगाजिन

एका चरणाने चित्र उभे केले. बळीजवळ वामन तीनच पावले जमीन मागतो. बळी देतो. आणि वामन एका पावलाने पृथ्वी व्यापितो, दुसऱ्या पावलाने आकाश व्यापतो. तिसरे पाऊल कुठे ठेवायचे ? राजाची फजीती होणार म्हणून देव दुंदुभी वाजवू लागतात. बळी म्हणतो :

" मी देवाच्या या घोषाला भीत नाही. परंतु प्रतिज्ञा पाळता आली नाही या अपकीर्तीला मी भितो. माझ्या मस्तकावर तिसरं पाऊल ठेव— "

न भी सुरांच्या जयघोष-नादा । भीतो जसा मी अपकीर्तिवादा ॥

असे उदात्त शब्द बळी बोलतो. मृच्छकटिकातील चारुदत्ताची आठवण होते. तो म्हणतो :—

न भीतो मरणादस्मि केवलं दूषितं यशः ।
विशुद्धस्य हि मे मृत्युः पुत्रजन्मसमः किल ॥

"मरणाचं मला भय नाही. यशाला कलंक लागेल म्हणून भीती वाटते. विशुद्धपणी आलेला मृत्यू, मला पुत्रजन्मासमान आहे." सुधा, अशी ही भारतीय परंपरा. काही झाले तरी तत्त्वच्युत होऊ नका असे भारतीय इतिहास शेकडो शतकांतून गर्जून सांगत आहे.

वामनांच्या कवितांतील सुंदरता या लहानशा पत्रात कशी दाखवू ? लहान प्रल्हादाला त्याचा गुरू देवाची निंदा करायला शिकवितो. प्रल्हाद ऐकत नाही. आणि—

हे तो गुरु पापतर म्हणावे

हा तेजस्वी चरण वामनांच्या प्रतिभेतून बाहेर पडतो. आजही भारतीय मुलांना धर्मान्ध व जात्यन्ध शिकवण देणारे गुरू पाहिले म्हणजे मला हे चरण आठवतात. भीष्मप्रतिज्ञेतील "असा येता देखे", किंवा "ये रथावरि झणी यदुराया", किंवा "मारावे मजला असेच असले चित्ती तुझ्या केशवा" इत्यादी गोड श्लोक कितीदा गुणगुणलो, तरी तृप्ती होत नसते. मी कधी एकटा असलो म्हणजे हे 'वामनी श्लोक' म्हणताना रंगून जातो. तू म्हणशील 'अण्णाने हे 'काव्यपुराण' आज काय लावले आहे.' ज्या वेळेस जे मनात येते ते बाळ, मी तुला लिहितो. तुझे जीवन एकांगी न होवो. काव्याने जीवनात सहृदयता येते. भावनांचा परिपोष होतो. सारी सृष्टी म्हणजेच महाकाव्य आहे. आपले जीवन म्हणजेही एक काव्यच आहे. कवी तुमच्या आमच्या मनांतील भावनांना शब्दांनी प्रकट करतो. कवी मानवी हृदयाचा, मानवी मनाचा प्रतिनिधी असतो. आदर्श बदलतात, ध्येये बदलतात, परंतु त्या त्या आदर्शासाठी; ध्येयांसाठी जीवनात प्रकट झालेली जी उदात्तता असते, ती चिरसुंदरच असते. म्हणून रामायणातील, महाभारतातील अनेक प्रसंगांवरील कविता आपल्याला अजूनही उचंबळवितात. आजच्या रवीन्द्रनाथांनीही कच-देवयानी, गांधारी, कर्ण यांच्यावर उदात्त कविता लिहिल्याच की नाही ! ते विषय त्यांना जुने नाही वाटले.

अप्पाच्या पत्रात अरुणाच्या गंमती होत्या. पाटी घेऊन गणित करीत बसते. जणू बेरीज करण्यासाठी बोटे मोडते. तू वाचायला बसलीस म्हणजे तीही

कोणते तरी पुस्तक उलटे वा सुलटे धरून भराभर वाचते. " हिंदुस्थान स्वतंत्र झाला " वगैरे आपल्या मनचे वाचते. मुलांची सारी गंमत. ती जी खूण करतील ती खूण वाटेल त्या आकड्यांची होते. त्या पुस्तकांतून आपल्याला हवे ते ती वाचतात. आपण मोठे होतो व ही गंमत गमावून बसतो. ल्हानपणच बरे का ?


तुझ्या शाळेत वाचनाची व काव्यगायनाची चढाओढ होऊन काव्यगायनात मुलींचा नंबर पहिला आला म्हणून तू लिहिलेस. मुलीचा आवाज जात्याच जरा गोड असतो. फुशारून नको काही जायला. परंतु वाचनात कोणाचा नंबर आला ?

सर्वांस स. प्र. चि. अरुणास व आनंदास, अरुणाच्या छोट्या मित्रास स. आ.

अण्णा

साधना, २९ एप्रिल १९५०

* *



चि. प्रिय सुधास,
सप्रेम आशीर्वाद.

तुम्ही पिकलेल्या आंब्याचे उष्टावण केलेत, परंतु मी अजून नाही केले. कोकणात घरी जाईन व घरचा आंबा खाईन. तुम्हीही खा. आपण सारीच चार दिवस घरी राहू व एक मोकळा कौटुंबिक आनंद लुटू. त्या आनंदा-सारखा गोड आनंद नाही. अरुणाला सर्वत्र नेऊ. शेताच्या बांधावर तिला बसवू नि फोटो काढू; किंवा तू तिला घेऊन त्या आपल्या जमिनीपासून फांद्या असलेल्या आंब्याच्या झाडावर बस. अप्पा फोटो काढील. आपण शेतातच एक दिवस स्वयंपाक करू. आमरस करू. मी आयते घालीन. आई मला म्हणायची तू किती पातळ सारखे आयते घालतोस. सुधा, तुला येतात का आयते घालता? तांदुळाचे पीठ पातळसर करायचे आणि जाड सपाट तव्यावर वाटीने वाटोळे पीठ ओतायचे. वर पत्रावळ झाकण. आयते किती सुंदर दिसतात! स्वच्छ दिसतात, नाजूक दिसतात. कला सर्वत्र आहे. देशावर कणकेचा मांडा करतात. अगदी चिकण गव्हाची कणिक लागते; पुरण भरुन थोडी लाटून मग हातावर पोळी वाढवीत वाढवीत नेतात व

उलट्या खापरावर टाकतात. अग, घडी केली तर केवढीशी होते! तू असा मांडा करताना कोणाला पाहिले आहेस?

ज्ञानेश्वरांच्या चरित्रात गोष्ट आहे. ज्ञानेश्वर मुक्ताबाईला म्हणाले, "मांडे कर." परंतु त्यांच्यावर बहिष्कार होता. त्यांना खापर मिळेना. चुलीवर खापर उलटे ठेवून त्यावर मांडा भाजायचा असतो. शेवटी ज्ञानदेव मुक्ताबाईस म्हणाले, "माझ्या पाठीवर मांडे भाज."

तुम्ही कोकणात या. मी वाट पाहीन. अप्पा पुन्हा झाडावर चढेल. झेल्याने आंबे कसे काढतात ते अरुण बघेल. झेल्याने आंबे ओढीत असताना पिकलेला आंबा जरा धक्का लागताच खाली कसा पडतो आणि तो खाण्यात कशी मौज असते ते पत्रात सांगून थोडेच कळणार?

आपली अलिबागची अक्का झाडावर चढण्यात पटाईत. ती चपळ नि खुटखुटीत. त्या गोष्टीला ३० वर्षे होऊन गेली. अक्का माहेरी आली होती. अप्पा नि अक्का दोघे शेतावर जात. अप्पा असेल पंधरा वर्षांचा. अक्का आंब्याच्या झाडावर चढली. टोकांबा त्याचे नाव. ती झेल्याने आंबे तोडून घेऊन खाली टाकीत होती आणि अप्पा गोणपाटाने फटक फटक करीत होता. आणि तिकडून सीतारामनाना ओकांनी ती गोष्ट पाहिली. त्यांनी भाऊंना सांगितले. दुसऱ्या दिवशी भाऊ अक्काला म्हणाले, "चंद्रे, तू का झाडावर चढली होतीस?"

"मग त्यात काय भाऊ! भराभर काढले आंबे." अक्का म्हणाली.

"अग, एखादे वेळेस वारा सुटतो. पुन्हा नको चढूस." ते म्हणाले.

मला सीतारामनाना आठवल्यामुळे त्यांच्या घरचाच तो मुलगा आठवतो. अग, दुपारच्या वेळेस तो आंबे काढायला गेला. उंच झाड आणि वारा सुटला जोराचा. तो खाली येऊ लागला. परंतु त्याचा हात निसटला. तो खाली पडला उंचावरून, आणि तात्काळ देवाघरी गेला. घरी माणसे वाट बघताहेत—की अजून जेवायला येत कसा नाही? तो हाकाहाक कानी आली. कसले जेवण नि काय! मरण कोणाला कुठे कसे येईल त्याचा नेम नसतो? जणू कोणी

ओढून नेतो. आपल्या विठोबारावांचा मुलगा नाही का? मागे विहिरीतून चांगला पोहून वर आला. परंतु म्हणाला, ‘पुन्हा दोन उड्या मारून येतो.’ आणि त्याने पुन्हा बुडी मारली. परंतु वर आला नाही. त्याला का मृत्यूने ओढून नेले? गावोगाव अशा गोष्टी असतात. मला मावशी बडोद्याची गोष्ट सांगायची. नर्मदाकाठच्या चांदोद कर्नाळी गावी लग्न होते. दुपारी जेवणाची पंगत मांडलेली. एक मुलगा नर्मदेवर गेला. तेथे नर्मदेत सुसरी नि मगरी. ती बघ एक सुसर तीराजवळ आहे, आणि मुलाला एकदम ओढून घेऊन ती गेली. मुलगा ओरडतो आहे! गेली सुसर! मंडपात बातमी आली. ज्याच्या त्याच्या तोंडचे पाणी पळाले. लग्नाचा समारंभ, आणि मरण येऊन उभे राहिले! सुख आणि दुःख ही जणू जवळजवळ असतात. ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे: “जीवनाच्या पोटी येथे मरण आहे.” होऊ दे या मरणाच्या गोष्टी. जीवन अनंत आहे. मरणही जीवनाचे जणू रूप. मरण म्हणजे पुन्हा नवजीवन मिळविण्यासाठी घेतलेले तिकिट. सभोवती मरण असले तरी आपण जीवनाकडेच पाहतो. महात्माजी म्हणायचे, ‘सभोवती निराशा, हिंसा यांचे थैमान असले तरी जीवनाचे, सृष्टीचे अंतिम स्वरूप विनाशाहून, हिंसेहून निराळे असले पाहिजे. आणि जीवनाचा हा परमोच्च कायदा म्हणजे प्रेम होय.’

सर्वत्र उन्हाळा आहे. परंतु पाण्याचा थेंबही पडत नसताना झाडामाडांना नवपालवी फुटत आहे. फुलाफळांनी झाडेमाडे सजत आहेत. कोकिळा गायन करीत आहे. सृष्टीचे अपार वैभव दिसून येत आहे. उन्हाळ्याच्या रखरखीत हे अमृतमय आनंद आहेत.

आज आपले जवाहरलाल नेहरूच बघ. जगात आज सर्वांहून अधिक थोर दृष्टी असलेला कोणी मुत्सद्दी असेल तर ते नेहरू वाटतात. अमेरिकेत अजूनही नीग्रो लोकांसाठी निराळ्या शाळा आहेत. परवा एका अमेरिकन नीग्रोने एका अमेरिकन गोऱ्या मुलीबरोबर लग्न केले म्हणून त्याला नोकरी-वरून काढून टाकण्यात आले. दक्षिण आफ्रिकेतील मुख्य प्रधान मालन निरनिराळ्या रंगांच्या लोकांनी निरनिराळ्या अलग भागांतच राहावे म्हणून कायदे करीत आहेत. जगात अजून मानवता यायला किती काळ लागेल हरी जाणे! महात्माजी मानवतेचे उपासक होते. हे सारे बाह्य भेद त्यांनी

दूर केले होते. भारतात सारे प्रकार. परंतु मरणाआधी ते म्हणाले, " शेवटचा श्वास असेपर्यंत मी सांगत राहीन की हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती, शीख, पारशी– सारे या भारतमातेचे आहात. " त्यांची ती दृष्टी घेऊनच जवाहरलाल जात आहेत. ती दृष्टी त्यांच्याजवळ नसती, तर त्यांनी परवाचा करार केला नसता. जगातील भांडणे, द्वेषमत्सर वाढवणारा मोठा की दुःखे गिळून मोठी दृष्टी घेऊन हे जग जरा भले व्हावे म्हणून धडपडणारा मोठा? जगात शांततेसाठी नोबेल पारितोषिक असते. परंतु जगात मानवता यावी, युद्धे जावीत, पिळणूक संपावी, प्रेम फुलावे म्हणून ज्यांनी मरेपर्यंत अविश्रांत परिश्रम केले, त्या शांतीसाठीच ज्यांची शेवटची आहुती पडली त्या महात्माजींची आठवण त्या शांततेसाठी नोबेल बक्षीस देणाऱ्या संस्थेस झाली नाही. आज भारत व पाक यांच्यात पुन्हा कमालीचा द्वेषाग्नी पेटला असता, युद्ध भडकेल असे वाटत असता पंडित जवाहरलाल नेहरू अनंत मनोयातना गिळून पुन्हा मोठ्या मनाने वाटाघाटी करून शांती निर्मिण्यासाठी धडपडतात! केवढे भव्य दृश्य, केवढे दैवी कर्म! भारताने जर दंगली केल्याच नाहीत तर इकडे पाकचे लोक परिस्थिती पाहायला कशाला? भारत नि पाक का समान दोषी? असे ल्हान दृष्टीचे लोक म्हणतात. परंतु कर नाही त्याला डर कशाला? येथे मानापमानाचे प्रश्न नाहीत. एका इंग्रजाचा कोणी स्पॅनिशाने दोन–चारशे वर्षांपूर्वी कान कापला म्हणून इंग्रजांनी युद्ध पुकारले. त्या कानासाठी हजारो कुटुंबांतून हाय हाय! असले मानापमान रानटी होत.

दोन राष्ट्रांतील प्रश्न म्हणजे पोरांमधील भांडण नव्हे. जो मोठी दृष्टी घेईल तो मोठ्या मनाचा. तो मानवतेला तारणारा, तो तिचा उद्धारकर्ता! सुधा, नेहरूंनी आज भारताला साऱ्या जगात नैतिक दृष्टीने उंच केले आहे. आपल्या राष्ट्राला याचा अभिमान वाटावा. सभोवती आंधळेपणा, अहंकार, विनाश, द्वेष, अज्ञान यांचे थैमान असता नेहरू समझोता करीत आहेत. मौलाना आझाद दिल्लीला सांस्कृतिक संबंध संस्था सुरू करीत आहेत, याचा आपणास अभिमान वाटायला हवा. जगात अणुबॉंब, हैड्रोजन बॉंब यांचे शोध लागत आहेत, परंतु भारत हृदये जोडण्याचा प्रयोग करीत आहे. तो प्रयोग करताना महात्माजी पडले. त्यांचा वारसदार पुत्र तो प्रयोग पुढे नेत आहे. ऋषिमुनींनी सुरू

केलेला प्रयोग पुढे जात आहे. मानवांना एकत्र नांदविण्याचा प्रयोग. वेदांतील सरस्वतीसूक्तातील सरस्वती म्हणते :

" अहंराष्ट्रीसंगमनीजनानाम् "

" मी सर्व राष्ट्राची आहे; लोकांचे भिन्न प्रवाह जोडणारी, त्यांचा संगम करणारी आहे. " हे ध्येय आज ज्याच्या डोळ्यांसमोर असेल, तदर्थ जो रात्रंदिवस धडपडत असेल, तो भारताचा सत्पुत्र, तो भारतीय संस्कृतीचा खरा उपासक. बाकीचे केरकचरा फोलकट होत. एखादे वेळेस वाटते की, नवभारताची मुलेमुली हजारोंनी उठावीत व ऐक्याची उदात्त गाणी गात हिंडावीत. दहा-दहा– वीसवीस मुलांच्या टोळ्या कराव्या. दिवसभर त्यांनी गावसफाई करावी. इतर काही काम करावे. रात्री गाणी, संवाद कार्यक्रम करून पुढे जावे. प्रचाराचा, नवविचारांचा, उदार कल्पनांचा पाऊस पाडायला हवा. परंतु आहे कोणाला स्फूर्ती ? ती एक मिशनरी ज्वाला पेटल्याशिवाय कोणतेही कार्य होणार नाही. जात्यंधांच्या संघटना विषे पेरीत आहेत. हिंसक लोकांच्या संघटना आगी लावीत आहेत. अग, माझे एक मित्र नगर जिल्ह्यात काम करतात. त्यांनी त्यांच्या तालुक्यात सहकारी पद्धतीने केवढे काम केले, जनतेचे, शेतकऱ्यांचे केवढे कल्याण केले, काळ्या बाजाराला किती आळा बसविला; परंतु त्यांचा वाडा परवा हिंसकांनी भस्म केला. माझे हे मित्र हिंसक आगलावे ! गरळ ओकणारे, धर्महीन, धर्मान्ध यांच्याविरुद्ध प्रत्यक्ष सेवेने नि सद्विचार-प्रसाराने झगडत होते. त्यांच्या सेवेमुळे आपला प्रभाव पडत नाही, आपली टाकी टुपत नाही असे पाहून दुष्टांनी आग लावून त्यांचा वाडा भस्म केला; परंतु बंगालमध्ये, पंजाबमध्ये अशा हजारो आगी गेल्या दोन-तीन वर्षांत लागल्या. व्यक्तींच्या सुखदुःखाने ऐतिहासिक मूल्ये, ऐतिहासिक घडामोडी अजमावयाच्या नसतात. स्वतःच्या वैयक्तिक जीवनाची फूटपट्टी घेऊन महान आंदोलने मोजता कामा नये. प्राचीन काळापासून एकीकडे आसुरी वृत्तीचे लोक व दुसऱ्या बाजूला उदार वृत्तीचे नम्र; परंतु निर्भय असे दैवी वृत्तीचे लोक यांचा लढा चालत आला आहे; तो आजही चालू आहे. यात अनेकांच्या आहुत्या पडतील, अनेकांचे संसार रसातळास जातील. जगन्नाथाच्या रथाखाली चुरडून घेतल्याशिवाय नवनिर्मिती कोठली ?

परवा मी हिंदी साहित्यसम्राट प्रेमचंद यांच्या पत्नीने लिहिलेले स्मृतिरम्य चरित्र वाचीत होतो. मराठीत हे पुस्तक यायला हवे. अग, प्रेमचंद मानवधर्माचे उपासक होते. ते हिंदू–मुस्लिम ऐक्याचे पुरस्कर्ते, म्हणून त्यांनाही धर्महीन धर्मान्ध लोक ‘ मुल्ला ’, म्हणून उपहासाने म्हणत. तुझ्या अण्णालाही धुळ्याच्या काही लोकांनी मागे मुल्ला म्हणून संबोधिले होते. निदान एका बाबतीत तरी त्या थोर साहित्यिकाशी माझे नाते जडले म्हणून मला अपार आनंद झाला.

माझा एक मारवाडी तरुण मित्र आहे. तो अमेरिकेतून शिकून आला. आता एका गिरणीत मोठा अधिकारी आहे. पाच-सातशे रुपये पगार आहे. त्याच्या बहिणीचे मला पत्र आले आहे की, त्याला आंतरजातीय लग्न करायचे आहे. एखादी सुशिक्षित वधू पाहा. मी कुठे जाणार वधू-संशोधन करीत ? परंतु मला माझ्या या तरुण मित्राचे कौतुक वाटले. साऱ्या देशभर आंतरजातीय विवाह सुरू व्हायला हवे आहेत. राष्ट्र धांडुळून निघो. सारी सरमिसळ होवो. त्यातून चैतन्यमय नवभारत उभा राहील. लोक अजून तयार होत नाहीत. त्या त्या जातीत नवरे मिळत नाहीत, नवऱ्या मिळत नाहीत. शेकडो लग्ने अडून राहतात. अशा वेळेस सीमोल्लंघन करणे हाच विजयाचा मार्ग असतो; परंतु आमच्या मुर्दाड जडजरठ लोकांना हे सारे अब्रह्मण्यं वाटते, आणि त्याच त्या संकुचित क्षेत्रात रडके संसार मांडीत बसतात.

सुधा, माझ्या मनात जे जे उसळते ते तुला लिहितो. भारतातील नवीन विचारांची दिशा तुला कळायला हवी. स्वतंत्र बुद्धीची तेजस्वी मुलगी तू हो.

परवा झोप येईना म्हणून मी आरामखुर्ची बाहेर टाकून एकटाच पडलो होतो. आकाश स्वच्छ होते. निळ्या–काळ्या आकाशातील तारे धुतल्यासारखे स्वच्छ दिसत होते. सर्वत्र शांत होते. मी आकाशात पाहात होतो. ताऱ्यांचे मुके सकंप संगीत अनुभवीत होतो. वेदामध्ये वरुण ही आकाशाची देवता आहे. वरुण म्हणजे आच्छादन घालणारा. हा आकाशाचा देव पुढे समुद्राचा कसा झाला कोणास कळे. वेदांत वरुण ही नीतीची देवता आहे. ताऱ्याच्या हजारो डोळ्यांनी तो तुमच्याकडे बघत आहे असे वर्णन येते. मला त्या वर्णनाची परवा आठवण झाली. जणू विराट् विश्वंभर बघत आहे असे वाटले. ते सहस्र डोळे माझ्या जीवनात घुसत आहेत असे वाटले. मी घाबरलो. आपले

सारे जीवन कोणी बघावे असे आपणास वाटत नाही. जीवनात नाना खळमळ असतात. दडून राहिलेल्या शेकडो गोष्टी. वरून रंगीत दिसणारे कृत्रिम फळ आता मातीचे वा शेणाचे असते. मी डोळे मिटले आणि उठून घरात आलो. केव्हा मग झोप लागली कळलेही नाही. उठलो तो मन शांत होते. झोप म्हणजे जणू अमृत, नवजीवनदायी अमृतांजन! विश्वमातेचा प्रेमळ हात! झोपेचा केवढा उपकार! परंतु झोप म्हणजे लहानसे मरण. मोठी झोप म्हणजे मोठे मरण! म्हणून मरणाचाही उपकार! मरणही सुंदर, जीवनही सुंदर! गंमत.


सुधामाई, तू म्हणशील अण्णा लिहितो ते सारे कळतही नाही. न कळू दे. रवीन्द्रनाथांनी म्हटले आहे की, मुलांसाठी लिहाल त्यात काही समजणारे असू दे, काही न समजणारे. जे समजेल त्याच्या आधाराने न समजणाऱ्याकडे त्यांची विचारशक्ती उडी मारील!

तुम्ही कोकणात या हां. करवंदीच्या जाळ्या शोधू. काळ्याभोर जाळी. सोमेश्वराच्या देवळाजवळ केवढाल्या जाळ्या. ती काळी करवंदे खाऊ. मध्येच एखादा साप फण् करीत जाईल. जरा घाबरू; परंतु पुन्हा गंमत करू, हसू. कोकिळा हाका मारील, आपणही कुऊ करू. तुम्ही याल तर चार दिवस निसर्गाचा आनंद लुटू. सर्वांस प्रणाम! चि. प्रिय अरुणास दोन करवंदी चिमटे.

अण्णा

साधना, ६ मे १९५०

* *



चि. प्रिय सुवास,
सप्रेम आशीर्वाद.

तू चि. प्रिय मालतीच्या लग्नाला गेली होतीस, व लग्न नीट पार पडले, खेळीमेळीने सारा समारंभ झाला, लिलीने सुरेख मंगलाष्टके म्हटली वगैरे वाचून आनंद झाला आणि पतिगृही जाताना मालती रडू लागली व तिचा भाऊ गोपूही गोरामोरा झाला; इत्यादी तू लिहिलेले वाचून मीही गहिवरलो. मुलगी शेवटी सासरी जायची असते. ती जणू दुसऱ्याची ठेव असते, जुनी नाती मनात ठेवून नवीन नाती जोडायला ती जात असते. सुख व दुःख यांची ती घटका असते. परंतु सारे जीवनच असे आहे. योग आणि वियोग यांनी हे जीवन भरलेले आहे.

तू शाकुंतल नाटक वाचले असशील. ती गोष्ट तुला माहीत असेल. कविश्रेष्ठ कालिदासाने तेथे सहृदय प्रसंग रंगविला आहे. शकुंतला सासरी जायला निघते. आश्रमातील झाडेमाडे, पशुपक्षीही तिला प्रेमस्नेहाचा निरोप देतात व सद्गदित होतात. शकुंतलेला ज्याने वाढविले तो ऋषी कण्व म्हणतो,

"माझ्यासारख्यांचे हृदयही शकुंतला सासरी जात आहे या विचाराने भरून येते. मग सांसारिक किती दुःखी होत असतील." कण्व महर्षी तिचे समाधान करतात व म्हणतात, "तुला परत आणू. उगी, रडू नको."

सुधा, तू स्त्री-जीवनातील या प्रसंगावरच्या ओव्या वाच. स्त्रियांनी या प्रसंगावर अमर काव्य लिहिले आहे. जेवताना एका मैत्रिणीने "जा मुली जा" हे सुंदर गाणे म्हटले व आमचे घास हातातच राहिले म्हणून तू लिहिलेस. खरे आहे. भावना उचंबळल्या म्हणजे खाण्यापिण्याची शुद्ध कोणाला राहणार ?

हा लग्नाचा मोसम आहे. किती तरी ठिकाणी लग्ने होत आहेत. कोठेही जा. लग्नाला जाणाऱ्या लोकांची गर्दी दिसेल. माझ्याकडे किती तरी लग्न-पत्रिका येतात. उत्तरे तरी कितींना पाठवू ? आणि जेथे लग्न लागते तेथे मंडळी असतात तास दोन तास. वेळेवर पत्र पाठवता आले नाही तर मागून पाठवायचे तरी कोठे ? कारण नेहमीचे त्यांचे पत्ते माहीत नसतात व ते त्या पत्रिकांत नसतात. म्हणून मी पत्रिका हातात घेतो, क्षणभर डोळे मिटतो व वधूवरांची संसारयात्रा सुखाची, स्नेहाची, प्रेमाची नि सेवेची होऊन उभयतांचे जीवन कृतार्थ होवो अशी मनात प्रार्थना करतो. दुसरे काय ?

कधी कधी कुठे लग्नाला जाताना भेट तरी काय द्यायची हा प्रश्न उभा राहतो. तुझ्या अण्णाजवळ आहे तरी काय ? जवळ एखादे देण्यासारखे पुस्तक असले तर देऊन टाकतो. मजजवळ आता पुस्तकेही राहिली नाहीत. म्हणून एखादे वेळेस द्यावयास काहीच जवळ नाही म्हणून वाईट वाटते. परंतु मी मनाचे समाधान करतो. "तू तुझी सदिच्छा दे" असे मी मनाला म्हणतो. सदिच्छेलाही किंमत आहे. किंबहुना बाहेरच्या देणग्या देत असताना मनात सदिच्छा नसेल, प्रेम–स्नेह नसेल तर काय उपयोग ? परंतु सुधा, प्रेमाला कृतीत प्रकट व्हायची इच्छा असते. प्रेमाचे काही तरी प्रतीक हवे. मग--ते रुक्मिणीचे तुलसीदल असो, द्रौपदीचे भाजीचे पान असो, शबरीची बोरे असोत, सुदाम्याचे पोहे असोत. काही तरी बाह्य चिन्ह हवे. एरवी प्रेमाला समाधान नाही. प्रेम सर्वस्वदानासाठी अधीर असते. दिल्याशिवाय प्रेमाला चैनच पडत नाही.

तुला ती एक गोष्ट माहीत आहे? भगवान बुद्ध नगराबाहेर वनराजीत उतरले होते. त्यांचा शिष्य नगरात "भगवान बुद्धांना द्यायला योग्य अशी देणगी द्या" असे म्हणत जात होता. ते पाहा मोठमोठे शेठसावकार धनानें भरलेली ताटे आणीत आहेत. परंतु तो शिष्य म्हणतो, "नको. मला निराळी देणगी हवी. ही योग्य नाही." त्या शिष्याला कोणत्या प्रकारची देणगी हवी होती? त्याला त्या मोठ्या नगरात गुरूला द्यायला योग्य अशी देणगी मिळाली नाही.

तो रिक्तहस्ताने जात असतो. त्याची पावले वनाकडे वळतात. इतक्यात एका वृक्षाआडून पुढील शब्द कानांवर येतात :

"ही माझी देणगी घ्या. मजजवळ माझ्या नेसूंच्या वस्त्राशिवाय दुसरं काही नाही. ते वस्त्र मी देत आहे. ते घ्या."

तिने वस्त्राची घडी त्या शिष्याकडे फेकली. तो शिष्य म्हणाला, "मी कृतार्थ झालो. गुरूला द्यायला ही योग्य अशी देणगी आहे."

सुधा, ती चिंधी धनवंतांनी देऊ केलेल्या माणिकमोत्यांच्या राशीहून का अधिक मोलाची होती? होय. त्या चिंधीची किंमत कोण करील? धनवंतांनी ताटे भरून धन आणिले. त्यांच्या संपत्तीतील तो कचरा होता; परंतु त्या अभागिनीने शेवटची जवळची चिंधीही दिली होती. महात्माजींच्या स्मारकाला बड्या व्यापाऱ्यांनी पाच कोटी रुपये दिले. त्यांच्या संपत्तीतला तो एक कण होता. तो कणही नाना हेतू मनात धरून दिलेला असेल; परंतु एखाद्या गरिबाने दिलेला एक आणा,– त्याची किंमत अनंत आहे. खरे प्रेम सर्वस्व द्यायला तहानलेले असते व शेवटी प्राणही समर्पिते.

मी ही अनेक लग्ने बघत आहे. परंतु रूढ बंधने मोडून कोणी लग्न करीत आहे का इकडे माझे लक्ष असे. त्याच त्या जातीतील लग्ने आता पुरेत असे वाटते. सरमिसळ झाल्याशिवाय भारतास सर्वगामी नवचैतन्य येणार नाही. अजून आपल्याकडे ही जात, ती जात, याच कल्पना आहेत. श्रेष्ठकनिष्ठपणाची बंडे आहेत. हिंदुधर्मातच हे आहे असे नाही तर सर्व धर्मांच्या अनुयायांतही हे प्रकार दिसतील. खिस्ती धर्मातही बडे सरदार लोक गरिबाशी लग्न लावायला

तयार होत नाहीत. तो इंग्लंडचा राजपुत्र आठवा एडवर्ड. त्याला गादी सोडावी लागली. का तर तो राजघराण्यातील एखाद्या राजकन्येशी लग्न न करता दुसऱ्या एका मुलीशी लग्न करता झाला म्हणून! इंग्लंडमधील लोकशाहीचा हा पराजय होता. नुसते सर्वांना मत देऊन लोकशाही येत नाही. सर्वांचा दर्जाही समान लेखायला हवा. मानवता सर्वत्र एकच आहे. अग आमचे एक मित्र बाबूलाल अत्तार चांगले कार्यकर्ते आहेत. ते एका शेख घराण्यातील मुलीशी लग्न करणार आहेत, म्हणून त्यांची अत्तार मंडळी त्यांच्यावर रागावली आहेत. अत्तार समाजातीलच मुलीशी लग्न लाव असा त्यांचा आग्रह. तसे पाहिले तर शेख हे अत्तार समाजाहूनही श्रेष्ठ मानले जातात; परंतु आपल्याच समाजातील हवी हा आग्रह. वास्तविक पैगंबर हे मानवतेचे महान उपासक. त्यांनी कालपर्यंत गुलाम असणाऱ्या मुली मोठमोठ्या खानदानांना देवविल्या. ज्या एका गुलामाला त्यांनी स्वतंत्र केले त्याने आपल्यामागून खलिफा व्हावे अशी इच्छा त्यांनी प्रदर्शित केली होती. त्याच पैगंबरांच्या धर्मातील हे लोक तू अत्तार, मी शेख करीत बसले आहेत. मनुष्याला समता का आवडत नाही?

भारतात सर्रास सर्वत्र मिश्र विवाह सुरू व्हावेत असे मला वाटते. मुलांमुलींनीं याबाबत बंड करावे; परंतु आईबापांच्या आधारावर अवलंबून असणारी मुले बड करू शकणार नाहीत. स्वतंत्र व्हायला स्वतःचा संसार स्वतंत्रपणे चालवायची अंगात धमक हवी. नाही तर "अर्थस्य पुरुषो दासः" याप्रमाणे शेवटी 'आईबाप असे म्हणतात, मग काय करायचे–' असे रडके उद्गार काढणारे तरुणच सर्वत्र आढळायचे.

यंदा उन्हाळा दर वर्षीपेक्षा अधिक आहे, नाही? पुण्याला मध्यंतरी पाऊस पडला. दिवसभर खूप तापल्यावर रात्री एकदम थंड झाले तर पाऊस यायचाच. अग येथेही परवा चार थेंब पडले. मी उजाडत कोठे तरी जात होतो. अंगावर थेंब पडले. म्हटले, कोणी मुखमार्जन केले की काय? परंतु पाहतो तो सर्वत्रच थेंब पडत आहेत असे दिसले. पाऊस फार नाही पडला; चार थेंब– नि लगेच गेला.

खरा पावसाळा सुरू होण्याआधी हे असे पाऊस एक दोन वेळा पडतील. आंब्याचे नुकसान करतील. सृष्टीला तुमच्या नफ्यातोट्याची कदर नसते. तुम्ही तिच्याशी मिळते घ्या नि समाधान माना.

तू आपल्या पत्रात मला एक प्रश्न विचारला आहेस! संस्कृती म्हणजे काय रे अण्णा, असे एक ल्हानसे वाक्य तू लिहिले आहेस. संस्कृती म्हणजे जीवनाला जे जे उजाळा देते, सुंदरता देते, समृद्ध करते, पुढे नेते, ती ती संस्कृतीच होय. संस्कृती म्हणजे संयम. मानवाला सुसंस्कृत व्हायचे असेल तर मानवाने संयम राखला पाहिजे. मी मोठा, माझा धर्म मोठा, माझी जात मोठी, माझा प्रान्त मोठा, माझे राष्ट्र मोठे, माझे तेवढे चांगले, बाकीचे त्याज्य– असे म्हणणाऱ्याला संस्कृती कळली आहे असे मला वाटत नाही. संस्कृती जगातील जे जे चांगले ते ते घ्यायला तयार राहील. संस्कृती सहकार करील. संस्कृती संगम करील. असे न करणारी ती संस्कृती नसून विकृती होय.

परवा एका पुस्तकाच्या प्रस्तावनेत वाचले, "हिंदू संस्कृतीचा कोणीच वाली नसावा की याय?" या लोकांना हिंदू संस्कृती म्हणजे वाटते तरी काय! महात्माजी का हिंदू संस्कृतीचे परमोच्च फळ नव्हते? ज्यांचे जीवन म्हणजे प्रत्यक्ष गीता त्यांना का हिंदू संस्कृतीचे वाली म्हणावयाचे नाही? महात्माजी दिल्लीला म्हणाले, "हिंदू धर्मांचा कोणी प्रतिनिधी परमेश्वराला निवडायचा झाला तर तो माझीच निवड करील असे मला निःसंशय वाटते." हे त्यांचे उद्गार का खोटे आहेत? विनोबाजी का हिंदू संस्कृतीची मूर्ती नाहीत? परंतु ते ज्या भक्तीने वेद अभ्यासतात त्याच भक्तीने कुराण अभ्यासतात. आमच्या तथाकथित हिंदू संस्कृतीच्या कैवाऱ्यांना हा मुस्लिम-धार्जिणेपणा वाटतो!

ज्ञान हा हिंदू संस्कृतीचा आत्मा आहे. गायत्रीमंत्राने ज्ञानाचा महिमा सांगितला. ज्ञान म्हणजेच ब्रह्म असे आम्ही म्हणत आलो. संस्कृतीचा उपासक साऱ्या जगातून ज्ञान घेईल आणि मानव समाज सुखी, समृद्ध, प्रगतिशील असा करण्यासाठी धडपडेल.

तू अशा संस्कृतीची उपासक हो. सर्व संस्कृतींतील चांगले घेऊन मानव-संस्कृतीची उपासना करणारी हो. आज जगाला मानवसंस्कृतीची गरज आहे.

चर्चा फोल आहेत. आपण प्रत्येक दिवस कसा जगतो ही गोष्ट महत्त्वाची आहे. ती एक गोष्ट तुला माहीत आहे? रस्त्यात कोणी तरी अनाथ पडला होता. कोण होता तो? त्याची का काळजी घ्यायला या उभ्या जगात कोणी नव्हते?

तो पाहा एक गृहस्थ येत आहे. अनाथाला पाहून तो त्याच्याजवळ जातो, परंतु पुन्हा चालू लागतो.

" मुसलमान दिसतो आहे. मरू दे बेट्याला. " असे तो म्हणतो.

तो पाहा दुसरा कोणी तरी येत आहे. त्या अनाथाला पाहून त्याला दया येते. तो खाली वाकून बघतो व पुन्हा उपेक्षेने चालू लागतो.

" ऊंः ! हिंदू आहे कोणी तरी. मरो बेटा." असे तो म्हणतो.

शेवटी मृत्यू येतो व तो हिंदू की मुसलमान ते न बघता त्याला कायमचा विसावा देतो.

सुधा, तू या वरच्या दोन माणसांना संस्कृतिसंरक्षक म्हणशील की संस्कृतिभक्षक म्हणशील? आजच्या युगात अशा लोकांची जरूर नाही. कलकत्त्यात पूर्व बंगालमधून निर्वासित येत आहेत व पश्चिम बंगालमधून पूर्व बंगालमध्ये जाण्यासाठी जमा होणारे मुस्लिम निर्वासितही आहेत. समाजवादी स्वयंसेवक या दोघांना शक्य ते साहाय्य करतात. 'तुम्ही मुसलमान निर्वासितांना मदत कराल तर खबरदार, तुमचे खून पाडू' अशा निर्भयपणे धमक्या या समाजवादी कार्यकर्त्यांना देण्यात आल्या; परंतु ते मानवतेची सेवा करीत आहेत. इतरांनी लाखो रुपये जमवले असतील; परंतु या मानवतेच्या खऱ्या सेवेच्या कणापुढे ते कोट्यवधी रुपये प्रभूच्या दृष्टीने कचराच होत. नवभारताचा, नवयुगाचा, नव्या जगाचा त्या निरपेक्ष सेवेतून जन्म होईल.

मी पुन्हा बाहेर निजू लागलो. रात्री आकाशातील गंमत बघतो. ढग येतात आकाशात. परंतु ते दाट नसतात. झिरझिरीत असतात. आपण अंगावर अर्धवट पातळसे पांघरूण घ्यावे त्याप्रमाणे आकाशातील तारका क्षणभर ढगांचे झिरझिरीत पांघरूण अंगावर घेतात, तर दुसऱ्याच क्षणी फेकून

देतात व हसू लागतात. सारखा त्यांचा खेळ चालू होता. जणू लहान मुले खेळत; पण आणखी एक महिन्याने हेच शुभ्र मेघ कृष्णवर्ण होतील, जाड होतील, व साऱ्या आकाशाला झाकोळून टाकतील.

परवा वारे अशा सोसाट्याचे सुटले म्हणतेस! माझे अंथरूण उडून जाईल असे वाटले. खाटेसकट मला वारा घेऊन तर नाही ना जाणार असा गमतीदार विचार मनात आला. आपल्या पालगड गावातील खऱ्यांकडची गोष्ट आहे. ते म्हणे रात्री अंगणात माच्यावर झोपले होते. सकाळी ते उठले तेव्हा ते तांबड्याच्या माळावर होते! त्यांच्या माच्यासकट रात्री तांबड्याच्या माळावर आणून टाकले कोणी? अंतर तरी का कमी? चांगले मैल–पाऊण मैल. भुताने त्यांना खाटेसकट उचलून नेले असावे, असे लोक म्हणाले. आम्ही लहानपणी अंगणात रात्री झोपलो म्हणजे ही दंतकथा डोळयांसमोर येत असे. झोप लागेपर्यंत भीतीही वाटे. परंतु कधी कोणाची खाट दूर गेली नाही. परवाच्या रात्रीच्या वादळाच्या वेळेस ती गोष्ट मला आठवली!

वारा म्हणजे अद्भुत वस्तू! तो दिसत नाही, परंतु त्याचे अस्तित्व सारखे भासते. कोठून येतो तो, कोठे त्याचे घर? तो दरीत राहतो की गुहेत राहतो? वनात राहतो की डोंगरात? आकाशात की पाताळात? वाऱ्यावर आपले जीवन अवलंबून आहे. हवा म्हणजे वाराच ना? हवा अधिक चलन-वलन करू लागली म्हणजे आपण तिला नाना नावे देतो. वारा झाडांमाडांशी खेळेल, फुलांजवळ गुजगोष्टी करील, लाटांजवळ धिंगामस्ती करील. मनुष्य घामाघूम झालेला असावा. वाऱ्याची एक झुळूक आली तर परमानंद होतो; परंतु हा खेळकर प्रेमळ वारा कधी कधी रुद्र रूप धारण करतो. मग तो डोंगर उडवील, समुद्रात पर्वतप्राय लाटा उठवील, वाळूचे ढीग वर नेईल व एकदम खाली फेकील, झाडे मोडील, घरे पाडील. फुलांना नाचवणारा फुलांच्या फाडफाड थोबाडीत देईल. सुधामाई, प्रत्येकाचे सौम्य व रुद्र रूप असते. कृष्ण परमात्म्याने अर्जुनाला ते रुद्र असे विराट् रूप दर्शविले तेव्हा अर्जुन म्हणाला, "देवा, तुझं ते सौम्य रूपच दाखव."

आपले दादा आजारी होते. त्यांना मधून वाताची लहर येई. एके दिवशी रात्री सारखे श्लोक, कविता म्हणत सुटले. मी मनात म्हटले, अशा


वेळेस थोडे रागवावे लागते. मी दादांना म्हटले, "गप्प राहता की नाही? झोपायचं नाही का?" मी रागावलो आहे असे दाखविले. दादा गप्प राहिले. त्यांना मागून जरा झोप लागली. परंतु दुसरे दिवशी रात्री मी दादांना हसत म्हटले, "झोप नाही का येत?" तेही हसत म्हणाले, "येईल. तू नारसिंह रूप नको दाखवू." मी रागावलो, ते दादांच्या लक्षात राहिले. मला वाईट वाटले. पुढे मी कामासाठी महिना दोन महिने बाहेरगावी गेलो. दादा सोडून गेले तेव्हा मी जवळ नव्हतो. परंतु मी त्यांच्यावर आजारीपणात रागावलो याची आठवण आली म्हणजे अजून माझे डोळे भरून येतात. आजाऱ्यावर कधीही रागवू नये. कारण, एखादे वेळेस कायमचा वियोग व्हायची ती वेळ असते.

अरुणासाठी आंबे पाठवले होते. ती आंबा आंबा करते असे अप्पाने लिहिले होते. मला आंब्याची पारख नाही. गोड निघाले की नाही ते कळव. तुम्ही नवीन लोणचे घातले का? अप्पास व सौ. ताईस सप्रेम प्रणाम. अरुणास स. आशीर्वाद.

अण्णा

साधना १३ मे १९५०

* *



चि. प्रिय सुधास,
सप्रेम आशीर्वाद.

तुझे पत्र वेळेवर मिळाले. अरुणाचा ताप थांबला आहे असे वाचून किती बरे वाटले. यंदा दर वर्षापेक्षा उन्हाळा अधिक आहे. जिकडे तिकडे तापसरी आहे, खोकले आहेत. देशातील जनतेचे एकंदर जीवनमानच निःसत्त्व झाले आहे. जनतेत त्राण नाही. हिंदी जनतेला पौष्टिक आहारच मिळत नाही. जनता कोठवर टिकाव धरणार! आपल्या देशातील जनता केव्हा धष्टपुष्ट होईल, केव्हा मुलेबाळे गुबगुबीत दिसतील असे मनात येते. देशातील श्रमणारी जनता, तसेच मध्यमवर्गीय पांढरपेशे लोक यांची आज फार दुर्दशा आहे. गेल्या आठ पंधरा दिवसांत मी जेथे जेथे गेलो तेथे कोणी ना कोणी आजारी आहे. वाईट वाटे. आपण करणार तरी काय?

परंतु उन्हाळा आता लौकरच संपेल. वैशाख महिना संपून ज्येष्ठाला सुरुवात होईल. मे महिना अर्धा झाला. आणखी पाच-दहा दिवसांनी रोहिणी नक्षत्र लागेल आणि जूनच्या सात तारखेच्या सुमारास मृग लागतील. आकाश

काळेभोर दिसू लागेल. मेघमाला गोळा होतील. विजा चमकू लागतील. गडगडणे ऐकू येऊ लागेल. मुले अंगणात येऊन केव्हा अंगावर चार थेंब पडतील म्हणून आकाशाकडे बघत राहतील. अंगावरची घामोळी मावळतील, उन्हाळ्याने आलेला थकवा जाईल. तरतरी वाटेल, थोडे दिवस थांबा. येणार, सर्वांना नवजीवन देणारा पाऊस येणार!

सुधामाई, मी गेल्या आठवड्यात बेळगावकडे गेलो होतो. मित्र भेटले. आनंद झाला. बेळगावची हवा थंड. मध्येच पाऊसही पडतो. परंतु उन्हाळ्यात बेळगावात पाण्याचा तुटवडा. एवढे मोठे शहर, परंतु पाण्याची योजना नाही. मला ही गोष्ट माहीत नव्हती. विहिरी आटून गेल्या आहेत. रात्रभर बायका माणसे दुरून घागरी भरून आणीत असतात, मला वाईट वाटले. या म्युनिसिपालिट्या करतात तरी काय? तुम्हांला इतक्या वर्षांत पाण्याची व्यवस्था नाही करता आली? येथे एक डॉक्टर आहेत. त्यांनी आपल्या विहिरीला पंप लावून पाणी खेळवले आहे. घराबाहेर गुरांसाठी हौदात पाणी भरून ठेवतात. एक टांगेवाला म्हणाला, "डॉक्टरसाहेबांना आमचे घोडे, गायीगुरे किती दुवा देत असतील?" खरोखर भुकेलेल्यास अन्न व तहानलेल्यास पाणी देणे यासारखे पुण्य नाही. इतर सर्व गोष्टी राहोत; परंतु आधी पाणी तरी द्या.

आठवड्याच्या बाजाराला लोक येतात. ऊन मी म्हणत असते. परंतु त्यांना पाणी मिळण्याची सार्वजनिक सोय नसेल, तर त्या लोकांना किती त्रास होत असेल? लहानपणी मी एका गावी एक चाल पाहिली होती. गार पाण्याचे माठ त्या गावात दोनचार ठिकाणी बाहेर झाडाखाली भरून ठेवलेले असत. येणारे जाणारे पाणी पीत; दुवा देत. त्या सदिच्छेहून अधिक गोड दुसरे काय आहे?

आजकाल सहानुभूतीचे झरे का सुकले? आमची मानवता का कमी झाली? दुसऱ्याचा विचारच मनात येईनासा झाला आहे. सुधा, मला कधी कधी फार वाईट वाटते. सरकारची खाती पाहिली तर ती भ्रष्ट. स्थानिक स्वराज्ये पाहिली तर ती भ्रष्ट. जनतेतील दिलदारीही लोप पावत चाललेली.

या पेशाचे कसे व्हायचे ? सारी दानतच जर नष्ट झाली असेल तर हे राष्ट्र टिकणार कसे ?

नवीन पिढी तरी चारित्र्यसंपन्न होवो. मी परवा सेवा दलाच्या शिबिराला गेलो होतो, तेथे त्यांना हीच गोष्ट सांगितली. आज भारताला अन्नवस्त्राहूनही चारित्र्यसंपन्न माणसाची जरूरी आहे. प्राण गेला तरी खोटे बोलणार नाही, अनीतीने पैसे मिळवणार नाही, लाच मागणार नाही, दुसऱ्यास सतावणार नाही, अशा वृत्तीची निःस्पृह, निर्मळ, सेवापरायण माणसे राष्ट्राला हवी आहेत.

तू म्हणशील, अण्णा का आज नकाराचे पुराण सांगत राहणार? नाही बाळ, मी नास्तिक नाही. जगात सारे वाईट आहे असे नाही माझे म्हणणे. अग, साराच समाज सडलेला असेल तर तो नष्टच होईल. शरीरात प्राणमयताच नसेल, शुद्ध रक्तच नसेल तर शरीर गळेल. ज्या अर्थी आपला समाज चालला आहे त्या अर्थी विषारी द्रव्यांशी झुंजणाऱ्या अमृतमय वस्तूही समाजात असल्याच पाहिजेत हे निर्विवाद. आणि त्याचीही दर्शने होत असतात.

प्रेमाची शक्ती अपूर्व आहे. दोन दगड सिमिटाने, चुन्याने जोडले जातात. पूर्वी म्हणे चुन्यात गूळ घालीत असत. त्या चुन्याने इमारती भक्कम व्हायच्या. भिंती पडायच्या नाहीत. मानवी हृदये जोडायला प्रेमासारखी अपूर्व वस्तू नाही. आपल्याजवळ प्रेमाचा तुटवडा नसो. बाकी कशाचा तुटवडा पडला तरी हा नको. प्रेम असेल तर सर्व काही आहे. प्रेम नाही तर काही नाही. ईश्वराचे वर्णन आपण ज्ञानरूपी परमेश्वर असे केले आहे. परंतु नारदऋषींनी आपल्या भक्तिसूत्रात—

"स तु निरतिशयप्रेममय : ।"

ईश्वर हा प्रेमसागर आहे असे म्हटले आहे. सुधामाई, ईश्वर शब्दाचा अर्थ तुला माहीत आहे का ? ईश्वर म्हणजे सत्ता चालवणारा; परंतु कोणाची सत्ता जगात चालते ? तरवारींची, तोफा बंदुकांची ?– ती खरी सत्ता नव्हे. खरी सत्ता प्रेमाची आहे. प्रेमाने जसे जिंकून घेता येते तसे कशानेही नाही. म्हणून प्रेम हाच खरोखर परमेश्वर.

भारतात परस्परांवर प्रेम करणारी माणसे सर्वत्र दिसोत. जीवनातील हा ओलावा कधीही नष्ट न होवो. ते रमण महर्षी नुकतेच निजधामास गेले. तू वाचलेस ना? त्यांच्या आश्रमात ठेवण्यासाठी कोणी तरी दोरीने बांधून एक हरिण आणले. रमण महर्षी म्हणाले, "त्याला बांधलंत कशाला? सोडा ती दोरी." तो भक्त म्हणाला, "ते पळून जाईल." ते म्हणाले, "तुला नको काळजी." भक्ताने दोरी सोडली. रमण महर्षींनी त्या हरिणाच्या पाठीवरून हात फिरविला व ते म्हणाले, "बेटा, इथं राहा बरं." आणि काय आश्चर्य! ते हरिण तेथे बसले. तेथेच हिंडू फिरू लागले. कधी तेथून गेले नाही. त्यांच्या हातात कोठून ही शक्ती आली? ती का प्रेमाची शक्ती होती? त्यांचा आत्मा त्या हरिणीच्या आत्म्याजवळ का बोलला? पशूपक्षीही प्रेमाची शक्ती ओळखतात. प्रेमाने वश होतात, माणसे नाही का होणार?

माझ्या मनात अलीकडे असे विचार येत असतात. सेवामय वृत्तीने भारतात प्रेमस्नेहाचा पाऊस पाडणारे हजारो मेघ हवे आहेत. आठ दहा गावांच्यामध्ये असा एकेक सेवेकरी असावा. पायांचा पारवा बनून त्या पंचक्रोशीत त्याने हिंडत राहावे. औषधे द्यावीत, स्वच्छता करावी, रात्री नवविचार द्यावेत, अडी-अडचणी दूर करण्याची खटपट करावी, मुलांत मिसळावे, त्यांच्याबरोबर खेळावे, त्यांना गाणी शिकवावी, गावात चार फुले फुलवा सांगावे. असे तरुण लोक हवे आहेत. आशेने, उत्साहाने, प्रेमाने, सेवाभावाने उचंबळणारे तरुण. असे तरुण मिळतील तर ओसाड व भकास भासणारा भारतीय संसार हिरवागार होईल.

सुधा, तू पुढे घेशील अशा जीवनाला वाहून? तुझ्या वडिलांची इच्छा होती की, वसंताने दवाखाना घालावा, खेड्यापाड्यांची सेवा करावी. तो तर देवाघरी गेला. दादांची इच्छा तू करशील पुरी? शीक, डॉक्टरी ज्ञान मिळव आणि कोकणात जा. गरीब आयाबायांची सेवा कर. नदी ज्याप्रमाणे ओलावा देत वाहात राहते त्याप्रमाणे तुझी जीवनसरिता सर्वांच्या जीवनाला ओलावा देत राहो. तुझ्या मनात असे विचार येवोत. भारतात जगातून मिशनरी बायका येतात, सेवा करतात. भारतातून अशा सेवापरायण भगिनी का न पुढे याव्यात? साऱ्या जगात सेवावृत्तीत भारत का मागे राहणार?

सुं. प. ३–७

परवा मला ल्हानपणचा एक मित्र भेटला. किती वर्षांनी! आम्ही भेटलो! सारे बाळपण आठवले. खोड्या आठवल्या. मी त्याला पिकलेले आंबे देत असे. तो मुद्दाम माझा पत्ता काढीत आला नि मला बघताच त्याने मला मिठी मारली. मी त्याला म्हटले, जेवायला राहा. आज माझ्या हातची तुला मेजवानी. आणि मी स्वयंपाक केला. तो गोष्टी बोलत बसला. आम्ही दोघे जेवलो. जेवताना गोष्टी निघत नि बोलण्यात जेवण तसेच राही. जेवणे संपली. मी आवराआवर करीत होतो. तो बाहेरच्या खोलीत उभा होता. दारात उभा होता. मी जो काम आटोपून आलो तो त्याच्या डोळ्यांतून मुके अश्रू वाहात होते.

“ काय रे, काय झालं ? ” मी विचारले.

“ किती वर्षांनी आपण भेटलो. पुन्हा कधी भेटू ! आपण दोघे पुन्हा ल्हान झालो तर ! ”

“ तू वेडा आहेस. अरे, आपण एकमेकांच्या जवळच आहोत. मी तुला खरं सांगू. मी तरी प्रेमाच्या घरात राहात असतो. तुला ती इंग्रजी कविता माहीत आहे ? मलाही सारी आठवत नाही. परंतु ‘ I live in friendship’s home ’ मैत्रीच्या घरात मी राहतो अशा अर्थाचे ते चरण आहेत. मी कधी एकटा बसलो म्हणजे ज्यांनी ज्यांनी माझ्या जीवनाला प्रेमाचा ओलावा दिला त्यांना स्मरतो, त्यांची मनोमय भेट घेतो, प्रभू त्यांना सुखी ठेवो अशी प्रार्थना करतो. उगी, रडू नकोस. ”

“ अशीच माझी आठवण ठेवा. कोणी तरी प्रेमानं आपली आठवण करतो या विचारात केवढं समाधान आहे ? ” तो सकंप आवाजात म्हणाला.

माझा मित्र गेला. परंतु प्रेमाचा परिमल पुन्हा दरवळून गेला. मोकळे निरपेक्ष प्रेम. प्रेम निर्भय असते. मुक्त असते, गुलामगिरीत प्रेम कोठले ? निरनिराळ्या राजसत्ता दंडुक्याने, कायद्याने प्रेम मिळवू पाहतात. अशाने का प्रेम मिळते ? दंडुका प्रेम नसतो निर्मित. दंडुका हे दास्याचे चिन्ह आहे. इंग्रजी ‘ फ्री ’, ‘ फ्रेंडशिप ’ वगैरे शब्द आणि संस्कृतमधील ‘ प्री ’ म्हणजे प्रसन्न करणे, प्रीती, प्रेम इत्यादी एकाच धातूपासून निघालेले. जेथे ‘ प्री ’

म्हणजे प्रेमभावना आहे, तेथे ‘फ्री’ म्हणजे मोकळेपणाही हवा. ‘फ्रीडम्’चे म्हणजे स्वातंत्र्याचे उपासक फ्रीडम्‌चा हा अर्थ विसरतात.

भारतात असे मोकळे प्रेम वाढो आणि जीवन सुखकर होवो.

मी तुला पत्र लिहीत आहे. दुपारचे दोन वाजले आहेत. ऊन मी म्हणत आहे. ती बघ बाहेर एक बादली आहे. तिच्यात थोडे पाणी आहे. तो बघ एक कावळा कोठून तरी आला. चोच वासून आला. तहानलेला आहे बिचारा. बादलीवर बसून वाकून पाणी पिणार तोच कोणी तरी त्याला खडा मारला. गेला बिचारा उडून. मला वाईट वाटले; परंतु दूर एके ठिकाणी पाणी सांडलेले होते. तेथे तो पुन्हा आला व चोचीने त्या मातीतील पाणी पिऊन गेला उडून. सुधामाई, मला कावळा फार आवडतो. कावळयाने पाण्याच्या मडक्यात खडे टाकून पाणी कसे वर आणले ही त्याच्या शहाणपणाची गोष्ट तू वाचली असशील. कावळा काव काव करू लागला म्हणजे आपण म्हणतो, “पाहुणा येणार असेल तर गप्प राहा.” अग, रस्त्यात आपण थुंकतो, नाक शिंकरतो. कावळे ती घाण खातात व स्वच्छता निर्मितात. तो वाकुल्या कशा दाखवतो! चोच कशी घासून पुसून स्वच्छ करतो! मला कावळ्याचे फार कौतुक वाटते. चिमणी, कावळा, हे जणू आपले राष्ट्रीय पक्षी आहेत!

तुम्ही आंबे विकत घेऊन आढी लावली आहे का? माझ्या ल्हानपणी घरी किती आढ्या लावलेल्या असायच्या! टोपल्यांतून, हाऱ्यांतून आढ्या लावलेल्या. शेवटी जमिनीवरही गवत आंथरून आंबे पिकत टाकायचे. किती आंबे असत! तुला आपले विष्णूबाबा माहीत आहेत ना? आई त्यांची गोष्ट सांगायची. ते शरीराने धिप्पाड, दगड पचवणारे. एकदा वाटते ल्हानपणी रुसले आणि रागावून आंब्याच्या खोलीत जाऊन बसले. त्यांनी आतून कडी लावून घेतली आणि मग तेथील पिकलेल्या आंब्यांवर त्यांनी राग काढला. पन्नास आंबे खाऊन गडी बाहेर आला.

“गेला का राग?” कोणी विचारले.

“त्या पन्नास कोया बघा. अजून का राग राहील?” ते म्हणाले.

अशी ही जुनी माणसे. आजोबा गोष्ट सांगायचे. ते एकदा रत्नागिरीस कोर्टाच्या कामासाठी जात होते. हर्णै बंदरात होते. बोटीवर चढायचे होते. खानावळीत ते व आपल्या गावचे सावळारामदादासह दोघे जेवायला गेले. खानावळीत तिखट भाजी, भातही कडत व जरा कच्चा. बोट यायची पुन्हा वेळ होत आलेली.

" अरे नाना, जेव. " सावळारामदादा म्हणाले.

" काय जेवू ? डोळयातून पाणी येत आहे. भात कडत नि कच्चा. बोट येईल. " नाना म्हणाले.

" अरे, उद्याच्या बोटीनं जाऊ. आधी पोटभर जेवून तर घेऊ. आजीबाई, आमटी वाढा. "

त्या सावळारामदादांनी आजीबाईचा कच्चा भात, तिखट आमटी, सारे संपविले व म्हणाले, " वाढा, असेल ते वाढा. "

आजीबाई म्हणाली, " सारे संपले. का दिवाळे काढतोस माझे ? "

" आमच्या डोळयांतून पाणी आणायला तुम्हांला नाही ना काही वाटत ! तुम्ही पोटभर जेवण वाढलं नाही म्हणून निम्मे पैसे देतो. " ते म्हणाले.

परंतु शेवटी त्या म्हातारबायला चिडवून सारे पैसे देऊन म्हणाले : " जे येतात जेवायला, त्यांना जरा वेळेवर नीट वाढीत जा; त्यांचे शिव्याशाप नका घेऊ. "

सुधा, तू बसल्या बैठकीला १० आंबे तरी खाशील ? तुझा अण्णा अजून सहज २५ आंबे खाईल; परंतु आज काल न खाण्यात संस्कृती येऊन राहिली आहे. मी कोठल्या तरी शाळेत गेलो होतो. तेथे माझी घडबड म्हणजे भाषण झाले. नंतर एका खोलीत फराळाचे ठेवण्यात आले होते. तेथे मला नेण्यात आले. चालक, शिक्षक सारे होते. परंतु कोणी मोकळेपणाने खाईना. मला राग आला. मी चिवडा, केळी खाल्ली.

" घ्या आणखी. " मला कोणी म्हणाले.

" मी तर घेतच आहे. परंतु मी एकटाच खात आहे. तुम्ही कदाचित मला रानटी म्हणाल, म्हणून मी पुरे करतो; परंतु हे सारं जर तुम्ही गंमतीनं

सर्वांनी हंसत खेळत खावं म्हणून माडलं असेल, तर तुम्ही खात का नाही? ही कृत्रिमता, हा वरपांगीपणा, हा दंभ, म्हणजे का संस्कृती? संस्कृती म्हणजे मोकळेपणा."

त्या लोकांना नमस्कार करून मी गेलो. मागून काय म्हणाले असतील हरि जाणे. मला या कृत्रिमतेची जितकी चीड आहे, तितकी कशाची नाही. सुधा, तू कृत्रिमाची उपासक नको होऊ, बरे का? मोकळेपणाने खा, प्या, हंसा, खेळा.

दोन चार दिवसांपूर्वीची गोष्ट. एका मित्राकडे जेवायला गेलो होतो. तेथे चर्चा चालल्या. जेवायला अजून अवकाश होता. आलेल्या मित्रांत निरनिराळ्या प्रकारचे लोक होते. एक-दोन श्रमजीवी कामगारही होते. वर्तमानपत्रे पडली होती. नुकतेच साहित्यसंमेलन संपले होते. कवी यशवंतांचे भाषण कसे होते वगैरे गोष्टी निघाल्या. माझे जे श्रमजीवी बंधू होते, ते जवळच उदासीनपणे बसले होते. त्यांना त्या निर्जीव बौद्धिक चर्चांत काही रस नव्हता. ते तेथे आहेत हे बाकीच्यांच्या जणू ध्यानातही नाही आले. मी त्या दोघांना म्हटले :

" ती दिल्लीला येणारी बिलं फार वाईट आहेत, नाही?"

" होय. अगदी वाईट. सत्याग्रह करायला हवा. जगात कुठं असे कायदे नसतील." ते म्हणाले.

" आणि तुझा रेल्वेतला भाऊ काढून टाकला होता, तो पुन्हा लागला का?"

" नाही दादा."

गप्प बसणारे ते कामगारबंधू बोलू लागले. इतरही मग त्यांच्या बोलण्यात रस घेऊ लागले. आपण चार जण बसलो असताना आपले सर्वांकडे लक्ष हवे. त्या कामगारांना नाही तर वाटले असते, " यांच्या मोठ्या चर्चा चालल्या आहेत. आपणास त्यांत काही कळत नाही. आपण येथे खाली मान घालून मुके बसण्यापलीकडे काय करायचं?" त्यांना खट्टू वाटले असते. मनुष्याने

सर्वांच्या हृदयात सहानुभूतीने शिरले पाहिजे. सर्वांचा विचार करणे म्हणजेच लोकशाही. परंतु आपण आपल्याच संकुचित जगात असतो. आपल्याच ठरीव विचारसृष्टीत असतो. मुद्दाम नसले तरी नेणतेपणे दुसऱ्याचे मन दुखविले जाते, दुसऱ्याचा स्वाभिमान दुखविला जातो. सुधा, या जगात नीट वागणे थोर कला आहे. उदार व सहृदय मनाशिवाय ही कला साधणार नाही.

तुला लोकर हवी आहे ती लौकरच पाठवीन. अरुणाला चेंडूही पाठवतो कोणी भेटला म्हणजे. सारी सुखी असा. अप्पा व सौ. ताईस स. प्र. चि. अरुणास सप्रेम आशीर्वाद.


अण्णा

ता. क.

तुझ्या मोगऱ्याला कळ्या आल्या का? अग, येथे शेजारच्या बागेत अगदी सुकलेला मोगरा, परंतु पाणी मिळू लागताच लगेच पाने फुटून कळे आले. खरोखर जीवन किती धडपडणारे असते, आशेने कसे वाट पाहात असते नाही?

साधना, २० मे १९५०

★ ★



चि. प्रिय सुधास,

सप्रेम आशीर्वाद.

तुझे सुंदर सहृदय पत्र वाचून किती आनंद झाला सांगू ! कधी कधी खरेच तुझी पत्रे छान असतात. तुझी ही सहृदय वृत्ती कधी नष्ट न होवो. तुम्ही तेथे कच्चे आंबे विकत घेऊन आढी लावली आहे हे वाचून बरे वाटले. अरुणा येता जाता आंबा पिकला का बघते व 'अप्पा, पिकला, आंबा पिकला' करीत नाचते व 'ताई, आंबा खाऊ, गोड आहे, पडसं नाही व्हायचं, खातेच आता' वगैरे कसे बोलते ते तू लिहिलेस. लहान मुलांची खरेच गंमत असते.

आकाशात अभ्रे येतात. केव्हा तरी खऱ्या पावसाआधी धडकवणी पडल्याशिवाय राहणार नाही. लोक आता उन्हाळ्याला कंटाळले आहेत. हवेत केव्हा एकदा गारवा येईल असे सर्वांना झाले आहे. तुमच्या तेथे का थोडा पाऊस पडला? पुण्याकडे तर मध्ये चांगला गारांचा पाऊस पडला. तू गारा पाहिल्या आहेस ? मी खानदेशात केवढाल्या गारा पाहिल्या होत्या ! आणि तुला गंमत सांगू का ? मी त्या वेळी अमळनेरच्या छात्रालयात

राहात असे. पारोळ्याकडचा रत्नापिंप्रीचा का धुळपिंप्रीचा पुन्या म्हणून एक मुलगा छात्रालयात होता. त्याचे नाव मोरेश्वर होते. परंतु पुनवेला झालेला म्हणून लाडके नाव होते पुन्या. त्याचा धाकटा भाऊ होता त्याला मुन्या म्हणत. तो फार बोलत नसे. गोड हसायचा. जणू मुनिमहाराज. म्हणून मुले त्याला मुन्या म्हणत. एकदा या दोन मुलांचे वडील अकस्मात आले.

"मुलांसाठी गारा घेऊन आलो आहे. आमच्या गावी पडल्या. येताना जरा विरघळल्या तरी अजून बघा केवढाल्या आहेत!" प्रेमळ पिता म्हणाला. मुलांसाठी खाऊ आणणारे, लाडू आणणारे आईबाप असतील; परंतु सोळा मैलांवरून गारा घेऊन येणारे प्रेमळ वडील पाहून मी त्यांना मनात प्रणाम केला.

आपल्या पालगड गावी लहानपणी एकदा गारांची वृष्टी झालेली माझ्या ध्यानात आहे. अग विष्णु बिवलकरांची का कोणाची गाडी कापातून येत होती. वाटेत सापडली गारांच्या तडाख्यात. ताडताड गारा येऊन दगडा-सारख्या अंगावर पडत होत्या. परंतु वडाच्या झाडाखाली जरा आधार मिळाला म्हणून ते बैल व विष्णु बिवलकर निभावले.

मोरू ओक, विष्णु बिवलकर, सखाराम दिवेकर वगैरेंच्या बैलगाड्या छान असायच्या. ते गाडीभाडे करायचे. उपजीविकेचा तो धंदा. ते बैलांची किती निगा राखायचे. आणि बैलांच्या गळ्यात साखळ्या व घंटा असायच्या. कपाळावर गोंडे, अंगावर झुली, गाडी पावंड्यावर जायची. तीन तासांत गाडी कापात जायची. गाडीचा धंदा, परंतु तो जणू त्यांचा स्वधर्म होता. तुझे पणजोबा नेहमी विष्णु बिवलकरांच्या गाडीतून जायचे.

एकदा आम्ही आजोबांनी पहाटे मुहूर्त पाहिला होता, म्हणून पहाटे निघालो. मला वाटते मोरू ओकाची गाडी होती. बैल ताजेतवाने. खेरांच्या उतरणीतून पळत पुढच्या चढावावर बैल आले आणि ते रस्त्याच्या बाजूला गेले! केवढी धोंड तेथे होती! ती अजून तेथे आहे. त्याच्यावर गाडी आदळली. जू मोडले! आम्ही सारे वाचलो. बैल निभावले. परंतु आता दुसरी गाडी कुठली? मोरू म्हणाला, "मी विष्णूची गाडी आणून देतो." आणि तो गेला नि ती

गाडी घेऊन आला. निघाले बैल पाखरांसारखे. अक्का, मावशी गाडीत होत्या. वाटेत जांभळीची झाडे जांभळांनी ओथंबलेली. आम्ही गाडीतून उतरलो व जांभळे खात निघालो. एक होलपाटा वर मारला की, जांभळांची पखरण खाली पडे. आमच्या जिभा जांभळे खाऊन निळ्या झाल्या. मी वाटेत करंजणीच्या गोड विहिरीचे पाणी पिणार होतो. अक्का म्हणाली, " जांभळं, करवंदं यांच्यावर पाणी पिऊ नये. मोडशी होते. " मोरू म्हणाला, " मागं एक वाटसरू याच रस्त्यानं जात होता. पाणरलेली, पावसानं भिजलेली जांभळं त्यानं खाल्ली. वर आणखी पाणी प्यायला की काय हरी जाणे. परंतु रस्त्यातच जुलाब उलट्या होऊन तो मरून पडला. "

सुधामाई, तुम्ही जांभळे खाल्लीत तर वर पाणी नका हो पिऊ. अरुणालाही सपा. तुमच्या तिकडे जांभळे आहेत का ? पुण्याच्या मंडईत जांभळे येतात विकायला. कशी रसाळ असतात. कोकणातील जांभळांच्या अंगावर फारसा गर नसतो. परंतु पुण्याकडील ती जाभळे चांगली गरदार, दळदार असतात. आपल्या भागीरथीकाकूच्या परसवात जांभळी, कोकंबी, अळविणी, आवळी-- सर्व प्रकारची झाडे होती. लहानपणी ' आमची ' मौज होती.

परवा लक्ष्मीकडे गेलो होतो. ती इंटर सायन्सची परीक्षा पास झाली. पेढे मिळाले. ती म्हणाली, " तुम्हांला सांगण्यासाठी म्हणून दोनदा तुमच्याकडे आले तर तुमच्या खोलीला कुलूप. "—आपला आनंद आपल्या मनात नसतो. दुःखाला वाटेकरी हवा असतो तसा सुखालाही. माझा एक विद्यार्थी मित्र होता. तो परीक्षेत पहिला आला होता. तो छात्रालयात राहात असे. त्याचे अभिनंदन करायला मी त्याच्या खोलीत गेलो तर तो रडत होता.

" नरहर, काय झालं ? रडतोस का ? तू तर पहिला आलास. हसायच्या वेळेस तुला रडू का येतं बाळ ? " त्याला अश्रू आवरत ना. मी पुन्हा पुन्हा विचारले. तेव्हा तो म्हणाला, " अण्णा, मी पहिला आलो; परंतु हे कोणाला कळवू ? " नरहरचे वडील नव्हते. आपण पहिले आलो, याचे कौतुक करायला कोणी नाही म्हणून त्याचे डोळे भरून येत होते. मनुष्याचा आनंद दुसऱ्याशी एकरूप होण्यात आहे. आपल्या भावनांशी समरस होणारा कोणी नसेल तर जीवनात आनंद नसतो.

परंतु मनुष्य आपले वर्तुळ लहान ठेवतो. ठराविक दोनचार माणसे एवढेच जणू त्याचे जग असते. जर सारे जग तो आपले मानील, तर त्याच्या आनंदाला तोटा राहणार नाही. रशियाच्या सर्वसत्ताधारी स्टॅलिनची गोष्ट तुला माहित आहे ? त्याची पत्नी मरण पावली. या कठोर पुरुषाचे तिच्यावर प्रेम होते. तिने त्याला सहृदय बनविले होते. तिच्या सर्वस्वार्पण वृत्तीमुळे त्याच्या भावना पुसून टाकलेल्या जीवनातही थोडा ओलावा आला होता. परंतु ती मेल्यावर, तिची शवपेटिका भूमातेच्या पोटात ठेवल्यावर स्टॅलिन म्हणाला, " माझ्या हृदयातून सारी दया, करुणा, प्रेम ही आजपासून नाहीशी झाली. हे हृदय आता दगडाचं झालं आहे. " मी ते वाक्य त्याच्या चरित्रात वाचले आणि स्टॅलिनच्या जीवनावर प्रकाश पडल्याप्रमाणे मला वाटले. औरंगजेब बादशहाचेही असेच नव्हते का ? साऱ्या जगाशी कठोर होणारा औरंगजेब आपल्या मुलीसमोर नांगी टाकी.

मनुष्य आपणाला कधीच संपूर्ण कळत नसतो. माणसाच्या स्वभावाचे थोडे दर्शन याला होते, थोडे त्याला होते, आणि तेवढ्यावरून हा मनुष्य भला की बुरा असा निर्णय देऊन आपण मोकळे होतो. परंतु ती केवढी चूक असते, नाही ?

काल मला पालगडच्या बेलवाडीतील एक मनुष्य भेटला. आम्ही दोघे बोलत बसलो. किती आठवणी निघाल्या ? बेलवाडीतच माझ्या लहानपणी नारायणराव जाधव यांच्या अंगात देव यायचा. ते केवढ्याने " फो फो " करायचे. सारा गाव दणाणायचा, आणि जे कोणी येतील त्यांच्या अंगावर तांदूळ फेकायचे. कोणाला साप चावलेला, कोणाच्या अंगावर कोळयाचा वगैरे विखार उठलेला, अशी माणसे तेथे जमायची. त्या तांदुळांनी म्हणे गुण यायचा. नारायणरावांच्या अंगात काही वर्षे देव येत असे. पुढे येईनासा झाला. आम्ही लहानपणी बेलवाडीतून जाताना भीत असू. घळीतून जायचे. किती किर्र झाडी नि रान. परंतु या बेलवाडीतच अंगात देव येणारे नारायणराव राहतात या विचाराने आमची भीती कमी होत असे.

त्या गावकऱ्यांजवळ बोलताना साऱ्या गावची उजळणी होत होती. कोण आहेत, कोण मेले सारे विचारीत होतो. आमच्या बोलण्यात गंगुअप्पांच्या

ओटीवर बसून नेहमी जानव्यासाठी सूत काढणारे विनुभाऊ महाळुंकर आले होते. समोरच आमची शाळा असे. पाणी प्यायला आम्ही ओकांकडे जायचे. तेथे पाण्याचे तपेले आम्हा मुलांसाठी भरलेले असे. आम्ही भांडू लागलो तर विनुभाऊ तिकडून दरडावायचे. त्यांची चाती सारखी सुरू असे. जानवी करणे व पत्रावळी लावणे हा त्यांचा धंदा. सूत काढून थकले की पत्रावळी लावायचे, पत्रावळी लावून थकले की सूत कातायचे. त्यांचा हात कधी रिकामा नसे. तीन फाशांनी खेळण्यातही ते पटाईत होते. त्यांचा मुलगा अंधळा होता. परंतु हा अंधळा साऱ्या गावभर हिंडे, शेतावर जाई. आवाजावरून गुरे ओळखी. हा अंधळा मुलगा म्हाताऱ्या विनुभाऊंचा आधार होता. रात्रीबेरात्री काठी ठोकीत तो यायचा, जायचा. अंधळ्याला दिवस काय, रात्र काय? म्हणेल तेव्हा त्याचा दिवस, म्हणेल तेव्हा त्याची रात्र. खरेच तो अंधळा माझ्या डोळ्यांसमोर येतो. किती काम करायचा तो! आणि मोन्या पटवर्धन आठवतो का! तो मुका आणि बहिरा. परंतु त्याच्या बोटांत कला होती. गणपतीच्या मूर्ती किती सुंदर बनवायचा! मोन्या हरकामी होता. सुंदर दोर वळायचा, खाटा विणून द्यायचा. मला वाटते, एखादे इंद्रिय गेले तर तिकडची शक्ती दुसऱ्या इंद्रियात येते. आंधळ्याचे स्पर्शज्ञान तीव्र असते. मुके, बहिरे यांच्याजवळही दुसरी कोठली तरी शक्ती असते, आणि मोन्या पटवर्धनावरून मोहन्या मारवाड्याची आठवण आली. तुझ्या दादांचा तो वर्गमित्र. मोहन्याची सावत्र आई होती. तिचे नाव रामप्यारी. तिला ल्हान मुलगा होता. त्याचे नाव बद्री. रामप्यारीला भुताने पछाडले. तिची दातखिळी बसली. पुढे ती मेली. ल्हान बद्री मातृहीन झाला आणि हा मोहन्या या सावत्र भावाला मारायचा,– करंदीकरांच्या घोडविहिरीत त्याला न्यायचा व तेथे त्याला मारायचा. त्याचे रडणे ऐकू जाऊ नये म्हणून. ल्हान बद्रीचा केविलवाणा चेहरा अजून माझ्या डोळ्यांसमोर येतो. आईवेगळा ल्हान मुलगा!

मनुष्याची दुष्टता, कठोरता पाहून कधी कधी वैताग येतो. तो वर्डस्वर्थ कवी एके ठिकाणी म्हणतो:

“What man has made of man —माणसानं माणसाची काय दशा केली आहे पाहा!” माणसाला मन आहे, बुद्धी आहे, हृदय आहे.

शेक्सपीयर कवी उचंबळून म्हणतो, " मनुष्य,– ईश्वराची किती ही थोर निर्मिती ! कसा याचा देह, कसं याचं मन, कशी आहे याची बुद्धी ! " परंतु सृष्टीतील ही अलौकिक निर्मिती शापरूप ठरवावी ना ! कधी सुधारणार हा मानव ? अमेरिकन कवी व्हिट्मन म्हणायचा, " पशुपक्षी बरे. नको हा शापरूप मानव ! "

परंतु मनुष्य कधी सुधारणार असा प्रश्न न करता, मी कधी सुधारणार ? असा करायला हवा. आपापले जीवन तरी चांगले करणे हे बरेचसे आपल्या स्वाधीन आहे. आपल्याकडून तरी जगाच्या दुःखात भर न पडो, असे प्रत्येकाने मनात ठरवून वागावे, नाही का सुधा ?.

तुझा हल्ली वेळ कसा जातो ? तुझे कुंचले नि रंग घेऊन चित्रे काढतेस का ? सकाळी त्या सुरूच्या बनात बसून समोरचा देखावा कधी रंगवलास का ? चित्र काढू लागलीस म्हणजे अरुणाही ब्रश घेऊन नाचू लागेल. तीही कागद घेईल व म्हणेल, " हे फूल झालं, हो ना सुधा ? " अरुणा दुपारी झोपली की तू जा चित्र काढायला ! एखादे सुंदर चित्र काढून मला पाठव. मागे तू एक पाठवले होतेस.

मावशी मुंबईला गेली आहे. तिचे पत्र आले होते. म्हणते, ' मुंबईच्या रस्त्यानं गुलमोहोर नावाची लाललाल फुलांची झाडं किती छान दिसतात. तशीच पिवळ्या फुलांची झाडं व मोतिया रंगाच्या फुलांचे वेलच्या वेल जणू अंगावर खेळवणारी झाडं ! ' मौज. मावशीला नाही तरी फुलांचे फार वेड. कोकणात बकुळींना भर आहे. परंतु पांढरे चाफे आता उलगले. त्यांचा भर ओसरला. हिरवीगार पाने आता त्यांना फुटली आहेत आणि या हिरव्या पानांच्यामध्ये मधूनच थोडी फुले दिसतात. जेव्हा भर असतो तेव्हा एक पान दिसत नाही. जणू फुले म्हणजेच पाने. सुधा, जर्मनीचा महाकवी गटे याने म्हटले आहे, " फूल म्हणजे काय ? फूल म्हणजे परिपूर्ण विकास झालेलं पान. " सुंदर व्याख्या !

तुला मी पत्र लिहीत आहे आणि या बघ लाखो मुंग्या ! भिंतीच्या कोपऱ्यातून एकदम आल्या. कवठाच्या मुंग्या ! प्रत्येकीच्या तोंडात पांढरे काय

आहे ते? ती का त्यांची अंडी आहेत? पावसाळा आल्याची ही खूण मानतात. मुंग्यांचे काम या वेळेस फारच जोराने सुरू होते. पावसाळ्यात त्यांना बाहेर पडता येणार नाही. सारी तरतूद त्यांना करून ठेवावी लागते. किती मुंग्या! या चावऱ्या नाहीत. भुळभुळ्या मुंग्या आहेत. सर्वत्र काळेभोर झाले आहे. उठू दे मला. पुरे हे पत्र. धांदल झाली तुझ्या अण्णाची. अप्पा नि ताईस घाईघाईत सप्रेम प्रणाम. चि. प्रिय अरुणास घाईतला पापा. पळतो आता.

अण्णा

ता. क.

अग सुधा, मुंग्यांना घाबरलो परंतु पाच मिनिटांनी आलो तो एकही नाही. क्षणात आल्या, क्षणात गेल्या!

साधना २७ मे १९५०

★ ★



चि. प्रिय सुधास,
सप्रेम आशीर्वाद.

तुझे या वेळेस सुंदर पत्र आले नाही. तुझी पत्रे चांगली असतात, असे मागच्या वेळेस लिहिले म्हणून ऐटलीस वाटते? का पावसाळा येणार म्हणून कामात आहात? सकाळी वाळवणं वाळत घालायची, गुरांनी खाऊ नये म्हणून राखण करायची, संध्याकाळी ती सारी भरायची. उन्हाळ्यात हे काम असते. गुळाची ढेप घेता आली तर घेऊन ठेवायची. ती फोडून तो गूळ भरून ठेवायचा. हवा लागू नये, गूळ पातळ होऊ नये म्हणून घट्ट झाकणे लावायची. कोकणात आमच्या लहानपणी आम्ही शेगडी वगैरे गुळाच्या हंड्यावर झाकण ठेवून मातीने लिंपून टाकीत असू. ज्या दिवशी ढेप फोडायची, गूळ भरून ठेवायचा, त्या दिवशी गूळ खायची मजा आणि त्या दिवशी आंब्याचे पन्हे करायचे. गंमत. तुझ्या तेथे गूळ भरून ठेवायचे असे प्रकार नसतील. परंतु लाकडे साठवून ठेवायची, शेण्या साठवून ठेवायच्या ही कामे असतील. तेव्हा या कामात रमलीस की काय? अळी वगैरे भाजून उद्या पेरण्यासाठी तयार केलीत का? यंदा

भुईमूग, चवळी वगैरे पेरणार का? गवार, भेंडे पेरणार का? बी वगैरे बघून ठेवा.

काही काही ठिकाणी पाऊस सुरू झाला असे वाचले. खरा पाऊस सुरू झाला की हा तात्पुरता ते कळत नाही. परंतु थोडा पडला तरी विहिरींना थोडे पाणी येते. थोडी हायहाय कमी होते. हा पाऊस तात्पुरता असला तरी खरा पाऊसही काही आता लांब नाही.

मी अकस्मात धारवाडला जाऊन आलो. कधी गेलो नव्हतो. तेथे प्रिय मित्र भास्करराव यांच्याकडे गेलो होतो. त्यांच्या घरचे वातावरण किती प्रेमळ! आणि सारी मुले आनंदी, मोकळी. आपापले कपडे धुतात. तो ल्हान सुहास तोही आंघोळ करून आपली चड्डी आपटून धुवीत होता. विहिरीवरून पाणी आणायला सारी मदत करीत होती. जेवताना मजा. सुहास म्हणाला, ‘आई, माझ्या आंब्याचा रस तूच काढून दे.’ आई म्हणजे केवढी थोर देणगी! ल्हान मुलाला सारे आईजवळ मागण्यात, तिच्याजवळून घेण्यात आनंद असतो. तेथे त्याचा हक्क, तेथे त्याचे सारे स्वातंत्र्य!

आम्ही बोलत होतो. मी म्हटले, ‘हुबळी’ शब्दाचा अर्थ काय? तर मित्र म्हणाले: कानडीत ‘हू’ म्हणजे फूल व बळ्ळी म्हणजे वेल. ‘फुलवेल’ हा या शब्दाचा अर्थ. कन्नड भाषेत ‘हुब्बळी’ असे म्हणतात. नावांचे अर्थ कळले म्हणजे किती आनन्द होतो. अग उटकमंड भूगोलात आपण वाचतो. नीलगिरीतील हवा खाण्याचे हे ठिकाण! परंतु ‘उटकमंड’ हा साहेबाने केलेला अपभ्रंश. ‘उदकमंडल’ असे मूळचे सुंदर संस्कृत नाव. नीलगिरी-भोवती सर्वत्र सुंदर पाण्याची सरोवरे आहेत. विशेषतः उदकमंडल भागात अशी असतील. आणि कूर्गची राजधानी ‘मर्कारा’ म्हणून आपण वाचतो ना? त्याचा मूळ शब्द ‘मडिकेरी’ असा आहे. मडि म्हणजे सोवळे व केरी म्हणजे तळे. सोवळे तळे असा अर्थ होतो. सोवळे म्हणजे का निर्मळ, पवित्र. तेथेही स्वच्छ पाण्याची तळी असतील. मी तिकडच्या स्वच्छ पाण्याच्या गोष्टी ऐकल्या आहेत. पोहण्यासाठी बुड्या मारणारा मनुष्य किती तरी खोल गेला तरी दिसतो! स्वच्छ पाणी!

मला धारवाडला किती तरी गोष्टी कळल्या. कन्नड वाङ्मयातील महान नावे कळली. अनेकांचे इतिहास कळले. परंतु या पत्रात थोडक्यात सारे कसे सांगू? कानडी–मराठीवादाच्या आपण गोष्टी ऐकतो. उगीच नाही विरोध वाढत. येथील वृद्ध लोक म्हणाले, "आम्ही पुण्यास शिकायला असताना आमची थट्टा व्हायची. कानडीअप्पा म्हणून टिंगल व्हायची. कानडीत कविता आहेत का हो, म्हणून विचारायचे. एका प्राध्यापकानं आमच्या देशाला अनार्य देश म्हटलं. आम्ही मुले रागावलो." अनार्य शब्द गीतेत 'असंस्कृत, रानटी' या अर्थी आहे. त्या प्राध्यापकांना द्राविडी देश असे का म्हणायचे होते! एक मित्र म्हणाले, "धारवाडला पहिलं वर्तमानपत्र सुरू झालं तेही मराठीत. शिक्षणाधिकारी यायचे ते सारे महाराष्ट्रीय. ते इथं खुद्द धारवाडमध्ये मराठीला उत्तेजन द्यायचे. पुढं व्ही. बी. जोशी म्हणून एक शिक्षणाधिकारी आले. त्यांना हा अन्याय वाटला. त्यांनी गाडं बदललं. आजूबाजूला संस्थानं होती; त्यांचे राजे महाराष्ट्रीय. प्रजेची भाषा कन्नड तरी त्यांची राजभाषा मराठी!" अनेक गोष्टी मी ऐकत होतो. धारवाडला सरकारने एखादे कॉलेज काढावे म्हणून लोकांनी मागणी केली. सरकार म्हणाले, "तुम्ही दोन लक्ष रुपये द्या. मग कॉलेज काढू." तेव्हा येथील ट्रेनिंग कॉलेजचे एक प्रिन्सिपॉल व दुसरे एक गृहस्थ यांनी घरोघर हिंडून दोन लक्ष रुपये जमविले. अनेकांजवळून एकेक महिन्याच्या पगाराची देणगी घेतली. अशा रीतीने हे कॉलेज उभे राहिले.

कन्नड साहित्य समृद्ध आहे. सुंदर आहे. हिंदुस्थानात पहिल्याने लघुकथा कुठे सुरू झाल्या असतील तर कन्नड भाषेत. जुन्या कन्नड साहित्यात थोर थोर कवी आहेतच. परंतु आजचे कन्नड कवीही थोर आहेत. माझे मित्र मला अनेक कवींचा इतिहास सांगते झाले. अनेकांच्या गंमतीही. कन्नड भाषेत श्री. बेन्द्रे म्हणून महाकवी आहेत. सोलापूरला ते प्राध्यापक आहेत. त्यांच्या कविता उत्तम आहेत. प्रतिभा आणि शब्द दोहोंची अपार समृद्धी त्यांच्या काव्यात आहे. ते अरविंदांचे भक्त. १९२९–३० साली त्यांनी देशभक्तीवर एक अमर कविता लिहिली. सरकारने त्यांना एका गावी स्थानबद्ध केले. ते शाळेत शिक्षक होते. त्यांची नोकरी गेली. घरी अडचण. चुलते मदत करीत. पुढे चुलतेही वारले. बेळगावला कन्नड साहित्य संमेलन एकदा भरले होते.

त्यांनी आपली "हक्किहारुतिदे– पक्षी उडत आहे." ही भव्य कविता म्हटली. काळ हाच कोणी पक्षी, अशी कल्पना करून केलेली ही कविता आहे. म्हैसूरकडून आलेले एक थोर साहित्यिक ती कविता ऐकून वेडे झाले. ते मोठे सरकारी अधिकारी होते. ते श्री. बेन्द्रे यांना म्हणाले, "मला तुमचा भाऊ माना. तुमची आर्थिक अडचण आहे. मी मदत पाठवीन ती प्रेमाने घ्या. मनात काही आणू नका." आणि हे मित्र मदत पाठवीत. आता बेंद्रे सोलापूर कॉलेजात कन्नडचे प्राध्यापक आहेत. त्यांची वृत्ती अति समाधानी ! त्यांची शान्ती कधी ढळत नाही, ते एकदा कोणत्या तरी गावी होते. तेथे चिंचेचे एक मोठे झाड होते. त्याला ना फूल ना पान. जवळजवळ वर्षभर त्या झाडाला पान फुटले नाही. बेन्द्रे तेथून धारवाडला आले, परंतु काही महिन्यांनी त्या चिंचेच्या झाडाचे काय झाले म्हणून ते पाहायला पायी गेले तो ते झाड पानाफुलांनी नटले होते. बेन्द्रे उचंबळले. त्यांनी 'बहरलेला चिंचवृक्ष' या अर्थाची सुंदर कन्नड कविता लिहिली. सुधामाई, अशा कथा ऐकताना मी रंगत होतो. आणि कवी व्ही. सीतारामय्या यांची एक "अभीः अभीः" म्हणून उत्कृष्ट कविता आहे ती ऐकली. जगाचा खरा इतिहास मानवाला "भिऊ नको भिऊ नको" सांगत आहे. जगातील यज्ञ नि बलिदाने यांतून तोच ध्वनी येत आहे. सॉक्रेटिसाला दिलेला विषाचा पेला, ख्रिस्ताचा क्रॉस, ब्रूनोला जाळणे, या सर्वांतून "भिऊ नका भिऊ नका" असा घोष येत आहे. हुकूमशहांच्या छळातून, जुलमातून "अभीः अभीः' असा अमर आवाज येत आहे. भव्य कविता ! शब्दही अर्थपूर्ण व जोरदार असे आहेत. मी ती कविता ऐकत होतो व रोमांचित होत होतो. आणि जगाची प्रगती निर्भयपणेच झाली आहे. गीतेच्या सोळाव्या अध्यायात "अभय" हा पहिला सद्‌गुण म्हणून सांगितला आहे. महात्माजींनी सर्वांत मोठी देणगी कोणती दिली असेल तर अभयतेची. त्यांनी सर्व राष्ट्राला निर्भय केले. 'निःशस्त्र असू तरी अन्यायासमोर मान वाकवणार नाही', 'मरू पण चलेजाव म्हणू' असे म्हणायला नि तदनुरूप वागायला राष्ट्राला त्यांनी शिकविले. जे राष्ट्र निर्भय आहे, ते मुक्त आहे. ते सर्व क्षेत्रांत जाईल, प्रयोग करील, पुढे जाईल. साऱ्या इतिहासाची ही शिकवण आहे. भित्र्याला मरण आहे. निर्भय असेल तोच खरा जिवंत.

सुं. प. ३–८

धारवाडची हवा किती सुंदर! उन्हाळ्यातही काहींना ब्लँकेट पांघरावे लागते! थंडगार सुंदर हवा! एक सद्गृहस्थ म्हणाले, "साऱ्या हिंदुस्थानात अशी हवा नाही." परंतु येथे पाण्याचे हाल. एक दिवसाआड नळाचे पाणी. उन्हाळ्यात थोडे येते. काही वर्षांपूर्वी येथील म्युनिसिपालिटीच्या भव्य उद्घाटनासाठी म्हैसूरकडचे एक थोर गृहस्थ आले होते. ते म्हणतात, खाजगी म्हणाले, "एवढी इमारत बांधण्याऐवजी पाण्याची व्यवस्था करते तर? लहानशा इमारतीतही म्यु. कामकाज चालले असते!" धारवाड शहर दूरवर पसरले आहे. चार मैल लांब, चार मैल रुंद असा घेर आहे! म्युनिसिपालटीचे उत्पन्न थोडे, परंतु शहराचा पसारा मोठा. जवळ जवळ ३२ मैलांचे रस्ते सांभाळावे लागतात. दोहोंकडची गटारे हवीत! तरीही स्वच्छता बरी वाटली. रस्ते सुरेख आहेत. येथे पाण्याची व्यवस्था झाली तर हे शहर झपाट्याने वाढेल. वाढायला ऐसपैस जागा भरपूर आहे. शिक्षणाच्या सोयी आहेत. शेतकी कॉलेज, फॉरेस्ट कॉलेज अशी कॉलेजे झाली आहेत. येथे कोकणातील, देशावरची दोन्ही पिके होतात. शेतकी कॉलेजला आदर्श जागा! पाण्याच्या व्यवस्थेच्या योजना आहेत, परंतु प्रत्यक्षात येतील तेव्हा खऱ्या!

एके ठिकाणी फणसाचे गरे खाल्ले. आंबे तर सारखे खात होतो. धारवाडचे पायरीचे आंबे फार मधुर. आणि एके ठिकाणी मला बाळ्याकाकांची आठवण आली. मी दापोलीस शिकायला होतो. ३५ वर्षे त्या गोष्टीला झाली. मे महिन्याची सुट्टी संपून आम्ही पुन्हा शाळेला आलेले असू. जवळच्या जालगावी बाळ्याकाका राहात. मी आतेकडे असे. बाळ्याकाकांचा व आतेकडच्यांचा फार घरोबा. ते नेहमी यायचे. गोड हसणे व गोड बोलणे. अति साधे. तो एक सदरा, अंगावर उपरणे, डोक्याला लालसर जुना रुमाल. आम्हां मुलांना म्हणायचे, "अरे, आंबे–फणस खायला या." आणि आम्ही रविवारी जात असू. त्या बाजूला रस्त्याला जंगल. वाघ येईल की काय भीती वाटायची. रात्रीच्या वेळेस अंधार असला तर वाघाला भीती वाटावी म्हणून लोक पेटवलेली चूड हातात घेऊन म्हणे जायचे. परंतु आतेचे यजमान आम्हांला म्हणायचे, "कधी कधी वाघ हातांतल्या चुडीवर झडप घालून ती विझवतो." अशा गोष्टी ऐकलेल्या. आम्ही झपाझप जायचे आणि बाळ्याकाकांच्या अंगणात किंवा माजघरात आंबे–फणस ओ येसतो खायचे. ते दिवस मला आठवतात.

बाळयाकाकांचे, त्यांच्या घरचे ते प्रेमळ, उदार वातावरण आठवते. दोन तीन महिन्यांपूर्वी बाळयाकाका जवळ जवळ ८० वर्षांचे होऊन देवाघरी गेले. सुधा, त्यांचे थोर जीवन होते! लहानपणी ते मुंबईस होते. हॉटेलातही त्यांनी काम केले होते. पुढे त्यांना ३ रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली. ते संस्कृत शिकले. ते शास्त्री झाले. दापोली तालुक्यात त्यांच्यासारखा शास्त्री नव्हता. ते शेती करायचे. आपल्या मुलांनी कधीही सरकारची नोकरी करू नये असे त्यांना वाटे. आणि खरेच, पित्याची इच्छा मुलांनी पाळली. त्यांनी आपली मुले सरकारी शाळेत घातली नाहीत. लो. टिळकांच्या स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण या चळवळी सुरू झालेल्या. बाळयाकाकांच्या संसारात या गोष्टी होत्या. त्यांनी परदेशी वस्तू शक्य तो टाळली. मुलांना स्वावलंबी शिक्षण दिले, राष्ट्रीय शाळेत शिकविले. अग, फैजपूरला खेड्यात काँग्रेस भरली. त्या वेळेस ते मुद्दाम आले होते. मी तेथे स्वयंसेवक होतो. मला ते मुद्दाम भेटले. मी त्यांच्या पाया पडलो. माझ्या डोळयांत पाणी आले. त्यांनी मला कोकणातून पोहे आणले होते. पोह्यांची ती पुरचुंडी मी हृदयाशी धरली. माझ्या गरीब कोकणातील श्रीमंत हृदयाची ती अमृतमय भेट होती. ते अलीकडे थकले होते. आणि मरणही किती धन्यतेचे! अंथरुणावर पडून वेद म्हणत होते. एक गंमत झाली. म्हणाले, "मी गायीचा भक्त, परंतु आपल्याकडे सध्या एकही गाय नाही. गोठ्यात पूर्वी किती असायच्या." तर काय आश्चर्य! त्यांनीच एका शेतकऱ्याला एक गाय दिली होती. ती गाय अकस्मात आली. अंगणातून ओटीवर आली व ओटीवरून माजघरात येऊन बाळया-काकांच्या अंथरुणाजवळ उभी राहिली. त्यांच्या प्रेमाने गोमाता धावून आली. वत्सासाठी तिला पान्हा फुटला! असे हो बाळयाकाका! आणि मरताना म्हणाले, "मी मेल्यावर पिंडदाने वगैरे करू नका. आत्मा मुक्त होणार, देह सुटणार, तेथे कावळे कसले पिंडांना शिववता? मुक्त होणाऱ्या आत्म्याला का पिंडाची इच्छा असते? आणि भटजीला गायबीय देऊ नका. गायीची कोणी काळजी घेत नाहीत काही नाही. सारे गायींना मारणारे." बाळयाकाका हे जुन्या पिढीतले शास्त्री. कोकणातील खेड्यात राहणारे. परंतु आगरकरांसारखे हे विचार! 'कसली श्राद्धे नि पिंडदाने' असे म्हणणारे! मला ते सारे ऐकून बाळयाकाकांच्या जीवनाची अधिकच भव्यता वाटली!

निर्भय, निःस्पृह, स्वावलंबी, स्वाभिमानी, प्रेमळ, उदार, व्रती जीवन! अशी जीवने समाजाला आधार असतात. समाजाला आतून ओलावा देत असतात. बाळ्याकाकांची मंदमधुर हसणारी मूर्ती माझ्या डोळ्यांसमोर आहे. मी त्यांना कधी विसरणार नाही. मी त्यांना, तुला हे लिहिताना, क्षणभर थांबून हात जोडले. प्रणाम! बाळ्याकाका, तुम्हांला प्रणाम! फणसाप्रमाणे, आंब्याप्रमाणे तुम्ही रसाळ नि गोड!

धारवाडला 'वनिता-सेवा समाज' म्हणून एक संस्था आहे. १९२८ साली एका गतधवा सोवळ्या स्त्रीने स्वतःची सारी इस्टेट देऊन ही संस्था सुरू केली. भागीरथीबाई त्यांचे नाव. दहाव्या वर्षी त्यांना वैधव्य आले. जीवनाचे काय करायचे? स्त्रियांच्या सेवेला वाहून घ्यायचे मनात येई. स्वतःची इस्टेट देता येईल का? वकील म्हणाले, 'नाही देता येणार!' तेव्हा एकाला दत्तक घेऊन त्याच्याकडून ही इस्टेट या संस्थेला बक्षीस म्हणून देवविली. हे दत्तक पुत्र वैद्य आहेत, निसर्गोपचाराचे भक्त! अनाथ स्त्रियांना आधार देणारी संस्था. मुलीचे जरा पाऊल चुकले तर सारा समाज कावकाव करतो. स्त्रियाच का केवळ अपराधी? पुरुष नाहीत? परंतु ते तर सुटतात. फळ मुलीला भोगावे लागते. कोण आधार देणार? आजही अपहृत स्त्रियांना हिंदू समाज परत घ्यायला तयार नसतो. गांधीजींनी किती तळमळीने लिहिले. आपण अनुदार आहोत. अशा अभागी भगिनींना आधार द्यायला ही भगिनी उभी राहिली. अनेकांनी टीका केल्या. येथे आलेल्या मुलींचे पुन्हाही काही चुकले तरी त्यांना क्षमा करून घेतले जाते. आई का मुलाचा एकच अपराध क्षमा करते? वनिता सेवा समाज आईसारखा आहे. त्याचे दार नेहमी मोकळे राहील. येथे जवळ जवळ ४० मुली आज आहेत. सातवीपर्यंत शिक्षण मिळते. शिवण, हातमाग, भरणे, विणणे, नाना उद्योग शिकविले जातात. तेथे प्रसूतिसदन आहे. मुलींना नर्सिंगचे शिक्षण मिळते. काही मुली सूतिकेचे काम करू शकतात. सोप्या औषधांची त्यांना माहिती दिली जाते. लाठी वगैरे शारीरिक शिक्षण, संगीत याचेही शिक्षण आहे. सारे स्वावलंबन आहे. स्वतः दळतात, स्वयंपाक करतात. भांडी घासतात, झाडलोट करतात, फुले, फळभाज्या करतात. इमारती बांधताना स्वतः मातीच्या, विटांच्या टोपल्या मुली देत. भागीरथी-

बाई सांगत होत्या व मी उचंबळत होतो. मुलींनी सुंदर लाठी केली, सुंदर गीते म्हटली. तेथे एक लहान परित्यक्त मुलगी सांभाळण्यात आली आहे. दोन वर्षांची असेल. ती 'जयहिंद' म्हणाली. केवढी थोर सेवा येथे चालली आहे! भागीरथीबाई रोज भिक्षा मागून आणतात. महिन्याचा दोन हजार खर्च आहे. संस्थेच्या शाळेत नि उद्योग-वर्गांत गावातीलही दोनशे मुली येतात. शिक्षक आहेत. त्यांना पगार द्यावा लागतो. सरकारची या सुंदर संस्थेला मदत नाही असे कळले. पंढरपूरच्या थोर संस्थेसही सरकारी मदत नाही म्हणतात. कायद्यात म्हणे बसत नाही! आग लावा त्या कायद्यांना. वाटेल ते वटहुकूम काढणाऱ्या सरकारला अनाथांना आधार देणाऱ्या संस्थांना मदत देता येऊ नये?

श्री. भागीरथीबाई म्हणाल्या, "येथील म्युनिसिपालिटी ५ एकर जागा देणार होती. परंतु आता मिळेल की नाही कोण जाणे. त्या जागेचे प्लॉट पाडून म्हणे विकणार आहेत. आम्हांला का सत्याग्रह करावा लागेल?" अशा संस्थेला जागा मिळू नये? येथील कलेक्टरचा बंगला व कचेरी यासाठी म्हणे दोन अडीचशे एकर जागा आहे! आणि येथे पाच एकर मिळू नये? मिळेल, मिळेल. धारवाडचे नगरपिते का उदार नसतील?

निंदा, उपहास, टीका सहन करून ६३ वर्षांच्या श्री. भागीरथीबाई ही संस्था चालवीत आहेत. त्यांचा दत्तक मुलगाही सेवा करतो. संस्थेने अनाथ मुलींची पुन्हा लग्ने लावून दिली. भागीरथीबाई एका लहान खोलीत राहतात. त्या म्हणाल्या, "देवाचं बोलावणं येईपर्यंत इथं मी असेन." त्या एकदाच जेवतात. प्रणाम त्यांच्या ध्येयोत्कट निस्सीम जीवनाला! सेवापरायणतेला! त्यांची मातृभाषा कन्नड; परंतु मराठीही बोलतात; इंग्रजीतूनही परवा कोणाचे त्यांनी आभार मानले. साधे पांढरे पातळ नेसलेली ती सोवळी सेवापरायण अनाथ मुलींची प्रेमस्नेहमयी माता! सुधा, समाजाचे हे आधार! मी तेथे म्हटले, "धारवाडात परमेश्वर कुठं असला तर तो इथं आहे. आईला उपेक्षितांची चिंता असते. परमेश्वर अशांजवळ असतो. जग ज्याला दूर लोटतं तो देवाच्या दारात पोचतो. अशा देवानं जवळ घेतलेल्यांची येथे सेवा होत आहे."

मी इकडे आहे. परंतु काल मुंबईस आमच्या खोलीत जमशेदपूरहून श्री आला असेल. जयप्रकाशांनी त्याला तिकडे तीन महिन्यांसाठी नेले आणि दोन वर्षे तो तिकडे राहिला. तिकडे कामगारांत तो सुंदर काम करतो. तिकडे संप झाले. श्रीवर खुनाचेही आरोप. त्यांच्यावर खटले चालू आहेत. अशोक मेहतांनी लिहिले, 'काडीलाही न दुखवणारा बगाराम, तो का खून करील?' जेलमध्ये चेंडू-लगोऱ्यांचा खेळ असायचा. बग्याचा खेळ मुरारजीभाई बघत राहायचे. बगारामला त्याच्या बहिणी श्री म्हणतात. त्याचे नाव श्रीनिवास. परंतु कोणी बगाराम म्हणतात. जयप्रकाश म्हणाले, "आमच्याकडे 'व्याघ्रराम' नाव असते." मी म्हटले, "वचा ब होतो. व्याघ्राचं वाघ, बाघ, असं होता होता बगाराम झालं असेल."

सुधा, श्री खेळण्यात, पोहण्यात पटाईत. मागे औदुंबरला कृष्णेच्या डोहात उडी घेतली. पोहत पलीकडे गेला. बाहेर आला तो सुसरी दिसल्या. कृष्णेच्या डोहात मगरी आहेत, सुसरी आहेत, त्याला माहीत नव्हते! देवाने वाचवले. श्रीला काही येत नाही असे नाही. इंजिनीअरिंगच्या शेवटच्या परीक्षेत तो पहिला आला होता. सायन्स, गणित त्याला येतेच. तो इंग्रजीही छान लिहितो. तुरुंगात मार्क्सचे सारे 'कॅपिटल' त्याने वाचले. विरोधविकासावरचे अनेक ग्रंथ वाचले. मी त्याला म्हणायचा, "तुला सारं येतं. मला काही येत नाही." सुधा, खरेच कधी कधी वाटते, आपल्याजवळ काय आहे? परंतु मी मनाचे समाधान करतो. तुझ्याजवळ थोडे उदार हृदय आहे. ते का तुच्छ? जोवर आपल्या जगण्याने एखाद्या तरी माणसाच्या जीवनात आनंद निर्मिता येत असेल तोवर आपल्या जीवनात अर्थ आहे असे समजावे.

श्री तिकडे दोन वर्षांनी आला असेल. खोलीतील मित्र आनंदले असतील. मुंबईचे बापूराव, सोहनी, बबन, काळे, केळुस्कर, राजा वगैरे म्हणतील, "बगाराम आता जाऊ नकोस. आम्ही जयप्रकाशांना सांगू." परंतु जयप्रकाश का त्याला आता सोडतील? सारा देश आपला. जेथे काम असेल, अडचण असेल तेथे गेले पाहिजे.

मी बगाराम आला असता दूर आहे तोच बरा. सुधा, मित्रांना सर्वस्व द्यावे असे मला वाटते. परंतु आज मजजवळ काय आहे? आणि त्यांच्या


कार्यांतही मी मदत करू शकत नाही. माझा पिंड राजकीय नाही. मला संघटना करता येत नाही. चर्चा करता येत नाही. मित्र माझ्यापासून या अपेक्षा करतात. मला त्या पुऱ्या करता येत नाहीत. आपणाला मित्रांच्या अपेक्षा पुऱ्या करता येऊ नयेत यासारखे दुःख नाही. म्हणून सर्वांपासून दूर जावे असे मला कधी वाटते. मला शेकडो प्रेमळ सखे असूनही मनात एकटे वाटते व माझे डोळे भरून येतात. हे लिहितानाही अश्रू येत आहेत बघ! किती वेळ मी तुला लिहीत आहे. बाहेर वारा सूं सूं करीत आहे. झिमझिम पाऊस आहे. मलाही थोडे गारगार वाटत आहे. पांघरूण घेऊन पडू का? किती वाजले असतील? पहाट झाली असावी. परंतु कोंबडा आरवलेला ऐकला नाही! कोंबड्याचे घड्याळ हजारो वर्षांचे आहे. पाणिनीनेही या घड्याळाचा उल्लेख केला आहे.

तुम्ही सुखी असा. सुट्टी थोडी राहिली. खेळून घ्या. सुट्टीच्या महिन्या–दीड महिन्यात भरपूर आनंद जीवनात साठवून घ्यावा; जो पुढच्या सुटीपर्यंत पुरेल. खरे ना? अप्पा, ताई, बरी आहेत? ताईचे दिवस भरत आले आहेत. सुखरूप पार पडो. जपा हं सारी. अरुणाला गोड पापा की धम्मक लाडू? तिला हवे असेल ते द्या. तुझ्या मैत्रिणींस स. आ.

अण्णा

साधना, ३ जून १९५०.

★ ★



चि. प्रिय सुधास,
सप्रेम आशीर्वाद.

मी इकडे सध्या हिंडत फिरत आहे. आणि तुझे पत्रही हिंडत हिंडत येऊन मला एके ठिकाणी मिळाले. त्यातील वार्ता वाचून वाईट वाटले. बाळतात्या देवाघरी गेले. ते थकले होते. सत्तराहून अधिक वर्षांचे. सारे जीवन श्रमाचे नि कष्टाचे. ते घरी शेती करायचे. सकाळी उठून शेणाची टोपली डोक्यावर घेऊन शेतावर जायचे. तेथे दोनचार तास काम करून दुपारी ११ वाजता घरी यायचे. मग आंघोळ, देवपूजा व देवळास जाऊन येणे. जेवल्यावर जरा पडायचे व मग जानव्यांसाठी सूत काढायचे. पुन्हा चार वाजले की चालले शेतावर. बांध घालतील, कवळ तोडतील, वाडा शिवतील, लावणी करतील, भात झोडतील, दोऱ्या वळतील. त्यांना शेतीचे अमुक एक काम येत नसे असे नाही. तुझे आजोबा व बाळतात्या यांचे एकमेकांवर फार प्रेम. बाळतात्या वयाने लहान. बाळतात्या चिलीम भरायचे व भाऊ ओढायचे. थंडीच्या दिवसांत, पावसात दोघे चिलीम ओढून कामाला जात. बाळतात्यांना पानाचाही षोक होता. त्यांच्याकडे पानवेल होती. झाडाला एक कळक

लावलेला. कळकावरून चढायचे. पाने काढायची. कळकाला प्रत्येक पेराजवळ पाय ठेवायला पुढे आलेली शिरी असते.

बाळतात्या नेहमी आनंदी नि प्रसन्न. गावात सर्वांजवळ त्यांची मैत्री. तुझ्या वडिलांनी त्यांच्याबरोबर एकदा नाटकात काम केले होते, व दादा झाले होते गणपती ! सोंड हालवणारे दादा अजून माझ्या डोळ्यांसमोर आहेत.

त्यांचा नेहमीचा पोषाख म्हणजे पंचा व खांद्यावर एक फडका. क्वचित उपरणे असे. शेतावर उघडे जायचे. थंडीच्या दिवसांत कोपरी घालायचे. उत्सवसमारंभाच्या वेळेस धोतर नेसत. त्यांचा एक पांढरा बंदाचा आंगरखा होता. डोक्यावर मोठे पागोटे. कथाकीर्तनाच्या वेळेस ते बुक्का लावायचे. कोणत्याही कामाला ते हजर असायचे. त्यांना अभिमान नव्हता. कोणी टिंगल केली तर स्वतःही हसून त्यात भाग घेत.

त्यांची एकच बहीण होती. बयोआते आम्ही म्हणत असू. त्यांनी बहिणीला अडचणीच्या काळात स्वतःच्या पडवीत जागा दिली होती. बहिणीच्या मुलांना स्वतः गरीब असून आधार देत.

सुधा, या जुन्या माणसांच्या जीवनांत एक प्रकारचा अखंड कर्मयोग असे. देह थकला म्हणजे पडायचा. देहाने पुरेपूर सेवा जणू ते करीत. मी कधी सुट्टीत गावी गेलो म्हणजे बाळतात्या किती प्रेमाने हाक मारायचे. त्यांनी पाठीवरून हात फिरविला तरी कृतार्थ वाटे. प्रणाम त्यांच्या स्मृतीला.

जुन्या पिढीपैकी आता रामकृष्णकाका आहेत. त्यांना एकदा भेटून यावे असे मनात येते. त्यांना नातू झाला आहे. काका-काकू नातवाला खेळवीत असतील. ते एक परम समाधान असते.

सुधाताई, मी इकडे कर्नाटकात हिंडत आहे. कर्नाटकाचे थोडेफार दर्शन घेत आहे. परवा गदगला गेलो होतो. डॉ. अण्णासाहेब चाफेकरांकडे उतरलो होतो. त्यांच्या घरचे वातावरण प्रेमळ व मोकळे. सायंकाळी सारी मुले देवासमोर जमतात. आरत्या, श्लोक वगैरे म्हणतात. मी मुलांना गोष्टी सांगितल्या. डॉक्टरांचा लहान मुलगा विनय हळूच माझ्याकडे यायचा. मी विचारायचा

'विनय काय हवंय?' मग म्हणे, 'गोष्ट सांगता!' मोठा लाघवी गोड मुलगा. आणि त्याची बहीण माहेरी आली होती. तिची मुले आईला 'छवा' म्हणतात. मोठी माणसे हाक मारतात तीच लहान मुलेही मग मारू लागतात. छवाची मुलगी किती मोठी गोड! तिची माझी गट्टी जमली. मी तिला म्हणे, 'टोपी घालतेस माझी?' तर म्हणायची 'मी का पुरुष आहे? माझ्या वेण्या बघा.' एवढीशी चिमुरडी पण किती बोले, नि किती गोड बोलणे!

गदगला एक भीष्माच्या पादुकांचे स्थान आहे. तेथे एक तलाव आहे. परंतु पाणी नव्हते. भीष्म दक्षिणेत कधी आले होते कोणास ठाऊक! परंतु प्रत्येक ठिकाणच्या लोकांना भारतातील साऱ्या पूज्य व्यक्ती केव्हा तरी आपल्याही प्रदेशात येऊन गेल्या होत्या, असे दाखवावेसे वाटते. येथे त्रिकुटेश्वर म्हणून प्रसिद्ध जुने मंदिर आहे. आपल्याकडे जशी दगडावर दगड रचून केलेली हेमाडपंती देवळे आहेत तशीच ही. परंतु फार मोठी. जखणाचार्यांनी ही शिल्पपद्धती रूढ केली म्हणतात. मंदिर लांबरुंद खूप आहे, परंतु त्या मानाने उंची नाही. दगडांवर नक्षी आहे. रामायणातील वगैरे दृश्ये आहेत. संसारातील व निसर्गातील नाना दृश्ये खोदली आहेत. मृदंग वाजत आहे, नृत्य चालत आहे,– अशी दृश्ये आहेत. मोर, माकडे, खोदली आहेत. त्रिकुटेश्वराच्या भोवतालचे आवार खूप मोठे आहे. परंतु येथे रमणीय असे वाटत नाही, सारे शून्य वाटते. वीर नारायणाचे मंदिर उंच आहे. हे दाक्षिणात्य मंदिरांच्या धर्तीचे. दोन गोपुरे आहेत. मंदिरावर ठायी ठायी अपार नक्षी. शेकडो छोटी गोपुरे दगडातून दाखविली आहेत.

या वीर नारायणाच्या मंदिरातील एका खांबाजवळ बसून कुमार व्यास नावाच्या कन्नड कवीने आपले कन्नड भारत रचिले. ज्या खांबावर ज्ञानेश्वर कोळशाने ओव्या लिहीत, तो जसा नगर जिल्ह्यात दाखविला जातो, तसा हा कुमार व्यासाचा खांब. या कवीने स्वतःला कुमार व्यास ही पदवी घेतली होती.

एका लेखकाने म्हटले आहे, "कुमार व्यास महाभारत लिहू लागले की कलियुगाचे द्वापार युग होते." हे महाभारत फार सुंदर आहे म्हणतात.

गदग शहराची व्युत्पत्ती या बाजूला गजग्यांची म्हणजे सागरगोट्यांची झाडे फार होती, त्यावरून गदग नाव पडले अशी लावतात. गजगा हा शब्द कन्नड भाषेतूनच मराठीत आला असेल! कोणी निराळीही उपपत्ती लावतात.

धारवाड, गदग, हुबळी इकडे अरविंदांचा संप्रदाय वाढत आहे. महाकवी बेंद्रे हे अरविंदपंथीच. हुबळी येथे अरविंदमंडळ आहे. कन्नड भाषेत अरविंद-वाङ्मय आणण्याची योजना करीत आहेत. गदगचे डॉ. आनंदराव उमचिगी फार सज्जन गृहस्थ. त्यांच्या घरी लहान मुले मॉंटेसरी पद्धतीने शिकतात. आईच मुलांना शिकविते. आनंदराव अरविंदांचे अनुयायी. आनंदरावांचे आजोबा पुष्कळ वर्षांपूर्वी मोडीत ‘सत्यवृत्त’ नावाचे वृत्तपत्र चालवीत. शिळाप्रेसवर छापीत. आनंदरावांच्या घरी तसेच डॉक्टर चाफेकरांच्या घरी चांगलाच ग्रंथसंग्रह आढळला.

सहज बसल्यावर अनेक गोष्टी निघत. तू भूगोलात म्हैसूर संस्थानातील ‘श्रवणबेलगोला’ येथील गोमटेश्वराच्या प्रचंड पुतळ्याविषयी वाचले असशील. गोमटा म्हणजे सुंदर. कोकणी भाषेत हा शब्द नेहमी वापरतात. आपण फक्त ‘गोरागोमटा’ या शब्दप्रयोगात ठेवला आहे. गोमटेश्वर म्हणजे सुंदर ईश्वर. ५७ फूट उंच असा हा पाषाणमय पुतळा आहे. अंगावर साप, वेली वगैरे दाखविल्या आहेत. गोमटेश्वर म्हणजे जैन तीर्थंकर, महान साधू. तो तपश्चर्या करीत आहे, व तप करता करता अंगावर वेली वाढल्या तरी तो तपस्येतच तन्मय होता. हे सारे त्या पुतळ्याच्या अंगावरील वेली वगैरेंनी दर्शविले आहे. दर बारा वर्षांनी गोमटेश्वराला दुधाचा महाभिषेक होतो. पहिली घागर कोणी ओतायची? म्हैसूर सरकार चढाओढ लावते. ज्याचे जास्त पैसे त्याची पहिली घागर. मला वाटते ४० किंवा ४१ साली मागे जेव्हा हा द्वादश-वार्षिक अभिषेक झाला होता, तेव्हा इंदूरचे श्री हुकुमचन्द शेठ यांनी २ लक्ष रुपये देऊन पहिली घागर ओतली! दुसऱ्या घागरीला असेच काही रुपये. असे नंबर लावतात. म्हैसूर सरकारला उत्पन्न होते. सरकार व्यवस्थाही सुंदर ठेवते.

गदगला डॉ. गोडबोले यांनी केवढे हॉस्पिटल बांधले आहे. एक्स्-रे मशिन वगैरे सारे आहे. हॉस्पिटलच्या आवारातच बाजूला हरिजन वसतिगृहही चालविले आहे. ते मोठे कर्तबगार आहेत.

दूर टेकड्या दिसत. त्यांतून सोने निघे म्हणतात. परंतु फारच थोडे. खर्चाच्या मानाने परवडत नाही म्हणून ते काढण्याचा कोणी उद्योग करीत नाही.

कन्नडचा हा उत्तर भाग सुपीक, परंतु पाण्याचा दुष्काळ. खाली म्हैसूरच्या बाजूला भरपूर नद्या, कालवे. परंतु धारवाड, हुबळी भागांत मोठी नदी नाही. पाण्याचे हाल. कोटी दोन कोटीच्या पाण्याच्या योजना आहेत, केव्हा प्रत्यक्षात येतील हरी जाणे. १९५३ च्या सुमारास धारवाड, हुबळी यांना पाणी देऊ सरकार म्हणते. नळ वगैरे सामान येऊन पडले आहे.

हुबळीला मी मनूकडे जेवायला गेलो. अमळनेरला ती ल्हान असताना मी तिला गोष्टी सांगायचा. मनू डॉक्टर आहे. तिचे यजमानही डॉक्टर. मनूचे ल्हान बाळ नुकतेच गेलेले. ती दुःखी होती. मी मागे तिला पत्र लिहिले होते. बाळाचे दोन दिशी बारसे होते. तो आधीच गेला. चांगले ८–८॥ पौंड वजन होते. आरोग्यसंपन्न अर्भक! आले नि देवाघरी गेले. मनू म्हणाली, "उपाय चालत नाहीत. पाहिलं की निराशा येते. माझ्या हाताला कधी अपयश आलं नव्हतं. परंतु माझ्याच बाळाच्या बाबतीत आलं." मनूचा चेहरा गंभीर, जरा उदास दिसला. काय करायचे? मी तिच्या डोक्यावरून हात फिरविला व म्हटले, "मनू, अप्पाचासुद्धा पहिला मुलगा असाच तिसऱ्या दिवशी गेला. किती चांगला मुलगा! कसं जावळ होतं! आणि एकदम सुकून गेला! काही लक्षातही आलं नाही. मनू, ही दुःखं नेहमी ताजीच असणार! तू विवेकी, विचारी!" खरेच मनू विवेकी. तिचा अरुण आता ६–७ वर्षांचा आहे. गोड मुलगा. शेजारी हसरी आनंदी शान्ता आहे. तिला म्हणतो, "तुझ्या धाकट्या बहिणीचं लग्न होऊन ती जाऊ दे सासरी. तू नको जाऊस." ल्हान भाऊ झाला तेव्हा अरुण म्हणाला, मला अगदी खोलीभर हिरेमाणके मिळाल्याचा आनंद झाला आहे!" ल्हान मुलांना कधी कधी शब्द कसे सुचतात पण! अग, नानासाहेब

गोऱ्यांची शुभा लहानपणी त्यांना म्हणाली, "कसा राजासारखा शोभतो माझा नाना!" मनूचा अरुण किती तरी वाचतो. खरेच, मागील वर्षी ती सारी तुमच्या बोर्डीला आलीच होती. त्यांना नारळी नि समुद्र यांची अजून आठवण येते. अरुणचे वडील म्हणाले, "मागील वर्षी आम्ही बोर्डीला गेलो होतो. समुद्रावर बसलो होतो. मनूने 'सागरा अगस्ति आला' असा चरण चाळूत लिहिला. तर अरुणने सागराच्या पुढे स्वल्पविराम केला व आईला म्हणाला, "सागराला हाक ना मारलीस? पुढे खूण नको का?" एवढासा अरुण! पण बघ त्याची बुद्धी. प्रिय आचार्य भागवत अरुणचे काका. ते या लाडक्या पुतण्याला अनेक सुंदर पुस्तके आणून देतात. आचार्यांची पत्रे मनू व तिचे यजमान यांना धीर देतात. हा अरुण अगदी ल्हान होता. तेव्हा आचार्य व मी येरवडा तुरुंगात होतो. बाळ अरुणची वत्सल वर्णने करणारी मनूची पत्रे आचार्य मला वाचायला देत! मातृप्रेम ही अवर्णनीय वस्तू आहे. मनू व तिचे यजमान अरुणसह मला हुबळी स्टेशनवर पोचवायला आली होती. स्टेशनात आलेले टपाल पडले होते. मनू म्हणाली, 'दादांचं पत्र असेल.' दादांचे म्हणजे आचार्य भागवतांचे. आचार्यांच्या पत्राची केवढी ओढ! दुःखी मनूला त्यांची पत्रे म्हणजे अमृतांजन!

मनू देशावर वाढलेली. परंतु तिच्या यजमानांचे पूर्वायुष्य कोकणात गेलेले. अग, पालगडला आचार्य भागवतांचे नाते होते. आम्ही कोकणातल्या गोष्टी बोलत बसलो; तो कोकिळा ओरडली. अरुण म्हणाला, "पाणी नाही, शेण खा" असे ना हा पक्षी म्हणत आहे? मी म्हटले, "अरे, ती चातक पक्ष्याची गोष्ट. सासूने सुनेला 'ऋषीला पाणी प्यायला दे' म्हटले तर सुनेने शेणखळा नेऊन दिला. ऋषीने शाप दिला, "तुला पाण्यासाठी टाहो फोडावा लागेल!" चातक पक्षी म्हणजे ती सून. पावसाच्या वेळेस दोन थेंब याच्या तोंडात पडतात! तेवढ्यावर वर्षाची तहान भागायची." आणि मग पक्ष्यांच्या गोष्टी निघाल्या. अरुणचे वडील म्हणाले, "शेरभर नाचणी, इतकेच पीठ" म्हणून एक पक्षी ओरडतो. सासू सुनेला म्हणत आहे की, 'शेरभर नाचण्या असून पीठ इतकेच कसे?' आणि तो दुसरा एक पक्षी,– "त्रिय्यो त्रिय्यो" म्हणून आवाज काढतो, मी म्हटले. आणि 'पेरते व्हा', 'कवडा पोर-पोर' वगैरे सर्व

प्रकारचे पक्ष्यांचे आवाज आमच्या स्मरणात आले. आणि उंबरगावचा राम मला म्हणायचा, "तो पक्षी 'पेरते व्हा' कशावरून रे म्हणतो? 'चालते व्हा' कशावरून म्हणत नसेल?" त्या ध्वनीनुरूप कोणतेही शब्द आपण बसवावे. आगगाडीच्या आवाजात "कशासाठी पोटासाठी, खंडाळयाच्या घाटासाठी" हे चरण आपण बसवतो! मनुष्याला सारी सृष्टी आपलीच वाणी बोलत आहे असे वाटते!

गदगला त्या दिवशी रात्री थोडा पाऊस आला. सारी झोपली होती. पाऊस आला म्हणजे माझे मन नाचते. उचंबळते. पावसातून फिरायला जावे असे नेहमी मला वाटते. बाहेरच्या झाडावर टप्‌टप् आवाज होत होता. कोकणात आपल्या घराजवळ केळीची झाडे असायची. केळीच्या पानांवर पावसाचे थेंब कसे वाजतात, नाही? मी खिडकीतून हात बाहेर घातला. पावसाचे थेंब हातावर पडले. मी तो ओला हात तोंडावरून फिरवला. परंतु हा क्षणिक पाऊस. खरा पावसाळा अजून नाही सुरू झाला. होईल लौकरच. ढग दोन आले होते, रिते होऊन ओलावा देऊन गेले. ते जाताच पुन्हा चंद्र दिसू लागला. मी खिडकीतून त्याच्याकडे बघत होतो. निळया आकाशातून तो हसत होता. चंद्र म्हणजे विश्वंभराचे मुके भावगीत आहे! खिडकीतून मध्यरात्री माझ्यासारखा कोणी वेडापीर त्याच्याकडे बघत असेल का?

सुधामाई, आपण एकदा पालगडला चांदण्यात रात्री लंगडीने खेळत होतो, आठवते तुला? दादा, अक्का, तुझी आई सारी खेळात होतो. आणि वैनीने दादांना पकडले. परंतु दादांना वैनी सापडली नाही! अक्काने मात्र वैनीला धरले. मजा. केळांब्याच्या व जानकी वैनीच्या रातांब्याच्या छाया अंगणात नाचत होत्या. आपण खेळून दमलो; आणि घरातला एक पिकलेला फणस अंगणात बसून आपण मटकावला! आठवते तुला!

जुन्या आठवणी गंमतीच्या वाटतात! आज दादा नाहीत, वैनी नाही, परंतु या स्मृती आहेत. चैत्र वैशाखाचे दिवस आले! असे चांदणे पाहिले की त्या स्मृती पुन्हा जागृत व्हायच्याच, नाही? जीवनात दुःखे आहेत, सुखे आहेत. परंतु सुखांवर, आनंदावर दृष्टी देऊन आशेने माणसाने वागावे.

फुले, फळे, पक्षी, आकाश, तारे, रवी, शशी, नद्या, सागर, वने, उपवने, मित्र, सखेसोयरे– या आनंदाच्या राशी आपल्या सभोवती आहेत. सायंकाळी हल्ली किती मस्त देखावा दिसतो ! ढगांचे शेत आकार दिसतात ! क्षणात हत्ती तर क्षणात धावणारे ससे ! क्षणात खादीचे पोशाख केलेले जणू ढेरपोट्ये व्यापारी, तर दुसऱ्या क्षणी भरजरी पोशाख केलेले विश्वेश्वराचे भालदार चोपदार ! अनंत रंगांची अनंत मिश्रणे ! जणू विराट् नाटक चाललेले असते. किती अंक, किती प्रवेश ! आणि शेवटी सारे रंग लोपतात ! गंभीर अंधार येऊ लागतो ! शेवटचा काळा पडदा पडतो ! रवीन्द्रनाथांना सायंकाळच्या कृष्णछाया नेहमी मृत्यूचे स्मरण करून द्यायच्या. जणू रोज सायंकाळी आपण आपलेच नव्हे तर साऱ्या समाजाचे, जगाचे थोडक्यात रूपकात्मक नाटक बघत बसतो !

सृष्टीचे भक्तिप्रेमाने अवलोकन करण्याची आहे तुला संवय ? तुला लहानपणी फुलांचे वेड होते. ते वेड वाढत जाऊन सकल सृष्टीवर प्रेम करावयाचे वेड लागो. ल्हानसे फूल, ल्हानसे तृणपर्ण, ल्हानसा किडा, परंतु त्यांच्या जन्मासाठी कोट्यवधी वर्षे उत्क्रान्ती होत आली असेल. एखाद्या ल्हान फुलपाखराच्या पंखावरचे ते नयनमनोहर रंग सृष्टीत दिसायला लागण्यापूर्वी कोट्यवधी वर्षे होऊन गेली असतील ! म्हणून ल्हानसा किडाही चुकून चिरडला गेला तर मला चुकचुक लागते !

सुधा, मी तुला जवळजवळ गेले वर्षभर दर आठवड्यास पत्र लिहीत आहे. परंतु आजचे हे शेवटचे साप्ताहिक पत्र. आता तुला मी केव्हा तरी अधूनमधून लिहीन. परंतु आता बंधन नको. मलाही लांबलचक पत्रे लिहायला तितका वेळ नसतो. मागील वर्षी पावसाच्या आरंभी लिहायला सुरुवात केली व आता या वर्षाचा पावसाळा आला. दोन दिवशी मृग येतील. एक वर्षभर जवळ जवळ नियम पाळला. वर्षाची ५२ पत्रे व्हावयाची परंतु ४२ च झाली. किती कसोशी केली तरी अधून मधून कधी कधी लिहायला जमले नाही. ‘अण्णा, तुझी पत्रे पुस्तकरूपाने झाली तर सर्वांनाच आवडतील, देऊ का पुस्तकाकार करायला ?’ म्हणून तू विचारले होतेस. दे. ती तुझी आहेत, तुझा त्याच्यावर हक्क. ती तुला लिहिताना मी

आनंद उपभोगला; कधी उचंबळलो, कधी गहिवरलो. कधी सृष्टीत रमलो, कधी गतस्मृतीत डुंबलो. तुझ्यामुळे मला हे सुख लाभले. म्हणून तुला सारे श्रेय ! सुखी अस. आनंदी, उदार, कामसू, अभ्यासू हो. सदैव मनाने, बुद्धीने वाढती राहा. प्रिय अप्पास, सौ. ताईस स. प्र. आणि आता 'बे बे नको, आंबे द्या' म्हणणाऱ्या लबाड अरुणास पाठीत पायरीचा हापूसचा गोडसा धम्मक आंबा दे.

अण्णा

साधना, १० जून १९५०

* *